सोलापूर तरुण भारत
आसमंत



# बिहारचा बाजीगर

वेध
प्रतिनिधी

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, ज्यांचे राजकीय कारकीर्द चार दशकांहून अधिक काळ चालले आहे, ते त्यांच्या धोरणात्मक बदलांसाठी, लवचिकतेसाठी आणि तीक्ष्ण राजकीय कौशल्यांसाठी ओळखले जातात. १९८५ मध्ये पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आल्यापासून ते २०२५ मध्ये एनडीएला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यापर्यंत, नितीश कुमार यांनी अनेक राजकीय उलथापालथींना तोंड देत आपले नेतृत्व टिकवून ठेवले आहे. त्यांनी अनेकवेळा आघाड्या बदलल्या, सरकारे पाडली आणि पुन्हा स्थापन केली, ज्यामुळे ते बिहारच्या राजकारणातील एक अत्यंत महत्त्वाचे आणि 'अनुकूलनीय' नेते म्हणून ओळखले जातात. बर्याचदा हाताबाहेर गेलेली निवडणूक, सत्तेत येईलच याची खात्री नसताना या बाजीगरने 'हारी हुई बाजी' पलटवून दाखवली आहे.

जयप्रकाश नारायण यांच्यापासून ते पुढे जॉर्ज फर्नांडिस यांच्या तालमीत समाजवाद्याचे धडे गिरवत नितीश कुमार यांनी असे काही राजकीय डावपेच टाकले, अशी काही धक्कादायक समीकरणं मांडली की देशही अचंबित झाला. मित्र शत्रू झाले. तर शत्रू मित्र झाले पण नितीश कुमार यांच्याशिवाय बिहारच्या सत्तेतील पान हलत नाही. नितीश कुमार हे महाविद्यालयात असताना युनायटेड स्टुडंट्स फ्रंटसोबत काम करत होते. ही संघटना काँग्रेसविरोधात काम करत होती. नितीश कुमार यांच्या बोलण्याची शैली, नेतृत्व गुण याची त्यावेळी चर्चा झाली. १९७२ मध्ये नितीश कुमार यांनी बिहारण्ध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी एक संघटना स्थापन केली. आणि संघटनात्मक कौशल्याने ही संघटना नावारूपाला आणली. शिक्षण पूर्ण झाल्यावर व लग्नानंतर नितीश यांनी विद्युत विभागात प्रशिक्षक अभियंता म्हणून नोकरी मिळाली. पण त्यांचे मन नौकरीत रमले नाही. त्यांनी राजीनामा दिला आणि ते थेट जेपींच्या आंदोलनात सहभागी झाले. तुरुंगा गेले. तुरुंगातून बाहेर आल्यावर त्यांनी थेट निवडणुकीची तयारी केली. १९७७ मध्ये पहिल्यांदा जनता पक्षाने २६ वर्षांचे नितीश कुमार यांना नालंदामधील हरनौत येथून तिकीट दिले. येथे नितीश कुमार यांना पराभवाचा सामना करावा लागला.

१९८० मध्ये नितीश पुन्हा त्याच मतदारसंघातून लढले आणि पुन्हा हारले. १९८५ मध्ये त्यांनी शपथ घेतली की आता जर पराभव झाला तर पुन्हा निवडणूक लढणार नाही. मात्र, यावेळी त्यांना त्यांच्या नशिबाने साथ दिली. या निवडणुकीत ते २२ हजार मतांनी जिंकले. त्यानंतर १९८९ मध्ये लोकसभा निवडणूकही जिंकले. नितीश कुमार दिल्लीत आले. तर लालू प्रसाद यादव हे बिहारमध्येच थांबले. १९८९ मध्ये बिहारमध्ये काँग्रेस सरकार होते. तर कर्पुरी ठाकूर हे विरोधी पक्ष नेते होते. १९८८ मध्ये ठाकूर यांचे अचानक निधन झाले आणि लालू प्रसाद यादव हे विरोधी पक्ष नेते झाले. त्यावेळी नितीश कुमार यांनी त्यांना बिनशर्त पाठिंबा दिला. १९९० मध्ये जेव्हा व्हीपी सिंह यांनी रामसुंदर दास यांना मुख्यमंत्री करण्याची कसरत सुरु केली तेव्हा नितीश कुमार यांनी लालूंना पाठिंबा दिला.

> बिहारचे राजकारण लालू प्रसाद यादव यांच्या भोवती फिरत असताना त्याच्या केंद्रस्थानी नितीश कुमार आपसूकच आले. ते आले, त्यांनी पाहिलं आणि त्यांनी जिंकलं अशी त्यांची कारकीर्द आहे. त्यांनी अशी काही धक्कादायक समीकरणं मांडली की, देशही अचंबित झाला. पण या बिहारच्या बाजीगर शिवाय सत्तेचा मार्ग प्रशस्त होत नाही हे सातत्याने दिसून आले.

नितीश कुमार हे कायम लालू प्रसाद यांच्या पाठिशी राहिले. नितीश कुमार यांना लालूप्रसाद यादव यांचे हनुमान म्हणून ओळखल्या जाऊ लागले. ते लालूंचे अगदी खास, विश्वासू सहकारी होते. पण सरकारमध्ये भ्रष्टाचार बोकळला. तर बाहेर दादगिरीचे प्रकार वाढल्याचे आरोप करत नितीश कुमार हे लालू प्रसाद यादव यांच्यापासून दुरावले. १९९४ मध्ये नितीश कुमार यांनी लालू प्रसाद यांच्या प्रभावापासून स्वतःला वेगळे केले. त्यांनी झरींपर येथे 'कुरमी चेतना महारॅली'मध्ये भाग घेतला आणि जॉर्ज फर्नांडिस यांच्यासोबत 'समता पार्टी'ची स्थापना केली.

१९९६ मध्ये समता पार्टीने भाजपसोबत युती केली आणि बिहारमधून ६ जागा जिंकल्या. तर लालू प्रसाद यादव यांच्या पक्षाला १६७ जागा मिळाल्या. तर २००० मधील निवडणुकीत लालू प्रसाद यादव यांना मोठा संघर्ष करत सत्ता स्थापन करता आली. या निवडणुकीने नितीश कुमार यांचे राज्यातील वर्चस्व वाढले. त्यांची लोकप्रियता वाढली. त्यावेळी नितीश कुमार यांच्यासह एनडीएला १२२ जागा मिळाल्या. पण त्यांचे सरकार ७ दिवसांचेच ठरले.

नितीश कुमार यांना बहुमत सिद्ध करता आले नाही. राबडी देवी या मुख्यमंत्री आल्या. मात्र, २४ नोव्हेंबर २००५ रोजी ते पुन्हा मुख्यमंत्री बनले आणि त्यांनी आपला संपूर्ण कार्यकाळ पूर्ण केला. या काळात त्यांनी प्रशासकीय कामात आपली छाप सोडली. त्यांच्या राजकीय चातुर्याचे दर्शन २०१३ मध्ये घडले, जेव्हा त्यांनी १७ वर्षांची भाजपसोबतची युती तोडली.

२०१४ मध्ये लोकसभेच्या निवडणुकीतच्या खराब कामगिरीनंतर त्यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. मात्र, २०१५ मध्ये त्यांनी 'महागठबंधन' सरकारचा भाग म्हणून पुन्हा मुख्यमंत्रीपद स्वीकारले. पण हे सरकार फार काळ टिकले नाही आणि जुलै २०१७ मध्ये त्यांनी पुन्हा राजीनामा देऊन एनडीएत प्रवेश केला. हा त्यांचा मुख्यमंत्री म्हणून सहावा शपथविधी होता.

२०२० मध्ये एनडीएने १२५ जागा जिंकल्या आणि नितीश कुमार १६ नोव्हेंबर रोजी सातव्यांदा मुख्यमंत्री झाले. हा विजय थोडा कठीण होता. त्यानंतर, ९ ऑगस्ट २०२२ रोजी त्यांनी पुन्हा भाजपसोबतची युती तोडली आणि महागठबंधनसोबत सरकार स्थापन करून आठव्यांदा मुख्यमंत्री बनले. हा राजकीय खेळ इथेच थांबला नाही. २८ जानेवारी २०२४ रोजी त्यांनी महागठबंधनशी संबंध तोडले आणि पुन्हा एनडीएत सामील होऊन मुख्यमंत्री पदाची नववी शपथ घेतली. २०२५ मध्ये, नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली एनडीएने बिहारच्या इतिहासातील सर्वात मोठ्या विजयांपैकी एक मिळवला, ज्यामुळे त्यांचे राजकीय स्थान आणखी मजबूत झाले.

नितीश कुमार यांच्या राजकीय कारकिर्दीची सर्वात मोठी ओळख म्हणजे त्यांची लवचिकता आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता. त्यांनी अनेकवेळा आघाड्या बदलल्या, पण प्रत्येक वेळी ते पुन्हा सत्तेत येण्यात यशस्वी झाले. त्यांच्या या धोरणात्मक बदलांमुळे आणि राजकीय कौशल्यांमुळे त्यांना 'बिहारचे सर्वात अनुकूलनीय आणि अनुभवी नेते' म्हणून ओळखले जाते. त्यांनी नेहमीच आपल्या प्रतिस्पर्धकांपेक्षा एक पाऊल पुढे राहण्याची कला अवगत केली आहे. त्यांच्या या राजकीय कौशल्यामुळेच त्यांनी सर्वाधिककाळ बिहारचे मुख्यमंत्री बनण्याचा विक्रम केला आहे.

# शेख हसीनांच्या शिक्षेच्या निमीत्ताने...

लक्ष्यवेध
अनय जोगळेकर

शेजारी बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना तेथील आंतरराष्ट्रीय गुन्हे लवादाने मानवतेविरुद्ध गुन्ह्यांखाली दोषी घोषित केले आहे. त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. त्यांच्याविरुद्ध चिथावणीखोर भाषणं करणं, आंदोलन दडपण्यासाठी सुरक्षा दलांना प्राणघातक शस्त्रांचा वापर करायला सांगणे आणि तीन घटनांमध्ये आंदोलकांच्या हत्येला जबाबदार असल्याचे आरोप करण्यात आले होते. या शिक्षेनंतर बांगलादेशने भारत सरकारकडे शेख हसीना यांना आपल्या स्वाधीन करण्याची मागणी केली आहे.



गेले १५ महिने शेख हसीना भारतात असून गेले काही आठवडे त्या माध्यमं आणि समाजमाध्यमांमध्ये सक्रिय झाल्या आहेत. शेख हसीना यांनी त्यांच्यावरील सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. संयुक्त राष्ट्रांनी बांगलादेशमधील आंदोलनात न्याय झाल्याबद्दल आनंद व्यक्त करताना शेख हसीनांच्या फाशीच्या शिक्षेबद्दल काळजी व्यक्त केली आहे. 'ह्युमन राईट्स वॉच' या संस्थेनेही शेख हसीनांच्या विरोधात चाललेल्या कायदेशीर प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचे म्हटले आहे. बांगलादेश सरकारच्या सायबर सुरक्षा संस्थेने शेख हसीना यांना शिक्षा झालेल्या गुन्हेगार घोषित करून बांगलादेशमधील माध्यमांना शेख हसीनांच्या वक्तव्यांना प्रसिद्धी न देण्याची ताकीद दिली आहे.

> बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना २०२४ मधील हिंसक आंदोलनप्रकरणी दोषी ठरवत 'आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरण कोर्टा'ने शेख हसीना यांच्यासहीत माजी गृहमंत्री असदुज्जमान खान कमाल यांनाही फाशीची शिक्षा सुनावली आली. त्यामुळे एकूणच बांगलादेशातील परिस्थिती स्फोटक झाली असून, भारतही याकडे लक्ष ठेवून आहे. त्यानिमित्ताने...




५ ऑगस्ट २०२४ रोजी शेख हसीना स्वतःचे प्राण वाचवण्यासाठी बांगलादेश सोडून भारतात येण्यापूर्वी तेथे सुमारे ४६ दिवस विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू होते. सुरुवातीला शांततामय असणार्या या आंदोलनाला हिंसक वळण लागून त्यामध्ये विरोधी पक्षांचे कार्यकर्तेही सहभागी झाले. शेख हसीना यांच्या अनुपस्थितीत त्यांच्याविरुद्ध चाललेल्या खटल्यामध्ये त्यांना जन्मठेप किंवा फाशीची शिक्षा सुनावली जाईल, ही अपेक्षा होती. शेख हसीना २००९ साली दुसर्यांदा बांगलादेशच्या पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी या आंतरराष्ट्रीय गुन्हे लवादाची स्थापना केली होती. बांगलादेशच्या स्वातंत्र्ययुद्धादरम्यान २०-३० लाख लोकांच्या हत्या झाल्या. चार-पाच लाख महिलांचे शीलहरण करण्यात आले. यामध्येही तेथील हिंदूंचे सर्वाधिक हाल झाले. कोट्यवधी लोकांना घर आणि देश सोडून जावे लागले. या लवादाद्वारे बांगलादेश स्वातंत्र्य लढ्यातील युद्ध गुन्हेगारांवर जलद गतीने खटले चालवून अनेकांना फाशी किंवा जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. मोहम्मद युनूसच्या मार्गदर्शनाखाली काम करणार्या अंतरिम सरकारने याच लवादाकडून शेख हसीनांना शिक्षा ठोठावली आहे. शेख हसीनांना शिक्षा होणार हे अपेक्षित असले, तरी निकालाची वेळ महत्त्वाची आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये बांगलादेशमध्ये निवडणुका होणे अपेक्षित आहे.

शेख हसीना यांच्या अवामी लीग या पक्षाला या निवडणुका लढण्यास बंदी घातली आहे. १९७१ साली बांगलादेशला स्वातंत्र्य मिळाल्यापासून जो काही काळ तिथे लोकशाही नांदली, त्यात अवामी लीग सर्वाधिक काळ सत्तेवर होती. शेख हसीना १९९६ ते २००१ आणि २००९ ते २०२४ अशी सुमारे २० वर्षे पंतप्रधान होत्या. त्यांच्या सरकारनेही तत्कालीन विरोधी पक्षनेत्या आणि माजी पंतप्रधान बेगम खालिदा झिया यांच्याविरोधात भ्रष्टाचाराच्या प्रकरणात खटला दाखल करून त्यांना सात वर्षांची शिक्षा ठोठावली होती.

नरेंद्र मोदी २०१४ साली पहिल्यांदा पंतप्रधान झाल्यानंतर भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंधांमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर सुधारणा झाली. (पान ४ वर)

# पाकिस्तानचा जिहादी उन्माद



> पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी पुन्हा एकदा युद्धाची भाषा करत, भारत आणि तालिबान या दोन्ही आघाड्यांवर लढण्याची तयारी दाखवली आहे. त्यांच्या या विधानाला फारसे गांभीर्याने घेण्याचे कारण नाही, पण हे वक्तव्य पाकिस्तानच्या आजच्या राजकीय व सामाजिक वास्तवाचे अत्यंत अचूक दर्शन घडवते. कारण, पाकिस्तानात लोकशाही, अर्थव्यवस्था आणि जनजीवन या तिन्ही आघाड्यांवर अभूतपूर्व संकटं ओढावलेली असताना, युद्धाच्या वल्गनेतून सरकार जनतेचं लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहे. पाकिस्तानच्या इतिहासाकडे पाहिलं, तर हे काही नवीन नाही. या देशाने लढलेली सर्व युद्धं ही स्वतःच्या संरक्षणासाठी नव्हती; ती दुसर्या देशाचे भूभाग काबीज करण्यासाठी किंवा धार्मिक कट्टरवादाला चालना देण्यासाठीच होती. काश्मीरचा दुराग्रह, 'जिहाद'चा वापर आणि दहशतवादी संघटनांना मिळणारा राजकीय पाठिंबा हेच पाकिस्तानच्या राजकारणाचे केंद्रबिंदू राहिले आहेत.

वेधक
कौस्तुभ वीरकर

दोन बाजूंच्या युद्धाच्या वल्गना करणा पकिस्तानची राजकीय स्थिती तर अधिकच चिंताजनक आहे. आज पाकिस्तानात निवडून आलेले नेतृत्वाला दुय्यम करून, जनरल असीम मुनीर हे जवळपास लष्करी हुकूमशहाच्या भूमिकेत आले आहेत.

कमकुवत न्यायालयीन यंत्रणा, दुबळी संसद आणि विरोधकांवर सुरू असलेली दडपशाही हीच पाकिस्तानच्या राजकारणाची पद्धत झाली आहे. स्वतःच्या जनतेच्या मूलभूत अधिकारांना चिरडणे हाच आजवरचा पाकिस्तानी सैनिकांचा सर्वांत मोठा 'पराक्रम' ठरावा. कोणत्याही देशातील सैन्याचे काम सीमांचे रक्षण करणे हेच असते; परंतु पाकिस्तानात सैन्याने सर्वांत जास्त ताकद स्वतःच्या नागरिकांवरच वापरली आहे.

या राजकीय अराजकतेसोबतच पाकिस्तानची अर्थव्यवस्था खोल खाईत कोसळली आहे. परकीय कर्ज प्रचंड वाढले आहे आणि महसुलापेक्षा कर्जफेडीवर अधिक खर्च होत आहे. महागाई इतकी उसळली आहे की रोजच्या गरजेच्या वस्तूही सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहेत. आर्थिक परिस्थितीबरोबरच पाकिस्तानातील सामाजिक परिस्थितीही ढासळलेली आहे. रोजगाराच्या संधी कमी होत गेल्याने युवकांची, महिलांची परिस्थिती तर आणखीनच कठीण आहे.

सुरक्षिततेचा अभाव, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि सामाजिक बंधनांच्या जोखडात त्यांचे जीवन अधिकच कठीण झाले आहे. देश अशा गंभीर परिस्थितीत असताना, पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांनी युद्धाची वल्गना करणे, हा वास्तवातल्या संकटांवर पांघरुण घालण्याचाच प्रयत्न आहे. (पान ४ वर)

विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**

# रेको दिकमधला खजिना आणि अमेरिका

‘एप्रिल २०२५ मध्ये पहलगाम हत्याकांड घडवून पाकने भारताची कुरापत काढली. मे २५ च्या पहिल्या आठवड्यात भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकला जबर दणका देऊन सगळ्या जगालाच चकित करून सोडले. पण जून २५ मध्ये अमेरिकी माध्यमांनी प्रसिद्ध केलेली चित्रे पाहून जग पुन्हा चकित झाले. पाकचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल मुनीर हे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यासोबत व्हाईट हाऊसमध्ये भोजन घेत आहेत. सप्टेंबर २५ मध्ये पुन्हा चित्रे झळकली. फील्ड मार्शल मुनीर, पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि ट्रम्प हास्यविनोद करीत आहेत. मुनीर ट्रम्प यांना तांबे आणि सोने यांनी भरलेली एक संदूक दाखवत आहेत. जाणून घेऊ या प्रकरणाबद्दल...’






२४ नोव्हेंबर २०२२ रोजी लेफ्टनंट जनरल असीम मुनीर यांना बढती मिळून ते जनरल बनले. याला लष्करी भाषेत ‘फोर स्टार जनरल’ असे म्हटले जाते. खरे म्हणजे २७ नोव्हेंबर २०२२ या दिवशी मुनीर रीतसर सेवानिवृत्त होणार होते, पण त्यांची मुदत वाढवली जाऊन २९ नोव्हेंबर २०२२ रोजी त्यांना चीफ ऑफ आर्मी स्टाफ लष्करप्रमुख पदावर बसवण्यात आले.

पाकिस्तानच्या इतिहासातला हा पहिला सेनाप्रमुख; ज्याने त्या पदावर येण्यापूर्वी पाकिस्तानी लष्करी गुप्तहेर खाते आणि आय.एस.आय. उर्फ इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स अशा दोन्ही गुप्तहेर संघटनांचा प्रमुख म्हणून काम केलेले आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये पुन्हा एकदा मुनीर यांची निवृत्ती पुढे ढकलून त्यांना तीन ते पाच वर्षांसाठी सेवेत ठेवण्यात आले.

आता एवढ्या मोठ्या क्षमतेचा सेनापती पाकने सेवेत कायम ठेवला, बढती देऊन नावलौकिकाला चढवला, तर त्याने पाकसाठी काहीतरी कामगिरी करून दाखवायलाच हवी. आता पाक लष्करप्रमुख आपल्या अक्कल हुशारीचा दिमाख दाखवणार म्हणजे काय करणार? तर, एक म्हणजे पाकच्या अंतर्गत बलुची, सिंधी इत्यादी बंडखोर मुसलमानांना चेपणार; दुसरे म्हणजे नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका, म्यानमार इत्यादी छोट्या आणि चीन या मोठ्या शेजाऱ्यांना सतत भारताविरुद्ध चिथावत राहणार आणि तिसरे म्हणजे भारतपाक सीमेवर उघडपणेच भारतविरोधी कारवाया करत राहणार. भारताचा सतत द्वेष करीत राहणे हेच मुळी पाक नेतृत्वाचे एकमेव जीवितकार्य आहे. त्यांच्या कार्यसूचीवरअजेंड्यावर दुसरे कोणतेही कलम नाहीच. त्यामुळे त्यांचा लष्करप्रमुख तोच कार्यक्रम पुढे नेणार. तर, नोव्हेंबर २०२४ मध्ये दुसऱ्यांदा कार्यवाढ मुदत मिळण्यापूर्वीच ऑगस्ट २०२४ मध्ये मुनीर यांच्या हस्तकांनी बांगलादेशमधल्या असंतुष्ट लोकांना उचकावून शेख हसीना यांचे सरकार कोसळविण्यात यश मिळविले. अशीही शक्यता आहे की, ऑगस्टमधल्या या यशामुळेच नोव्हेंबरमध्ये मुनीर यांना मुदतवाढ मिळाली.

कदाचित यामुळे प्रोत्साहन मिळून मुनीर यांच्या हस्तकांनी एप्रिल २०२५ मध्ये काश्मीरच्या पहलगाममध्ये हिंदू पर्यटकांची कत्तल केली. याचा परिणाम मात्र भलताच झाला. मे २०२५ मध्ये भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे कमालीचा तिखट जबाब दिला. आतापर्यंत बाहेर आलेल्या माहितीनुसार ७ मे पासून पुढे चार दिवस भारतीय वायुदलाने पाकमध्ये खोलवर मुसंड्या मारून पाकच्या पेकाटात सणसणीत लाथा हाणल्या.

गंमत म्हणजे तरीही २२ मे २०२५ या दिवशी पाक सरकारने जनरल मुनीर यांना फील्ड मार्शल ही पदवी दिली. जनरल हा वयानुसार सेवानिवृत्त होतो. फील्ड मार्शल हा आजीवन सेवेत आहे, असे मानले जाते. तर, २२ मे रोजी फील्ड मार्शल बनलेले मुनीर १८ जून २०२५ रोजी व्हाईट हाऊसमध्ये पोचले आणि त्यांनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यासोबत दुपारचे जेवण घेतले. घटनाक्रम एवढ्यावरच थांबला नाही. २५ सप्टेंबर २०२५ रोजी फील्ड मार्शल मुनीर यांच्यासोबत पाक पंतप्रधान शाहबाज शरीफ हे ही व्हाईट हाऊसमध्ये पोचले. राजशिष्टाचारानुसार एखाद्या देशाचा पंतप्रधान किंवा राष्ट्राध्यक्ष जेव्हा व्हाईट हाऊसला भेट देतो, तेव्हा सर्व माध्यमांना रीतसर आमंत्रण दिले जाते. पाहुण्या राष्ट्रप्रमुखांची आणि अमेरिकन राष्ट्राध्यक्षांची संयुक्त मुलाखत आयोजित केली जाते. काही महत्त्वाचे करारमदार होणार असतील, तर त्या समारंभात माध्यमांना मुद्दाम प्रवेश दिला जातो. शरीफ-मुनीर आणि ट्रम्प यांच्या भेटीत यातले काहीही करण्यात आले नाही. माध्यमांना फक्त चित्रे प्रसिद्धीसाठी देण्यात आली. एका चित्रात मुनीर ट्रम्प यांना एक संदुक दाखवत आहेत. तिच्यात विशिष्ट प्रकारचे दगड दिसत आहेत. कसले आहेत हे दगड? त्या दगडांमध्ये तांबे आणि सोने आहे. पाकच्या बलुचिस्तान प्रांतातल्या रेको दिक इथल्या खाणीतले ते दगड आहेत. या खाणीत इतके अपरंपार तांबे आणि सोने आहे की, उत्खनन करायला सुरुवात केल्यापासून पुढची किमान ४० वर्षे त्या खाणीतून वर्षाला २ लाख टन तांबे आणि ६ लाख टन सोने (दोन्ही धातू कॉन्सेंट्रेट स्वरूपात) एवढे उत्पादन होऊ शकेल. वैज्ञानिकांच्या सध्याच्या अंदाजानुसार ही सोन्याची जगातली सर्वात मोठी पाचव्या क्रमांकाची खाण आहे.

वैज्ञानिकांना असेही वाटत आहे की, प्रत्यक्ष खोदाईला सुरुवात केल्यावर कदाचित ही जगातली प्रथम क्रमांकाची खाण बनू शकेल. म्हणजे लक्षात येताय का? जगातली सर्वात मोठी सोन्याची नि तांब्याची खाण आपल्या प्रदेशात आहे, हे अचानकपणे पाकच्या लक्षात आलेय. तसे अगदी अचानक नव्हे. २०१० सालापासूनच अनेक युरोपीय कंपन्यांचे लक्ष रेको दिकवर आहे.

वांधा असा आहे की, रेको दिक हे ठिकाण बलुचिस्तान प्रांताच्या म्हणजेच पाकिस्तानच्या आणि इराण नि अफगाणिस्तानच्या सरहद्दीच्या अगदी जवळ आहे. रेको दिकच्या खाणीतून तांबेयुक्त आणि सोनेयुक्त माती खणून बाहेर काढल्यावर ती पुढच्या प्रक्रियेसाठी बाहेर नेणार कशी? सोबतचा नकाशा पहा. रेको दिकपासून जवळचे बंदर आहे ग्वादार. ते चीनच्या व्यवस्थापनाखाली आहे. म्हणून पाश्चिमात्य कंपन्यांना ते नको आहे.

दुसरा पर्याय आहे, तो अर्थातच रेल्वेचा. रेको दिकपासून रेल्वेने प्रांतिक राजधानी क्वेटा शहरापर्यंत आणि तिथून कराची बंदराचे जोड बंदर असलेल्या कासीम बंदरापर्यंत रेल्वेने ही समृद्ध माती आणायची तर १ हजार ३३० किमी एवढे अंतर आहे. म्हणून आतापर्यंत कोणतीही कंपनी हा प्रकल्प हातात घ्यायला तयार नव्हती. पण आता बॅरिक मायनिंग कॉर्पोरेशन या बड्या कॅनेडियन कंपनीने हे काम हाती घेतले आहे. सुरुवातीची जुळवाजुळव चालू झाली असून २०२८ पर्यंत प्रत्यक्ष उत्पादन सुरू होईल, असा अंदाज आहे. आता यातले ५० टक्के भांडवल कंपनी गुंतवणार आहे. उरलेले ५० टक्के हे पाकिस्तान केंद्र सरकार २५ टक्के आणि बलुचिस्तान प्रांत सरकार २५ टक्के, असे गुंतवायचे ठरले आहे. एकूण प्रकल्प ६.६ दशकोटी डॉलर्सचा आहे. म्हणजेच ३.३ दशकोटी डॉलर्स पाकला उभे करायचे आहेत. शिवाय अफगाणिस्तान, इराण आणि खुद्द बलुचिस्तान प्रांतातली राजकीय स्थिती कमालीची अस्थिर आहे.

‘इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्स ॲन्ड पीस’ नामक आर्थिक सर्वेक्षण करणाऱ्या एका संस्थेने पाकिस्तानला, अतिरेकी कारवायांनी अशांत असलेला जगभरातला दुसऱ्या क्रमांकाचा देश घोषित केले आहे. (पहिल्या क्रमांकावर बुर्किना फासो हा आफ्रिकन देश आहे.) बरे, ज्या रेल्वे मार्गाने ही धातुसमृद्ध माती कासीम बंदरापर्यंत येणार, तो मार्ग धड आहे का? तर नाही. पाक राज्यकर्त्यांनी जो काही थोडाफार अंतर्गत विकास घडवलाय, तो फक्त पंजाब प्रांतात आणि कराची हे बंदर सिंध प्रांतात असल्यामुळे थोडाफार सिंध प्रांतात झालेला आहे.

क्वेटा शहर हे इंग्रजी कालखंडापासून लष्कराचे महत्त्वाचे ठाणे असल्यामुळे तिथून इस्लामाबादच्या दिशेने रस्ते, रेल्वे बऱ्यापैकी आहेत. बाकी अवघा आनंदीआनंद आहे. अशा स्थितीत ते उरलेले ५० टक्के भांडवल उभे करायला पाकला कोण मदत करणार? आणि हे सगळे चित्र चीन शांतपणे बघत राहील का? मग आता, अनाथांचा नाथ, भक्तांचा कैवारी, दीनदुःखितांचा एकमेव वाली कोण राहिला? अमेरिका, म्हणजेच ट्रम्प तात्या. त्यासाठी त्या जून आणि सप्टेंबरमधल्या भेटी होत्या. समझ गये बर्खुरदार? (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

सुखात्म

**डॉ. अविनाश मोहरील**

# निदान एक खांदा हवा!



दामोदरचे व्यक्तिमत्त्व सर्वांनाच आवडायचे. अतिशय उत्साही असलेला दामोदर खरे तर आमच्यासाठी दामू होता. अगदी महाविद्यालयीन काळापासून दामू जीवनाचा प्रत्येक क्षण मनापासून जगतोय असे वाटायचे. त्याचे अस्तित्व प्रत्येकच ग्रुपमध्ये चैतन्य निर्माण करायचे. अनेक गुण त्याच्या ठायी होते. अक्षर अतिशय छान होते. अनेकांच्या नकला करणे त्याला लीलया जमायचे. कवितांचा फॅन होता तो. गुलजार तर संपूर्ण पाठ होते. सगळे जण बसले असताना अचानक गुलजारच्या ओळी ऐकवून त्यावरचा त्याला भावलेला पॉईंट ऑफ व्ह्यू सांगण्यात त्याला मजा वाटायची.

गुलजार ज्या तरलतेने लिहायचे त्याच तरलतेने आवाजाचे चढ-उतार करून त्या ओळींचा परिणाम साधण्यासाठी तो प्रयत्न करायचा. त्याचे सोबत असणे फार सुखकारक असायचे. आमच्या ग्रुपमध्ये त्याच्या त्या कवितांचीच मजा असायची. विशेषतः आमच्या ट्रेकिंग ग्रुपचे कॅम्प फायर आटोपल्यावर जेव्हा सारे धुमाकूळ घालून शांत झाले की, मग दामूची मैफल असायची. वेगवेगळ्या कवींच्या कविता, त्यावरचे त्याचे विवेचन, कवितांमध्ये दडलेले गर्भितार्थ हळुवारपणे जेव्हा उलगडत जायचे तेव्हा टिपूर चांदण्यांनी भरून गेलेल्या आभाळातील काही नक्षत्रे आमच्या सभोवताली पिंगा घालू लागायचे. निसर्गाबद्दल हे असे वाटणे हा दामूच्याच सहवासाचा परिणाम. एक असेच गेट-टु-गेदर आणि त्यानंतर दामूने उलगडलेले गुलजारची एक अप्रतिम कविता आठवते. कडाक्याच्या थंडीतले ट्रेकिंग गेट-टु-गेदर. शेकोटीच्या सभोवताली सर्व मित्र-मैत्रिणी बसलेले. हातात एका मित्राने सर्वांसाठी बनविलेले टोमॅटो सूपचे कप्स होते. गरम कप ओंजळीत घेऊन हाताना ऊब मिळवित व गरमागरम सूपचा आस्वाद घेत आम्ही सर्वजण शांत बसलो होतो. कारण दामू उलगडत होता गुलजारचे एक काव्य जे आपल्यापैकी प्रत्येकाच्या जीवनाशी निगडित आहे.

**तुम इतना जो मुस्कुरा रहे हो, क्या ग़म है जिस को छुपा रहे हो**

या ओळींबद्दल दामू जे बोलला ते आजही तसेच्या तसे मनात आहे. दामू म्हणाला होता, माणसाचे जीवन आणि मन हे दोन्हीही अतर्क्य घटनांनी आणि विचारप्रवर्तनांनी व्याप्त असते. माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार केला तर तो किंवा ती स्वतःपुरते राजा किंवा राणी असतात. जगताना जसे आपण इतरांबद्दल मते बनवितो व त्यानुसार आपल्या वागण्याच्या दिशा ठरतात. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्ती स्वतःबद्दल मत बनवित जातो व त्यामधून त्याच्या स्वतःबद्दलच्या समजुती विशिष्ट पॅटर्ननुसार बदलत जातात. काही व्यक्ती आपल्या मनातील भाव सहजपणे व्यक्त करीत जातात व त्यांना मैत्री करण्यास अजिबात त्रास होत नाही. काही मंडळी आपल्या मनातले काहीच चेहऱ्यावर येऊ देत नाहीत. त्यांच्या मनात अनेक विचार असतात, परंतु त्यांना आपल्या मनातले विचार कुणालाही सांगणे जमत नाही किंवा त्या विचारांचा निचरा ते वेगळ्या पद्धतीने करीत असतात. बरेच वेळा त्यांना व्यसनांचा आधार मिळतो व त्यामुळे त्यांना माणसांची गरज पडत नाही. पण या दोन व्यक्तिमत्त्वांपेक्षा एक तिसरे व्यक्तिमत्त्वदेखील असते. ते व्यक्तित्व असलेली मंडळी फारच वेगळी व गूढ असतात. त्यांनी स्वतः भोवती एक कोष निर्माण केलेला असतो. त्यांच्या मनात अनेक गोष्टी असतात, पण हे देखील आपल्या मनातले विचार फारसे व्यक्त करीत नाही; पण त्यांच्या चेहऱ्यावर ते दिसतात. त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव व त्यामागील त्यांचे भावविश्व ओळखणारी व्यक्ती त्यांना हवी असते. अशा व्यक्तीच्या ते कायम शोधात असतात. अशा व्यक्तिमत्त्वाच्या प्रत्येकालाच अशी व्यक्ती मिळते असे नाही, परंतु जेव्हा ती मिळते तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरच्या हास्यामागील वेदना ओळखून ती म्हणते,

**‘तुम इतना जो मुस्कुरा रहे हो, क्या ग़म है जिस को छुपा रहे हो...’**

असे छान छान सांगून दामूने जेव्हा परत कवितेच्या समेवर आम्हाला आणले तेव्हा प्रत्येकाच्या तोंडून एकच उद्‌गार निघाला- ‘क्या बात है...!’ त्यानंतर दामू जे वाक्य बोलला ते कायम स्मरणात राहणारे होते. दामू म्हणाला, ‘जिवंतपणी माणसाचे कर्तृत्व असे असावे म्हणतात की, त्याला मृत्युपश्चात निदान चार खांदे मिळावेत. परंतु, जीवन जगत असताना किमान एक जरी समर्थ खांदा मिळाला तरी जीवन सार्थकी होते. लोकांना दाखविण्यासाठी आपल्या चेहऱ्यावर आपण जाणीवपूर्वक आणलेल्या हास्याच्या मागे कधी कधी असलेली वेदना ओळखणाऱ्या व्यक्तीचा खांदा मिळणे, ही एक मोठी उपलब्धी असते. गुलजारच्या एका अप्रतिम काव्याला आमच्या मनात कायमस्वरूपी स्थापित करण्याची किमया दामू करून गेला. साधारण १५ वर्षांनतर दामूची बंगळुरूला भेट झाली. त्याच्या सुंदर फ्लॅटमध्ये त्याचे सुंदर पद्धतीने स्थापित झालेले आयुष्य बघून आनंद वाटला. त्याचे सारे काही नेहमीप्रमाणेच होते. धमाल, मस्ती मुलांसोबतचा त्याचा वावर, त्याच्या कार्यालयात त्याच्या नेतृत्वात काम करणारी त्याची टीम वगैरे सारे काही दामू स्टाईलमध्येच होते. आई गेल्यानंतर तो त्यांची कशी योग्य काळजी घेतोय हे देखील सांगितले. बायको खुश होती. मी दामूचा खूप जवळचा मित्र आहे म्हणून तिने विशेष माझ्या आवडीचा स्वयंपाक केला होता. दामूचे सारे काही फारच उत्तम होते, परंतु त्याच्या त्या हसण्याला एक वेगळा आशय होता, असे मला सहजच जाणवून गेले. रात्री सर्वांना गुड नाईट करून आम्ही त्याच्या फ्लॅटच्या टेरेसवर आमच्या गप्पा करायला बसलो.

गाण्याचा, कवितांचा विषय निघालाच होता. मी देखील माझ्या विद्यार्थ्यांना गुलजारचे वेड लावतोय, असे त्याला सांगितले. गुलजारचे ‘रात पश्मिने की’ पुस्तक त्याच्यासाठी नेले होते. गप्पा रंगात आल्यावर मी त्याला सहजच विचारले, ‘‘दामू, एक विचारू, तुम इतना जो मुस्कुरा रहे हो, क्या गम है जिसको छुपा रहे हो!’’ आतापर्यंत मस्त मस्तीत वावरत असलेला दामू अचानक माझ्या वाक्याने चमकला. मला खात्री होती, त्याला ते ट्रेकिंग गेट-टु-गेदर, ती कविता, त्याचा अर्थ सारे काही आठवले असणार. ‘दामू, क्या गम है जिसको छुपा रहे हो..’ बघता बघता त्याच्या डोळ्यात पाणी दाटून आले. मी माझी खुर्ची त्याच्या जवळ ठेवली आणि त्याचे डोके आपल्या खांद्यावर ठेवून घेतले. मनसोक्त रडू दिले दामूला. गेली अनेक वर्षे कसले तरी ओझे मनावर घेऊन त्याचा आभासही कुणाला न होऊ देता तो जगत होता, याची जाणीव मला त्याच्या हाताला सुटलेल्या कंपावरून जाणवली. मला जाणवले, आज त्याला मोकळे व्हायचे होते. त्याच्या खाजगी आयुष्यातील एक प्रचंड मोझे ओझे मनावर घेऊन तो जगत होता. कुणालाही ती बाब सांगता येणे शक्यच नव्हते. परंतु मला दामूची कमाल वाटली की, एवढे मोठे दडपण त्याच्या मनावर असूनही सारे काही आलबेल आहे, हे दाखविण्याची किमया तो गेली १५ वर्षे करीत होता. सारे सांगून मोकळे झाल्यावर डोळे पुशीत तो म्हणाला, ‘‘अव्या आठवतंय, त्यावेळी म्हणालो होतो की, जीवन जगण्यासाठी एक खांदा तरी निदान हवा! आज तुझा मिळाला.’’ मी त्याला म्हणालो, ‘‘माझे भाग्य आहे की, मला तुझ्यासारखा मित्र मिळाला. गुलजार खरोखरीच तुलाच कळलाय! आम्ही तर केवळ वाचन करतोय. इतके दिवस दडपण मनावर ठेवण्यापेक्षा फोनवर का नाही बोललास?’’ त्यावर दामू म्हणाला, ‘‘माझ्या अंतःस्थ मनातील ही इतकी तीव्र वेदना ऐकल्यावर तू माझा हात हातात धरून आणि माझे डोके तुझ्या खांद्यावर ठेवून मला थोपटलेस, त्या स्पर्शाची सर फोनवरील संभाषणाला येऊ शकेल का? प्रत्यक्ष तुझ्या खांद्याचा आधार मिळाला म्हणूनच मी शांत होऊ शकलो, अन्यथा त्या वेदनेची धग कायम राहिली असती...’’ त्यानंतर दोघे काहीही बोललो नाही. त्या विषयावर पुन्हा कधीच बोलायचे नाही, हे आम्ही दोघांनीही ठरविले. रात्रीच्या त्या शांत प्रहरी गुलजारची तीच कविता जगजीत सिंह गात होते... ‘रेखाओं का खेल है मुकद्दर, रेखाओंसे मात खा रहे हो जिन जख्मों को वक्त भर चला है, तुम क्यूँ उन्हे छेडे जा रहे हो क्या गम है जिसको छुपा रहे हो, तुम इतना जो मुस्कुरा रहेहो।’

---

संस्कारांच्या देशा

**रमा गोळवलकर**

# विवाह - ३ कन्यादान



सनातनी विवाह विधींतल्या कन्यादान या विधीविषयी विचार करायला आपण मागच्या लेखात सुरुवात केली. माता-पित्याला आपल्या कन्येच्या भविष्याविषयी वाटणारी काळजी, त्यातून तिच्या तारुण्य, प्रौढ आणि वृद्धावस्थेत सोबत म्हणून एक सुविद्य, सद्‌गुणी, सक्षम असा जोडीदार असावा, अशी इच्छा करणं काही वावगं नाही. त्या चिंतेतूनच हा विधी उद्‌भवला आहे, यात शंका घ्यायला किंचितही वाव नाही.

कुटुंब व्यवस्था अमान्य असलेल्या विचारसरणीनं या हृद्य विधीची अवहेलना केली आहे. यातला नेहमी चर्चेत ठेवलेला बिंदू म्हणजे लग्न झाल्यावर बाईला खूप तडजोडी कराव्या लागतात. स्वभावाला मुरड घालावी लागते. ही वस्तुस्थिती असली, तरी तिचं वर्णन करताना स्त्रीजातीला जाचक अशी शोषण करणारी परिस्थिती आहे, असं स्त्रीवर्गाच्या मनावर बिंबवून त्यांना भुलवलं आणि झुलवलं जातं. इस्लामी आक्रमणाचे सर्वात जास्त परिणाम स्त्रियांना भोगावे लागले, हे सप्रमाण सिद्ध करता येतं. त्या आधी ज्याप्रकारची जीवनशैली स्त्रिया जगत त्याहून सर्वस्वी भिन्न विचार करणाऱ्या लोकांनी गाजवलेल्या सत्तेमुळे स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलला. त्यामुळे लग्न होऊन घरात आलेली सून ही गृहलक्ष्मी/गृहस्वामिनी नसून बटिक आहे, अशाच आविर्भावात सासरची मंडळी वावरत. साहजिकच विवाहानंतर स्त्रीच्या जीवनात होणारा आमूलाग्र बदल हा जाचक ठरला, हे सारं खरंच आहे. त्यामुळे सनातनी विवाहात स्त्रीचं शोषण होतं हे सांगण्याचा सपाटा या डाव्या वाळवीनं लावला आहे. तरीही नैर्ऋत्य भारतात केरळ आणि ईशान्य भारतात मेघालय, मणिपूरसारख्या राज्यांत पुरुष लग्न होऊन सासरी जाण्याची परंपरा आहे.

आधुनिक पाश्चात्त्य समाजशास्त्र्यांसाठी हे कल्पनेच्या पलीकडचं होतं, आहे. समाज व्यवस्था पितृसत्ताक असल्याचं लेबल लावत असतानाच भारतात मात्र मातृसत्ताक पद्धतीही अस्तित्वात आहे, हे त्यांना आवर्जून सांगावंच लागतं. हा बुद्धिभ्रम आहे. वस्तुस्थिती आहे ती अशी ङ्कस्त्री प्रवृत्ती परिवर्तनशील असते. तिच्या शरीरातल्या संप्रेरकांची पातळी दर दिवशी बदलत असते. त्यातूनच मासिकचक्राचा उद्‌भव होतो. रचनात्मकता हा स्त्रैणत्वाचा दुसरा गुणधर्म. सतत नावीन्याचा ध्यास असतो.

नवनवीन प्रयोग करून बघायला उत्साहानं आणि उल्हासानं पुढे सरसावणं नवनवे प्रयोग करून पाहणं हा स्थायीभाव. त्यामुळे लग्न होऊन सासरी जाणं, नव्यानं आयुष्य सुरू करणं, नव्या कुटुंबातल्या नव्या नात्यांना जोडणं, मातृत्वासारखी अनेकदा येणारी वळणं, आयुष्यातल्या इतर सगळ्या वळशा-वेलांट्या धैर्यानं पार करण्याचे प्रसंग तिच्या उपजत स्त्रीत्वाला पोषकच असतात. त्यात असलेल्या विविध आव्हानांना लीलया पेलण्याचं जन्मजात सामर्थ्य परिवर्तनाभिमुख प्रकृती असलेल्या स्त्रीमध्ये असतंच. त्यामुळे लग्न होऊन सासरी जाणं हे तिच्या पथ्यावरच पडतं. म्हणूनच देवीचं एक विशेषनाम ‘नित्यानित्यस्वरूपिणी’ असं आहे. नित्यानित्यस्वरूप या शब्दावर श्लेष (एकाच शब्दाचे दोन अर्थ) साधता येऊ शकतो. जिचे स्वरूप नित्य (शाश्वत) आणि अनित्य (अशाश्वत) आहे अशी ती. हा द्वंद्व समास झाला, पण त्याची फोड नित्य अनित्या आहे अशी परिवर्तनशालिनी हा विशेषण पूर्वपद कर्मधारय समासानंदेखील होते.

तिच्यातल्या या गुणांना ‘रांधा वाढा उष्टी काढा चूल मूलच करत बसा’ अशा शब्दांत खिजवलं जातं, याहून दुर्दैव ते काय. उत्तम समाज निर्माण व्हायला उत्तम कुटुंब आवश्यक आहे. त्यासाठी उत्तम कुटुंबवत्सला गृहिणींत पुन्हा एकदा त्यांचा आत्मसन्मान जागवणं अत्यावश्यक आहे. गृहकर्ती म्हणून तिचं कर्तृत्व गाजवण्याची, तिचं आयुष्य सर्वांगांनी बहरून येण्याची संधीच मातापिता कन्यादान या विधीतून देत असतात. ही सगळी प्रस्तावना एवढ्यासाठीच की, पृथ्वीवर इतरत्र कुठेही नाहीत इतके विवाहाचे प्रकार सनातनी परंपरेत मान्य करण्यात आलेले आहेत.

एकूण आठ प्रकारचे विवाह प्रथा या भूमीत गेल्या अनेक सहस्रकांपासून चालत आलेली आहे. या सूचीत दिलेले पहिले चार विवाह प्रकार चांगले या शीर्षकांतर्गत आणि उरलेले चार फारसे चांगले नाही यात येतात. तरीही त्यांना विवाह याच श्रेणीत ठेवण्यात आलेलं आहे आणि त्यातून उत्पन्न झालेल्या संततीला औरसच मानण्यात येतं.

**१) ब्राह्म विवाह:** वर आणि वधू दोन्ही कुल-शील-गोत्र-आयु-योग्यता इत्यादी बाबतीत तोलामोलाचे असतात. दोघांच्या कुटुंबांच्या सहमतीनं, संमतीनं, वैदिक विधी आणि प्रथांचं निर्वहन करत संपन्न होतो.

**२) दैव विवाह:** यज्ञात ऋत्विज होता (ऋक, अर्ध्वर्यू (यजु), उद्‌गाता (साम), ब्रह्मा (अथर्व)) म्हणून कार्य करणाऱ्यास यज्ञाच्या यजमानानं दक्षिणा म्हणून आपली मुलगीच देणं.

**३) आर्ष विवाह:** वरानं, वधुपित्याला वधुशुल्क म्हणून गोधन (एक किंवा दोन गायी-नंदी) देणं.

**४) प्रजापत्य विवाह:** यात धार्मिक विधी आणि तर कर्तव्यं संपन्न करता यावीत म्हणून कन्येचा पिता वराला आपली कन्या दान करतो. यात कोणतीही आर्थिक देवाणघेवाण होत नाही.

**५) असुर विवाह:** यात वधुशुल्क म्हणून वधुपित्याला धन आणि संपत्ती देऊन वर वधूला प्राप्त करतो.

**६) गंधर्व विवाह :** वर आणि वधू पृथ्वी, आकाश आणि आसपासच्या निसर्गाला साक्षी ठेवून एकमेकांना वरतात. यात माता-पित्याची संमती आणि सहमती आवश्यक नसते.

**७) राक्षस विवाह :** जेव्हा वर, कन्येच्या कुटुंबीयांच्या आणि अनेकदा स्वतः कन्येच्या मनाविरुद्ध तिचं अपहरण करून तिच्याशी विवाह करतो त्याला राक्षस विवाह म्हणतात. यात वधूसकट वधूच्या नातेवाईकांवर बलप्रयोग होणं, त्यांचा अपमान होणं, शारीरिक क्षती किंवा हत्यादेखील होऊ शकते.

**८) पैशाच विवाह:** हा विवाह प्रकार सर्वात निम्न आणि निंदनीय आहे. मादक पदार्थाच्या प्रभावात असलेल्या, गाढ झोपेत असलेल्या किंवा मानसिकदृष्ट्या अस्थिर, असंतुलित तरुणीशी तिच्या संमतीविना शारीरिक संबंध ठेवणे.

अशा संबंधातून झालेल्या संततीला वैधता देण्यासाठी स्मृतिकारांनी त्याला विवाह म्हटले असले तरी ही त्यास निषिद्धच मानलं आहे. एकूण पहिल्या चार प्रकारच्या विवाहात कन्यादान करण्यात येतं. यानंतरच्या विवाह विधीचा विचार पुढच्या लेखात. तोवर उत्तमोत्तम सनातन संस्कारांचा अंगीकार करू या...

# लाईफ इज ब्युटीफुल



उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

मध्यंतरी एका इटालियन चित्रपटाची कथा माझ्या वाचनात आली. त्या कथेने मला आकृष्ठ करून घेतले. नंतर मी इंटरनेटवर या चित्रपटाचे संदर्भ शोधले. आणि हा चित्रपट जरी मी अजून पाहिला नसला तरी त्याच्या कथेने मला भारावून टाकले. त्या चित्रपटाचे नाव आहे 'लाईफ इज ब्युटीफुल'. या चित्रपटाने अभिनयाचे ऑस्कर सहित अनेक पुरस्कार मिळवले. या चित्रपटावर काहींनी टीका केली असली तरी जगातील सुंदर चित्रपटांपैकी तो एक आहे हे निश्चित.

काही माणसांकडे विलक्षण सकारात्मक उर्जा असते. जीवनात कितीही कसोटीचे प्रसंग आले तरी अशी माणसे विचलित न होता त्यातून काही तरी चांगले करण्याची क्षमता ठेवतात. अगदी मृत्यू समोर असला तरी ते त्याही प्रसंगाला अशा पद्धतीने सामोरे जातात की मृत्यूला देखील त्यांना सलाम करावासा वाटेल. रोबर्टो बेनिग्नी या दिग्दर्शकाचा हा चित्रपट. यातील नायकाची भूमिका त्यानेच केली आहे. दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी लाभलेल्या या चित्रपटाची थोडक्यात कथा अशी...

साधारणपणे या चित्रपटाच्या कथेचे दोन भाग करता येतील. पहिला भाग निखळ विनोदी आणि प्रेम प्रसंगांनी भरलेला आहे. याची सुरुवात होते खेडेगावातून गुडो नावाचा तरुण आपल्या काकाच्या हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करण्यासाठी येतो या प्रसंगाने. या ठिकाणी त्याची डोरा नामक सुंदर युवतीशी गाठ पडते आणि तो अक्षरशः तिच्या प्रेमात वेडा होतो. डोरा एका श्रीमंत अधिकाऱ्याशी लग्न करणार असते. गुडो हा ज्यू तर डोरा ही इटालियन. गुडो हा अत्यंत गरीब तर डोरा ही धनाढ्य कुटुंबातील. पण काहीही असले तरी आपण डोराशीच लग्न करायचे असा निश्चय गुडो करतो. शेवटी अथक प्रयत्नातून तिचे मन जिंकण्यात यशस्वी होतो. त्यांचे लवकरच शुभमंगल होते. साधारण पाच वर्षानंतर या दोघांच्या संसारवेलीवर जोशुआ नामक एक फुल फुलते. गुडो आता शहरात पुस्तकांचे दुकान चालवतो तर डोरा शिक्षिकेचे काम करते. जोशुओच्या बाललीला त्यांना मोहवून टाकत असतात.

एका बाजूला त्यांचा हा संसार फुलत असताना दुसरीकडे १९४५ चे महायुद्ध अंतिम टप्प्यात आलेले असते. जर्मनी प्रमाणेच इटलीतील ज्यू लोकांचे शिरकाण करण्यासाठी इटलीतील फॅसिस्ट सरकारने छळछावण्या उभारलेल्या असतात. दररोज शेकडो ज्यू स्त्रीपुरुष या कॅम्पमध्ये बळी देण्यासाठी नेले जात असतात. यामध्ये आपल्या चित्रपटाचा नायक गुडो, त्याचे काका आणि निरागस जोशुआ यांचाही नंबर लागतो. साक्षात मृत्यूची छाया समोर असते. या वेळी डोराला इटालियन म्हणून सुटकेची संधी असते. पण आपल्या पती आणि मुलासाठी ती स्वतःहून त्यांच्यासोबत गाडीमध्ये जाते. अशा वेळी छोटा जोशुओ हे सगळे पाहून बावरतो. तेव्हा गुडो त्याला सांगतो की, हे सगळे एका खेळाचा एक भाग आहे. यातील प्रत्येकजण खेळातील पॉईंटस मिळवण्यासाठी खेळतो आहे. तुलाही जिंकायचे असेल तर खेळाचे काही नियम पाळावे लागतील. दिवसभर लपून राहिलास तर अमुक गुण, जराही आवाज केला नाहीस तर अमुक गुण, उपाशी राहिलास तर अमुक गुण इ. जिंकलास तर खरा रणगाडा भेट म्हणून मिळेल.

बिचारा निरागस जोशुओ बापाच्या बोलण्यावर विश्वास ठेवतो. आणि त्याप्रमाणे वागतो. एकदा सैनिक मुलांना अंघोळीच्या नावाने मारण्यासाठी म्हणून घेऊन जात असतात. जोशुआला अंघोळ आवडत नाही म्हणून तो लपून बसतो आणि त्याचा जीव वाचतो. असेच एकदा सैनिक गुडोला मारण्यासाठी घेऊन जातात. यावेळी जोशुआ एका पिंपात लपून बसलेला असतो. यावेळी गुडो जोशुआकडे पाहून डोळे मिचकावतो आणि सैनिकांची नक्कल करतो. अशाही परिस्थितीत त्याची विनोदी वृत्ती आणि धैर्य कायम असते. आपण मात्र या दृश्याने हेलावून जातो. पुढे दोस्त राष्ट्रांचे सैनिक येतात आणि कैद्यांची सुटका करतात. या वेळी अमेरिकन सैनिक एका रणगाड्यावर बसवून जोशुआला घेऊन जातात बिचार्या जोशुआला आपल्याला खरा रणगाडा बक्षीस मिळाला आहे असेच वाटते. इतक्यात त्याला आपली आई दिसते आणि तो आपल्या आईकडे झेप घेतो. आईच्या गळ्यात पडून तो म्हणतो, ' मम्मा, आपण जिंकलो.' डोरो आपल्या डोळ्यातील पाणी लपवित म्हणते, ' हो बेटा आपण जिंकलो. आपल्याला किनई हजार पॉईंटस् मिळाले.' असा हा नितांतसुंदर चित्रपट. सगळ्याच्या उत्कृष्ट अभिनयाने नटलेला. जीवनातील रणरणत्या वाळवंटात सुद्धा आशेची फुले फुलू शकतात हे दाखवणारा. सकारात्मक संदेश देणारा. Life ir stanger than fiction असे म्हणतात ते काही खोटे नाही. मानवी आयुष्य हे सुंदर आहेच. त्यावर प्रेम करता आले पाहिजे. मंगेश पाडगावकरांच्या शब्दात सांगायचे तर 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे. ' फक्त तुमच्याकडे बालकासारखे निरागस मन हवे आणि गुडोसारखी अफलातून सकारात्मक दृष्टी. प्रसिद्ध शायर निदा फाजली म्हणतात, जितनी बुरी समझी जाती उतनी बुरी नही है दुनिया बच्चो के स्कूल मी तुमसे शायद मिली नही है दुनिया.

# अडला हरी...

काँग्रेसने सबुरीने घ्यावे, पळत्याच्या मागे लागून उपयोग नाही.' उबाठा गटाचे मुखपत्र असलेल्या 'सामना'च्या अग्रलेखातील हा उल्लेख. काँग्रेसने मुंबई महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतल्यामुळे उबाठा गटाच्या पायाखालची जमीन सरकली आहे, त्याचेच प्रतिबिंब या अग्रलेखातून उमटले. त्यामुळेच आता 'सामना'च्या माध्यमातून काँग्रेसला गळ घालण्याची उबाठाची केविलवाणी धडपड सुरू असल्याचे दिसते.

राजकारण
अवंती भोयर

वास्तविक, बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल पाहता, काँग्रेसने कोणते निकष डोळ्यापुढे ठेवून स्वबळाचा निर्णय घेतला, हे त्यांचे तेच जाणो. उबाठा गटाने मराठी मतांसाठी राज ठाकरे यांच्याशी युती करण्याचे निश्चित केले खरे, पण काँग्रेसला मात्र राज ठाकरे पसंत नाहीत. काँग्रेस नेत्यांनी वारंवार हे बोलूनही दाखवले आहेच. त्यामुळेच सध्या महाविकास आघाडीत 'तू तू मैं मैं' पाहायला मिळते. बरे, एवढे उदार होऊन काँग्रेसने स्वबळाची घोषणा केली, तर उबाठा गटाच्या पोटात दुखण्याचे कारण तरी काय? सध्यातरी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचे बरे चाललेले दिसते. मग, काँग्रेसच्या निर्णयाने त्यांचा एवढा तिळपापड का व्हावा?



महाराष्ट्रातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उबाठा गटाला मोठ्या प्रमाणात काँग्रेसची मुस्लीम मते मिळाली. शिवाय, याच मतांच्या भरवश्यावर वर्सोव्यात उबाठा गटाचे हारुन खान निवडूनही आले. आता तर मुंबई महापालिकेची निवडणूक म्हणजे उबाठासाठी 'करो या मरो'ची लढाई. अशावेळी काँग्रेसशी फारकत घेणे म्हणजे त्यांच्या मतांशीही फारकत घेणे आहे, हे एव्हाना त्यांना कळून चुकले असावे. त्यामुळेच 'सबुरीने घ्या' असा सल्ला देऊन एकप्रकारे काँग्रेसने स्वबळावर न लढता आमच्यासोबत लढावे, अशी गळच उबाठा गटाने घातली आहे. बरे, हे करताना बिहार निवडणुकीवरून काँग्रेसचा पाणउतारा करायलाही ते विसरले नाहीत. एखाद्याकडे मदत तर मागायची, पण मदत मागितली असे भासू द्यायचे नाही, ही उबाठा गटाची जुनीच शैली. एकंदरित, 'तुझं माझं जमेना आणि तुझ्यावाचून करमेना' अशी काँग्रेस आणि उबाठा गटाची स्थिती. या दोन्ही पक्षांचा हेकेखोर स्वभाव आणि सध्याचे चित्र त्यांना निवडणुकीत नडले, तर नवल वाटायला नको.

आभाळाएवढे मोठे मन करून काँग्रेसने मुंबई महानगरपालिका स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला. कदाचित, बिहारमध्ये तोंडावर आपटल्यानंतर किमान मुंबई महापालिकेत तरी उरलीसुरली ताकद शिल्लक राहावी, या उद्देशाने काँग्रेसने स्वबळाची घोषणा केली असावी, पण, स्वत:वर नसलेल्या विश्वासाचे काय करायचे? काँग्रेसला मुंबईत मनसे सोडून बाकी कुणीही सोबत चालणार, असे सध्याचे चित्र. मुंबईच्या विकासात प्रत्येकाचा हातभार आहे. त्यामुळे दडपशाही करणार्या किंवा कायदा हाती घेणार्या लोकांबरोबर आम्ही जाऊ शकत नाही, असे म्हणत मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी अलीकडेच मनसेशी युती न करण्याची भूमिका जाहीर केली. मात्र, दुसरीकडे मुंबईत शरद पवार यांच्याशी युती व्हावी, अशी काँग्रेसची मनोमन इच्छा आहे. त्यासाठीच काँग्रेसच्या शिष्टमंडळाने 'सिल्वर ओक'वर जात शरद पवार यांची भेटही घेतली. परंतु, काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला, तरीही त्यांना कुबड्यांची गरज का वाटते? असा प्रश्न या सगळ्या परिस्थितीतून उपस्थित होतो. वास्तविक, काँग्रेसने मुंबईत स्वबळावर लढावे यासाठी मुंबई काँग्रेसचा सर्वाधिक आग्रह आहे. हा आग्रह करण्यात वर्षा गायकवाड पहिल्या फळीत दिसतात. मात्र, जेवढ्या आत्मविश्वासाने त्यांनी स्वबळाचा नारा दिला, तेवढाच आत्मविश्वास निवडणुकीला सामोरे जाताना त्यांच्यात दिसत नाही. म्हणूनच कदाचित कुबड्यांसाठी वर्षाताईंची पळापळ सुरू आहे.

मराठीचा मुद्दा रेटत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या एकत्र येण्याने काँग्रेसची डोकेदुखी वाढली आहे. कारण, केवळ मराठी मतांच्या भरवश्यावर आपले पोट भरणार नाही, ही वस्तुस्थिती काँग्रेसला माहिती असल्याने त्यांनी ठाकरे बंधूंपासून दोन हात लांब राहण्याचा निर्णय घेतला असावा. थोडयात काय, तर संपुष्टात येणाच्या मार्गावर असलेल्या महाविकास आघाडीतील या गोंधळाचा परिणाम आगामी निवडणुकांमध्ये नक्कीच दिसेल. या सगळ्यात शरद पवार मात्र कमालीचे मौन साधून आहेत. उबाठा गटाला साथ द्यायची की, काँग्रेसचा 'हात' पकडायचा अशा द्विधा मनःस्थितीत ते आहेत. त्यामुळेच शरद पवार यांच्यापैकी कुणासोबत जातात की, आजवरचा इतिहास पाहता आणखी एखादा वेगळा प्रयोग करतात, हे पाहणे औत्सुयाचे ठरेल.

# 'ती'चे महाभारत

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

कोणताही समाज सांस्कृतिकदृष्ट्या किती प्रगत आहे, हे समजून घ्यायचे असेल तर तत्कालीन स्त्रियांचे स्थान कसे होते, याचा विचार होणे गरजेचे असते. त्यामुळे महाभारतकालीन प्राचीन समाजाचे विश्लेषण करायचे असेल तर त्यातील स्त्री व्यक्तिरेखांचा विचार करणे आवश्यक ठरते.

महाभारत काळात कृषी व्यवस्था नुकतीच आकाराला येत होती. जनपदांच्या रूपाने राष्ट्र संकल्पनेला आकार येत होता. स्त्रीचा गर्भ प्रजोत्पादनासाठी अतिशय महत्त्वाचा होता आणि त्यावर सत्ता मिळविणे ही त्यावेळच्या समाजाची गरज होती. यातूनच पुरुषप्रधान संस्कृती निर्माण झाली. त्याकाळी स्त्रीकडे पुरुषाची मालमत्ता म्हणून जरी बघितले गेले तरी महाभारतातील स्त्रीने तिच्या

हुशारीचा युद्धात खुबीने वापर केला आणि राजकारणात बुद्धिबळाच्या डावातील प्यादी स्वतःच्या मर्जीनुसार फिरविली. महाभारतातील कुटुंबात मुलगी होणे सर्वमान्य होते. मुलीचा जन्म कोणी नाकारला आहे किंवा मुलीच्या जन्मानंतर शोक केला आहे, असा एकही उल्लेख महाभारतात आढळत नाही. मुलगी हवी असणे ही गोष्ट गांधारीच्या कथेत दिसते. व्यास वर देतात आणि गांधारीला शंभर मुलगे होतात. त्यानंतर तिने व्यासांकडे एका कन्येचीसुद्धा मागणी केली. मुलगी झाली तर कन्यादानाचे पुण्य मिळेल आणि तिच्या सासरकडून तिला व धृतराष्ट्राला योग्य नातेवाईक मिळतील, असा गांधारीचा उद्देश असावा.

प्राचीन महाभारत काळातदेखील मुलींचे कोडकौतुक व्हायचे. त्यांचे लडिवाळ हट्ट पुरविले जायचे. देवयानी ही शुक्राचार्य यांची मुलगी त्यांना फार लाडकी होती. पिता म्हणून शुक्राचार्यांनी तिचा प्रत्येक हट्ट पूर्ण केला. शेवटी कचाला मारून त्याची राख शुक्राचार्यांना पाजली त्यावेळेससुद्धा देवयानीसाठी शुक्राचार्य प्राण गमवायला तयार झाले आणि कचाला जिवंत करण्यात आले. विराट पर्वत विराट राजाच्या दरबारी युद्धासारख्या गंभीर विषयावर व्यूहनीती ठरत होती.

त्यावेळी उत्तरा दरबारात येते आणि विराट राजाजवळ लडिवाळ हट्ट धरते की, शत्रुपक्षातील लोकांची रेशमी वस्त्रे तिच्या बाहुलीसाठी घेऊन या आणि सगळेजण कौतुकाने तिचा हट्ट मान्य करताना दिसतात. निपुत्रिक कुंतीभोज राजाने अपत्य पाहिजे म्हणून कुंतीचा स्वीकार केला होता. आपल्या मुलीच्या संसाराचा विचार त्या काळीदेखील पिता सर्वार्थाने करायचा. एक धीवर पिता महान राजा शंतनूला अट घालतो की, त्याचीच मुलगी सत्यवती लग्नानंतर राणी होईल आणि तिचाच मुलगा राज्याचा अधिकारी होईल.



या सर्व उदाहरणांवरून हे स्पष्ट होते की, महाभारत काळात मुलीला कौतुकाचे स्थान होते, पण ती मोठी झाल्यावर तिच्या शिक्षणाची काळजी घेतली गेलेली दिसत नाही. कुटुंबात राहूनच मुलींना धर्माचे आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे शिक्षण मिळत असावे, असे वाटते. सत्यवती मत्स्यगंधा होती. यमुनेच्या डोहात पराशर ऋषींबरोबर सत्यवती एकटीच बोट वल्हवीत जात होती. पराशर ऋषी तेथेच तिच्या प्रेमात पडतात आणि तिचा उजवा हात पकडतात. सत्यवती हसते, पण आपल्या संभाषण चातुर्याने नाव पैलतीरावर जाऊ देते. पैलतीरी नाव लागेपर्यंत मनावर ताबा ठेवा असे सांगते आणि नंतर चातुर्याने दोन वर मागून घेते. नाव पैलतीरी नेताना संभाषणात तिचे एक वाक्य आहे. 'प्रेमात दोघांनाही सारखेच सुख मिळाले पाहिजे.'

किती विलक्षण आहे हे सर्व! महाभारतासारख्या प्राचीन पर्वात एक अल्लड मुलगी एका महान ऋषीला प्रेमाची व्याख्या सांगते आहे.

२१ व्या शतकाच्या पुढचेच असलेले हे विचार महाभारताची पहिली स्त्री सत्यवती हिने लहान अल्लड वयात व्यक्त केले आहेत. कण्वमुनी शकुंतला आणि तिच्या मुलाची पाठवणी राजा दुष्यंताकडे करतात. त्यावेळी दुष्यंत राजा भर दरबारात तिचा अपमान करतो.

तिचा स्वीकार करत नाही. तेव्हा शकुंतलेचे संभाषण अतिशय वैचारिक आहे. पुरुषाच्या जीवनातले भार्या व अपत्य यांचे महत्त्व या संभाषणात तिने ठामपणे सांगितले आहे.

सत्य आणि धर्माचा ऊहापोह तिने केलेला आहे. वरील सर्व उदाहरणांवरून असे निश्चित वाटते की, त्याकाळी स्त्रिया गुरुकुलात गेल्या नसतीलही,



पण त्यांचे शिक्षण थांबले नसावे. त्यांना घरी धर्माचाराचे शिक्षण मिळत असावे आणि त्यांच्या उपजत बुद्धिमत्तेमुळे त्या अतिशय कुशलतेने राजकारण करीत असाव्यात. धर्म, तत्त्वज्ञान याविषयी ऊहापोह कुंती आणि द्रौपदीनेदेखील अनेक प्रसंगांमध्ये केलेला आहे.

बकासुर प्रसंगात कुंतीने युधिष्ठिराशी अतिशय तार्किक पद्धतीने वाद घालला आहे आणि भीमाला पाठवणे योग्य आहे, हे पटवून दिले आहे. महाभारतकालीन स्त्रियांना निश्चितच धर्माचे सखोल ज्ञान होते. महाभारतातील राज्यव्यवस्थेमध्ये राजापेक्षा राणीला दुय्यम स्थान दिलेले आहे, परंतु राजमातेचे महत्त्व मात्र अनन्यसाधारण आहे. राजमाता म्हणून विदुला, कुंती, गांधारी यांनी आपल्या पुत्रांना केलेला उपदेश अतिशय स्फूर्तिदायी आहे. राजमाता विदुलाला युद्धकलेचे ज्ञान होते. ती तिच्या पुत्रास संजय यास उपदेश करते की, टेंभुर्णीच्या कोलिताप्रमाणे धडाडून प्रज्वलित हो आणि युद्धभूमी दणाणून सोड. क्षुद्र जिवाचा मार्ग स्वीकारू नको. संजयला ती असेही आश्वासन देते की, युद्धासाठी लागणारा पैसा आणि गुप्तधन योग्य वेळी त्याला मिळेल. तिच्या या विधानावरून असे अभिप्रेत होऊ शकते की, महाभारत काळामध्ये स्त्रिया अर्थकारणातदेखील सहभागी होत असत.

वनपर्वात सत्यभामा द्रौपदीला विचारते की, तू पाचही पतींवर अधिराज्य कसे करू शकते? द्रौपदीचे उत्तर फार मार्मिक आहे. ती म्हणते की, तिजोरीत पैसा कोठून येतो आणि कोठे जातो याचे संपूर्ण ज्ञान मला आहे.

आजच्या काळातील स्त्रियांनादेखील त्यांच्या कुटुंबाचे अर्थकारण पूर्णपणे माहीत नसते, पण महाभारत काळातील द्रौपदीला मात्र अर्थकारणाचे संपूर्ण भान होते. युद्धाच्या अगोदर युधिष्ठिराला कुंतीने उपदेश केलेला आहे. शत्रुमर्दनासारखी क्रूर कर्मे करणे आणि प्रजेची काळजी घेणे यातच क्षात्रधर्म आहे, असे तिने निक्षून सांगितले आहे.



राजमाता गांधारीने दुर्योधनाला इंद्रिय जयाचे महत्त्व सांगितले आहे. स्वतःच्या मुलाच्या स्वभावातील गुणदोष हेरून या राजमातांनी धर्मावर वक्तव्य केलेले आहे. प्रसंगी अतिशय कठोर असे शब्द वापरून त्यांनी आपल्या मुलांना योग्य मार्गाने जाण्यास प्रवृत्त केलेले आहे.

महाभारतातील स्त्रियांमध्ये एक समान सूत्र दिसते. एका अदृश्य धाग्याने त्या बांधल्या गेल्या आहेत असे वाटते. तो धागा म्हणजे प्रत्येक स्त्री प्राप्त परिस्थितीत स्वबळावर लढते. कोळशाच्या खाणीतील हिऱ्यांप्रमाणे प्रतिकूल परिस्थितीत राहूनही त्यांची व्यक्तिमत्त्वे कायम झळाळताना दिसतात. महाभारतात शांडिली ब्राह्मणीची गोष्ट लक्ष वेधून घेते. गालव व गरुड विश्वामित्र ऋषींनी मागितलेले अश्व मिळविण्यासाठी चारी दिशांना शोध घेत असतात.

ऋषभ पर्वतावर आले असताना तिथे शांडिली नावाची ब्राह्मणी त्यांचे स्वागत करते. त्यावेळेस गरुडाच्या मनात विचार येतो की, या तपस्वी सिद्धेने पवित्र देवलोकात राहावे. गरुडाने मनात आणलेला विचार शांडिलीला तिच्या तपसिद्धीमुळे कळतो आणि तत्काळ ती गरुडाला शाप देते. त्याचे पंख गळून पडतात. शांडिलीचे आचरण आणि या आचरणातून आलेला आत्मसन्मान एवढा मनस्वी आहे की कोणी परक्याने तिच्याबद्दल मनातसुद्धा विचार केलेला तिला आवडत नाही.

मार्कंडेय ऋषींनी वनपर्वात एका सामान्य स्त्रीची गोष्ट सांगितली आहे. या गोष्टीवरून समजतं की, त्या काळात सामान्य स्त्रियांना धर्म आचरणाबद्दल माहिती होती. एकदा एक ब्राह्मण एका घरासमोर दीक्षा मागायला येतो. घरातील गृहिणी आत जाते; त्याचवेळी तिचा पती भुकेने व्याकुळ होऊन येतो. भुकेने कासावीस झालेल्या पतीला बघून ती दारावरच्या याचकाला विसरते. ब्राह्मण रागाने कृद्ध होऊन तिला विचारतो की, 'मला तिष्ठत ठेवून तू काय साधले?' यावेळेस जराही न घाबरता ती तिच्या आचरणाचे समर्थन करते आणि शेवटी सांगते की, दारी आलेल्या याचकाला धर्माचे पूर्ण ज्ञान नसल्यामुळे गुरूची आवश्यकता आहे.

महाभारतातील नलाची दमयंती स्त्रीचे परिपूर्ण रूप आहे. नलराजा तिला अरण्यात सोडून जातो. त्यावेळेस अजगराच्या विळख्यातून एक पारधी तिची सुटका करतो. पण नंतर तिच्या सौंदर्यावर भाळून तिचा उपभोग घेण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळेस दमयंती पारध्यास शाप देते आणि प्राण घेते. स्वतःच्या स्त्रीसामर्थ्याची जाणीव तिला अरण्यामध्येही असते. अतिशय कठीण अवस्थेत दिवस काढूनही ती नलाचा शोध थांबवत नाही. शेवटी स्वतःच्या हुशारीने बाहुक म्हणजेच नलराजा आहे, हे शोधून काढते.

एकचक्रा नगरीत बकासुरामुळे सर्व नागरिक भीतिग्रस्त होते. पण एका गरीब घरची मुलगी तिच्या आई-वडिलांना समजावते की, मीच बकासुराकडे जाणे योग्य आहे. माझे आई-वडील किंवा माझा भाऊ या संकटातून सुटले तर मी मरणार नाही. कारण माझी कीर्ती मागे राहील. त्यावेळचे तिचे कळकळीने केलेले भाषण वाचून आपण थक्क होतो. कुटुंबाकरिता बलिदान देण्याची तयारी आणि बकासुरासमोर गाडा घेऊन जाण्याचे धैर्य एका गरीब घरातील सामान्य मुलीने त्याकाळी दाखवले होते.

महाभारतातील स्त्री व्यक्तिरेखा सद्यकालीन अस्तित्वात असलेल्या अनेक प्रचलित समजुतींना तडा देतात. सत्यवती असो अथवा कुंती; दोघींनाही आपल्या सुनांची अतिशय काळजी होती. जेव्हा त्रिकालज्ञानी व्यास आपल्या मातेला, म्हणजेच सत्यवतीला सांगतात की, कुरुकुलावर आता अनेक संकटे येणार आहेत. त्यामुळे तू अरण्यात निघून जा. तेव्हा ती सुनांच्या काळजीपोटी त्यांनाही तिच्यासोबत अरण्यात घेऊन जाते. कुंतीच्या मनात शेवटपर्यंत द्रौपदीच्या द्युत प्रसंगातील अन्याय धगधगत होता. ती म्हणते की, राज्य गेलं यापेक्षा जास्त दुःख द्रौपदीवरील अन्यायाचे आहे. माझी सून द्रौपदी श्रेष्ठच आहे. महाभारतातील या अनवट वाटेवरील स्त्री व्यक्तिरेखा अतिशय गहन आहेत. प्राचीन काळातील समाजाच्या सांस्कृतिक वैभवाचा आरसा त्या आपल्यापुढे धरतात.



# सारस पक्ष्याच्या घरट्यात डोकावताना...

माणसाला धकाधकीच्या जीवनात स्वतःचे समाधान होईल असे एखादं वेड असावं म्हणतात, अर्थात हे वेडं चांगल्या अर्थाने असं मी म्हणतोय. तर! माझं असंच एक वेडं म्हणजे, निसर्गाच्या जवळीकतेच. वनतपस्वी मारोती चितमपल्ली, जिम कार्बेट ह्यांच्या अनुवादित शिकार कथा, पक्षीमित्र सलीम अली ह्यांच्या बाबत मिळालेली माहिती यामुळे थोडं फार का होईना पण नैसर्गिक भटकंतीचं वेड मला लागलेलं आहे. आधुनिक काळात मोबाईल फोटोग्राफीमुळे आपण जे पाहिले, अनुभवले ते टिपता येत. असे काढलेले फोटो वृत्तपत्रातही येतात. त्यामुळे तोही एक आनंद असतोच. त्यामुळे निसर्गात जे सहज सुंदर आणि स्वाभाविक रुपात आढळत, ते टिपून घ्यावं कधी ते शब्दात उतरवावे तर कधी कॅमेऱ्या टिपावे हा छंद मला जडलेला आहेच...

ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

बुलडाणा तालुक्यात निवडणूक अधिकारी म्हणून ज्ञानगंगा अभयारण्यातील गावात आनंदाने जाताना माझ्या अनेक मित्रांनी आश्चर्य व्यक्त केले. पण, तेथे गेल्यावर मला जो अनुभव आणि मानसिक समाधान मिळाले ते माझ्यासाठी महत्वाचे होते. धरण, नदी आणि वन क्षेत्रात भटकंती करणे हे तर माझे वेळ मिळेल तेंव्हा करायची कामे होत. असेच २ ऑक्टोबर २०२१ ला मी हिवरा साबळे येथे महात्मा गांधी जयंती साजरी करायला गेलो, असता शाळेच्या मागील बाजूस असलेल्या उंच आणि विस्तीर्ण अश्या चिंचेच्या झाडावर बिशप हा इंडोनेशिया, आफ्रिका आणि आता तुरळक प्रमाणात भारतात दिसणाऱ्या सारस ह्या दुर्मिळ पक्ष्याचा जोडा मला दिसला. क्षणाचाही विलंब न लावता मोबाईल कॅमेर्यात मी तो टिपलाही. मात्र ३० ते ३५ फूट उंचीवरचा हा फोटो माझ्या मनाला समाधान देऊ शकला नाही. तरीही त्या पक्ष्याचे कोंबडीच्या खुराडा एवढे घरटे त्या झाडावर असून त्यात दोन तीन पिल्ले असावेत ही माहिती त्या फोटोवरून मला झाली. माझा तेथे त्या पक्ष्यांना कॅमेऱ्यात टिपण्याचा खटाटोप पाहून शाळे लगत राहणारे नागरिक ह्यांनी कॅमेरा, त्यांचे लेन्स, कुणी ड्रोन कॅमेरा असे पर्याय माझ्या पुढे ठेवले मीही त्या सर्वांचा विचार करून पाहिला, मात्र त्यावेळी त्या झाडावर असलेले माकडाचे पिल्लू त्या पक्ष्याच्या घरट्याकडे जात असताना त्यावर ते पक्षी हल्ला करतात हे मी पाहिले.

माझ्या लक्षात आले की, ड्रोन कॅमेरा वर नेल्यास तो भला मोठा पक्षी त्या कॅमेर्यावर हल्ला करू शकतो आणि ते नुकसान होऊ शकते. बरं, तो कॅमेरा आपला असला तर ठीक आपण तो दुसऱ्याचा आणायचा आणि त्याचे नुकसान झाले तर... असा विचार करून मग तो विचार मी बाजूला सारला. दुसऱ्या दिवशी निसर्गाचे हे दुर्मिळ रूप कॅमेर्यात टिपण्यासाठी प्रसिद्ध छायाचित्रकार शरद वानखेडे आणि त्यांच्या DSLR कॅमेरासह मी त्या झाडाखाली सकाळी सहाच्या आसपास पोहचलो, शरदभाऊ हे सुद्धा निसर्गात परिसरात जे फोटोजेनिक आहे ते कॅमेर्यात टिपतात, त्यामुळे त्यांच्याशी माझी चांगली मैत्री आहे. शाळे शेजारील घरावर चढून फोटो काढावे असे मी ठरवले होते. पक्षी घरट्याच्या बाहेर फांदीवर बसलेले आम्हाला लांबूनच दिसले. शेजारच्या घरावर चढुन आम्ही त्यांचे काही फोटो काढले, त्यात स्पष्टता होती. मात्र जवळीकता नव्हती. पाहिजे त्या पॉवरचे लेन्स नसल्याने पुन्हा एकदा निराश पदरी आली. आगोदर सर्व प्रकारचे लेन्स असत. मात्र आता लोक फोटोग्राफीकडे लक्ष





देत नाहीत. त्यामुळे तसेच कोरोना काळातील बंदचा फटका बसल्याने व्यापारी आहे त्यात धकवत आहेत असे शरदभाऊंनी सांगितले. तेथून परत जाताना रत्नापुर- सोनाटी मार्गे काही फोटोजेनिक सापडलं तर पाहू असा विचार करून निघालो. रस्त्यात झेंडूच्या फुलांचे बहरलेले पीक उभे होते, पाऊस आला नाही तर चंगळ नाहीतर पुन्हा शेतकर्याच्या राशीत मंगळ असा विचार करत आम्ही त्या शेताचे फोटो काढले. रत्नापुरला आमचे स्नेही अरुण पोपळघट एका झोपडी पुढे वीस पंचवीस माणसाच्या सोबत उभे दिसले. त्यांच्या जवळची एक म्हातारी वारली असून तिचे वय शंभरपेक्षा जास्त होते असे माहिती पडले. अरुणरावानी आग्रह करून त्यांच्या घरी नेले चहापान झाल्यावर आम्ही सोनाटीकडे निघालो. रस्त्यात एका झाडावरील सुगरणीचे खोपे कॅमेऱ्यात टिपले.

पुढे सोनाटीजवळ एक गिट्टी खदान आहे तेथे थांबलो, नुकताच सूर्य उगवलेला, त्यांच्या उन्हात मानव निर्मित खडकाचे सुळके आणि तेथे खोल खोल जमा झालेले हिरवट निळसर शांत आणि निःशब्द पाणी... आपण एखाद्या सिनेमाच्या लोकेशनवर तर नाही ना? असा प्रश्न मला पडला. मात्र, हगणदरीमुक्त योजना राबविल्या जाणाऱ्या गावातील लोकांनी लवकरच आपण कोणत्याही बाहेर देशात किंवा सिने लोकेशनवर नसून खेड्यानजीक आहोत हे सिद्ध करत दोन जणांनी टमरेल न आणता डायरेक्ट दुचाकीवर बसून खदान जवळ एन्ट्री केली, त्या दगडांचे, खडकाचे शांत पाण्याचे फोटो काढणारे आम्ही आणि दुसऱ्या बाजूला कपडे धुणारी एक महिला ह्यांच्याकडे दुर्लक्ष करून ते पठ्ठे स्वतःचे पोट रिकामे करून गेले. आम्ही तेथून निघालो रस्त्यात उकळी गावात दोन तीन दिवसात नवदुर्गा बसणार असल्याने देवीच्या मूर्ती तयार करणे सुरू होते. त्या कारागिरासह मूर्त्यांचे काही फोटो घेतले आणि घरी पोहचलो. त्यानंतर तीन दिवस रोज शाळेत गेल्यावर त्या सारस पक्ष्याचे निरीक्षण करून होतील तसे फोटो हर्षवर्धन कंकाळ सर आणि मी टिपले. कधी दोन्ही पक्षी दिसायचे तर तर त्यांची पिल्लेही दिसायची.

बिशप सारस हा दुर्मिळ पक्षी त्यांच्या घरट्यात कसे राहतो? त्यांच्या पिल्लांचे जीवन कसे असेल? ह्या जिज्ञासेपोटी माझे साहित्यिक आणि निसर्ग प्रेमी मन अस्वस्थ होत होते. ह्या पक्ष्याचे अतिशय जवळून फोटो घ्यावे, असे मला वाटतं होते. मात्र इतक्या उंचावर कसे जावे ह्याबाबत विचार करत असताना हर्षवर्धन हा माझ्या खूप जवळचा मित्र असल्याने तो मला असले साहस करू देणार नाही ह्याची जाणीव मला होतीच. मी शाळेत ऑफिसमध्ये बसलेला असताना माझ्या नकळत गावातील एक तरुण परमेश्वर वाघ ह्यांच्या सोबतीने आणि मदतीने हर्षवर्धन झाडावर चढले, पक्ष्यांना इजा होणार नाही, त्यांना त्रास होणार नाही अश्या रीतीने लांबून त्यांचे फोटो काढले. आधुनिक तंत्राचा वापर करत tideo ball करून मला पक्षांच्या घरट्याचे अतिशय जवळून दर्शन घडविले. हा दुर्मिळ पक्षी सारस तर उडून गेलेले होते. मात्र, त्यांच्या बगळ्या एवढे आणि उडता न येणारे सुंदर आणि निरागस पिल्ले पाहून मला खूप समाधान वाटले. शेवटी ३५ फूट उंचीच्या झाडावर चढून हर्षवर्धन कंकाळ आणि परमेश्वर वाघ ह्यांनी अगदी फूटभर अंतरावरून ह्या पक्ष्याच्या घरट्याचे दुर्मिळ फोटो काढले होते. पक्ष्याच्या पिल्लांना आणि घरट्याला हाथ लागणार नाही ह्यांची दक्षता घेत त्यांनी निसर्गातील हे दुर्मिळ चित्र अलगद टिपले. कोंबडीच्या खुराड्यापेक्षाही मोठ्या, आकाशाकडे उघडे असणाऱ्या ह्या भल्यामोठ्या खोप्यात दोन लहान उडता न येणारे बगळयाच्या आकाराची दोन पिल्ले होती, घरटे अगदी स्वच्छ होते, त्यांचे अन्न साधारणपणे मासा, सरडा, साप, बेडूक, कीटक असे असताना कोणत्याही मेलेल्या प्राण्यांचे अवशेष तेथे नव्हते अर्थात पिल्लाना असलेली ३ इंचाची आणि पक्ष्याची जवळपास ५ इंच असलेली चोच ह्यामुळे ते भक्ष्य पूर्णपणे गिळून घेत असावेत. त्यामुळे तसे अवशेष सापडणे कठीणच, मात्र झाडाच्या सर्वोच्च ठिकाणी, उघड्यावर हा खोपा करून पाऊस पाणी आणि थंडी उन्हात त्यांना भल्या मोठ्या पंखानी झाकून त्यांचे रक्षण करणाऱ्या ह्या पक्ष्याबद्दल जिज्ञासा निर्माण झाली होती ती अखेर दूर झाली आणि मनाला विलक्षण समाधान लाभले.

पान १ वरून

# शेख हसीनांच्या शिक्षेच्या निमीत्ताने...

'सार्क'च्या स्थापनेला ३० वर्षे होऊनही त्यातून फारसे काही हाती लागले नाही; कारण 'सार्क' समूहावर कायम भारत-पाकिस्तान संबंधांचे ओझे असते. २०१४ साली नेपाळमध्ये झालेल्या १८व्या 'सार्क' परिषदेत पाकिस्तानचा आडमुठेपणा समोर आल्यावर त्यातून मार्ग काढण्यासाठी भारताकडून दक्षिण आशियात 'बीबीआयएन' म्हणजेच बांगलादेश, भूतान, भारत आणि नेपाळ अशा उपगटाची मांडणी करून त्याला आसियान गटाशी जोडायचे प्रयत्न सुरू झाले. गेल्या दहा वर्षांमध्ये भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंधांनी नेत्रदीपक प्रगती साधली. बांगलादेशची अर्थव्यवस्था वेगाने वाढली. शेख हसीनांच्या कार्यकाळातही तेथील समाजात इस्लामिक मूलतत्त्ववाद झपाट्याने पसरत असला, तरी त्यांच्या सरकारने परिस्थिती नियंत्रणात ठेवला होता.

गेली काही वर्षे बांगलादेश महागाई आणि आर्थिक मंदीच्या संकटाशी झुंजत आहे. त्यामुळे देशातील बेरोजगारीच्या प्रमाणातही मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. त्यामुळे शेख हसीना यांच्या सरकारला मोठ्या प्रमाणावर जनक्षोभाचा सामना करावा लागत होता. दि. ७ जानेवारी २०२४ रोजी होणार्या संसदेच्या निवडणुकांमध्ये पंतप्रधान शेख हसीनांच्या अवामी लीगचा मोठा विजय झाला. प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने या निवडणुकांवर बहिष्कार टाकला होता. या निवडणुकांपूर्वी बांगलादेशमध्ये मोठ्या प्रमाणावर परकीय हस्तक्षेप झाला. अमेरिकेचे परराष्ट्र सचिव अँथोनी ब्लिंकन यांनी सूचित केले की, बांगलादेशच्या लोकशाही व्यवस्थेला धक्का पोहोचवणार्या लोकांना अमेरिका व्हिसा देणार नाही; तसेच त्यांची संपत्तीही गोठवण्यात येईल.

अमेरिकेचे राजदूत पीटर हास बांगलादेशच्या निवडणूक आयुक्तांना भेटून त्यांना मुक्त वातावरणात निवडणुका घ्यायला सांगितले. ते 'जमात-ए-इस्लामी' या बंदी घातलेल्या इस्लामिक संघटनेच्या प्रतिनिधींनाही भेटल्याने भुवया उंचावल्या गेल्या. यासंदर्भात शेख हसीना यांनी अत्यंत गंभीर आरोप केला की, काही पाश्चात्य देश म्यानमार, भारत आणि बांगलादेशमधून भूभाग वेगळा काढून तिथे ख्रिस्ती धर्मिय झोलॅण्ड देश तयार करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. ज्याप्रमाणे मुस्लीमबहुल इंडोनेशियातून ख्रिस्तीबहुल पूर्व तिमोर हा वेगळा देश निर्माण करण्यात आला, त्याचप्रकारे भारतातील मणिपूर आणि मिझोराम, म्यानमारमधील चीन प्रांत आणि त्यांना जोडून असलेला बांगलादेशचा भाग वेगळा काढण्याचा डाव असल्याचे त्यांनी सांगितले. या योजनेत बांगलादेशने मदत केल्यास शेख हसीनांच्या विजयात ढवळाढवळ न करण्याचे आश्वासन देण्यात आले. पण, शेख हसीनांनी ते अमान्य केल्याने बांगलादेशच्या निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करण्यात आला. याप्रसंगी नरेंद्र मोदींचे सरकार अत्यंत खंबीरपणे शेख हसीनांच्या सरकारच्या पाठी उभे राहिले.

आता बांगलादेशात काय होते, ते पाहणे भारतासाठी महत्त्वाचे आहे. शेख हसीना यांच्याबद्दल भारतातील सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनाही समप्रमाणात ममत्व आहे. अवामी लीग हा अनेक वर्षे सत्तेवर असल्याने पक्षाचे कोट्यवधी कार्यकर्ते आहेत. बांगलादेशात सत्तांतर झाल्यानंतर त्यातील काही विरोधी पक्षांमध्ये गेले. अनेक कार्यकर्ते सक्रिय राजकारणातून काही काळ दूर गेले. पण, आता ते पुन्हा एकदा राजकीयदृष्ट्या संघटित असून शेख हसीना भारतात राहून त्यांच्याशी समाजमाध्यमांद्वारे संवाद साधत आहेत. हे बांगलादेशच्या अंतरिम सरकारच्या डोळ्यांत सलत आहे.

शेख हसीना देश सोडून गेल्या तेव्हा बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या कार्यकर्त्यांना वाटले होते की, सत्ता आपल्या हातात येईल. पण, या घटनेला सव्वा वर्ष होऊन गेले, तरी बांगलादेशमध्ये कोण सत्तेवर येणार, याबाबत अजूनही स्पष्टता नाही. बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या छत्रछायेखाली काम करणार्या 'जमात-ए-इस्लामी' या पाकिस्तानवादी इस्लामिक संघटनेच्या महत्त्वाकांक्षेला धुमारे फुटले आहेत. शेख हसीना यांच्या सरकार विरोधात आंदोलन करणार्या विद्यार्थी संघटनांतूनही राजकीय पक्ष निर्माण होत असून त्यातील काही अमेरिकेच्या धार्जिणे आहेत.

अशा बांगलादेशमधील मतभेदांचे पर्यावसन राजकीय हिंसाचारात झाल्यास त्याचे भारतावर गंभीर परिणाम होऊ शकतील. भारत आणि बांगलादेश यांच्यामधून ५४ नद्या वाहत असल्याने सीमेवर संपूर्ण कुंपण बांधणे अवघड आहे. पुढील वर्षी बंगाल आणि आसाम या दोन्ही राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका असून दोन्ही ठिकाणी बांगलादेशमधून आलेल्या घुसखोरांची मोठी समस्या आहे. या पार्श्वभूमीवर भारताने सावध राहण्याची आवश्यकता आहे.

# पाकिस्तानचा जिहादी उन्माद

युद्धाची तयारी करण्याची पाकिस्तानची क्षमता आज जवळजवळ संपलेली आहे. ज्या देशाच्या सैन्याला गेल्या काही दशकांत प्रत्यक्ष युद्धाचा अनुभव नाही, अशा देशाने दोन आघाड्यांवर युद्ध लढण्याची घोषणा करणे, ही वास्तवापासून तुटलेली, दिशाभूल करणारी भाषा ठरते. पाकिस्तानचे खरे युद्ध बाहेर नाही, ते आत आहे. दहशतवादाला प्रोत्साहन देणारी यंत्रणा मोडून काढणे, लोकशाही संस्थांना बळकटी देणे, भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक सुधारणा राबवणे आणि जनजीवन उभे करणे हीच आज पाकिस्तानची खरी लढाई आहे. परंतु, या संघर्षाकडे दुर्लक्ष करून सत्तेत आलेला कोणताही पाकिस्तानी पक्ष, भारताचा संदर्भ देत युद्धाच्या घोषणा करण्यातच धन्यता मानतो. अर्थात सुधारणा करण्यापेक्षा हे करणे अधिक सोपे असते.

आज पाकिस्तानचे राजकीय नेतृत्व लष्करी हुकुमशहा असलेल्या असीम मुनीर यांच्या आदेशावर कठपुतळीप्रमाणे वागताना दिसत आहे. अमेरिकेतून आर्थिक मदतीची आशा ठेवण्यासाठी पाकिस्तानने जणू स्वतःचा देशच गहाण टाकला आहे, अशीच आजची स्थिती आहे. युद्धाचे ढोल वाजवले तरच काहीतरी निधी मिळेल, आंतरराष्ट्रीय मदतीचे दरवाजे पुन्हा उघडतील आणि देशातील राजकीय-अराजकीय संकटांकडून जनतेचे लक्ष हटेल, अशी भाबडी अपेक्षा पाकिस्तानचे सैन्य आणि राजकारणी धरून बसले आहेत, पण वास्तव उलटेच आहे. भविष्यात भारताशी झालेल्या कोणत्याही संघर्षाची किंमत पाकिस्तानलाच चुकवावी लागेल. 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून त्याची दाहकता पाकिस्तानने अनुभवली आहेच. युद्धात इतर देशांचा कितीही पाठिंबा मिळाला, तरी विनाश मात्र पाकिस्तानी जनतेचाच होणार आहे. युद्धाच्या नावावरचा जिहादी उन्माद, पाकिस्तानला आणखी खोल दरीत ढकलण्याची शक्यता वाढली आहे.

कथा

डॉ. सुमेधा हर्षे

घरातील कामे आटोपून निवेदिता समोरील हॉलमध्ये येऊन बसली. तिचे लक्ष तिच्या व जावेच्या मुलांच्या खेळण्याकडे गेले. तिची मुलगी जावेच्या मुलांपेक्षा लहान असली तरी जावेची मुले तिच्या मुलीचे ऐकायचे व त्याप्रमाणे खेळायचे. निवेदिता लग्न झाल्यानंतर सासरी आली तेव्हा तिला फार अवघडल्यासारखे व्हायचे. एकुलती एक असल्याने ती लाडात वाढलेली. सासरी सासू, भासरे- जाऊ, जावेची दोन मुले असा मोठा परिवार. एकटं, मोकळं राहण्याची सवय असल्याने तिला गोंगाट सहन होत नसे.

दरम्यान, निवेदिताला मुलगी झाली. सासूबाईंच्या आग्रहाखातर बाळंतपण सासरीच झाले. बारसेही धूमधडाक्यात केले. मुलीचे नाव गौरी ठेवले. बारशाला निवेदिताचे आई-बाबा पण आले होते. निवेदिताची सासू माध्यमिक शाळेतून उपमुख्याध्यापिका म्हणून निवृत्त झाल्या होत्या. मोठी जाऊ प्रियांकाला दोन मुले, मोठा रिद्धेश आणि छोटा सिद्धेश. सर्व त्यांना रिद्धू आणि सिद्धू म्हणायचे. गौरी आता सात महिन्यांची झाली होती. रिद्धू- सिद्धू तिला घेण्याकरिता हट्ट करायची. निवेदिताला हा गोंधळ सहन होत नसे.. गौरी दोन वर्षांची झाली होती. घरात मुलांचा नुसता गोंगाट असायचा. एक दिवस ती सारंगला म्हणाली, ''मला नं हा गोंगाट सहन होत नाही, आपण दुसरीकडे घर घेऊन वेगळे राहू या का?'' सारंग तिला म्हणाला, ''ठीक आहे, बघू नंतर.'' दरम्यान, निवेदिता दुसऱ्यांदा गरोदर राहिली. सासूबाई म्हणाल्या, ''निवेदिता, तू तुझ्या माहेरी ही आनंदाची बातमी कळवून दे आणि तुझ्या आई- बाबांना सांग, यावेळेससुद्धा माझे बाळंतपण सासरीच होणार आहे. तुला माहेरी आराम करायला जायचे असेल तर आधीच दोन- तीन महिन्यांकरिता जाऊन येऊ शकते.'' गरोदरपणाला दोन महिने झाले होते. सारंगने निवेदिता व गौरीला त्याच्या सासरी सोडून दिले. निवेदिताच्या बाबांनी निवृत्तीनंतर रिकामे राहून कंटाळा येतो म्हणून एक प्रायव्हेट फर्म जॉईन केली होती. ते सकाळीच ऑफिसला निघून जायचे. घरी आई कामात असायची. गौरी काही ना काही ऊठाठेव करीत राहायची, निवेदिताला सारखे तिच्या मागे राहावे लागायचे. ती तिला रागवायचीही. सासरी गौरीला सांभाळायला बरेच जण होते, त्यामुळे निवेदिताला जाणवायचे नाही. निवेदिता कंटाळली होती. तिने सारंगला फोन केला...

''मी उद्याला घरी येते आहे.'' निवेदिता घरी परतली. ती दारातच होती की, जावेची मुले धावत आली. गौरीचा चेहरा एकदम खुलला होता. निवेदिताचे महिने भरत आले होते. सासू निवेदिताच्या खाण्यापिण्याकडे जातीने लक्ष ठेवायच्या. तिला कुठलेही जड काम करू द्यायच्या नाही. सारंगही निवेदिताकडे लक्ष देत असे. सारंग निवेदिताला म्हणाला, ''मी तीन-चार घरे बघितली आहेत, त्यातील एक मला आवडलं. आपण उद्या सकाळी जाऊया बघायला.'' निवेदिता म्हणाली, ''सध्या आपण थांबून जाऊ. आपले दुसरे बाळ तीन-चार महिन्यांचे झाले की जाऊ आपण वेगळे राहायला.'' सारंग म्हणाला, ''ठीक आहे, जशी तुझी इच्छा.'' निवेदिताला आज सकाळीच पोटात दुखायला लागले होते. सासूबाई म्हणाल्या, ''आपल्याला, निवेदिताला लगेच दवाखान्यात भरती करायला न्यावे लागेल.'' सारंग ऑफिसला निघून गेलेला होता. निवेदिताचे भासरे थोडे बरे वाटत नसल्यामुळे ते घरीच होते. तिघेही दवाखान्यात येऊन पोहोचले. डॉक्टरांनी तपासणी केली व डॉक्टर म्हणाले, ''सर्व काही व्यवस्थित व नॉर्मल आहे. तुम्ही यांना अगदी योग्य वेळी घेऊन आलात.'' निवेदिताला लेबर रूममध्ये नेण्यात आले. निवेदिताला हिंमत देण्याकरिता सासूबाई सोबत होत्या. काही वेळातच निवेदिताने एका गोंडस बाळाला जन्म दिला. भासऱ्यांनी लगेच दोन किलो पेढे आणून सर्वांना वाटले. सासूबाईंनी निवेदिताच्या आई-वडिलांना फोनवर ही गोड बातमी कळविली. दोन दिवसांनी निवेदिता बाळासोबत घरी आली. आईला व बाळाला बघून गौरी उड्या मारायला लागली. गौरीचा सांभाळ मोठ्या मम्मीने म्हणजेच निवेदिताच्या जाऊबाईने चांगल्या प्रकारे केला होता.

नवीन पाहुण्याने घरचे वातावरण प्रसन्न होते. निवेदिताचे आई-बाबा नातू बघायला आले. ते दोन दिवस थांबले. निवेदिताची आई निवेदिताला व छोट्या बाळाला गावी, त्यांच्या घरी नेण्याविषयी निवेदिताच्या सासूसोबत बोलायला लागल्या. निवेदिताच्या सासूने त्यांना सांगितले, ''दोन महिन्यांनंतर तुम्ही तुमच्या मुलीला व नातूला आराम करण्याकरिता अवश्य घेऊन जा. पण आता ती आमची जबाबदारी आहे.'' नामकरण सोहळा थाटात केला. बाळाचे नाव देवांश ठेवले. देवांश आता दोन महिन्यांचा झाला होता. घरातील सर्वजण देवांश बाळाकडे व्यवस्थित लक्ष ठेवायचे व काळजी घ्यायचे. मालिश करणे, आंघोळ घालून देणे, क्रीम, लोशन लावून देणे ही कामे बाळाची आजी म्हणजे सासूबाईच करायची. स्वयंपाकाची जबाबदारी थोरल्या जाऊबाईची असायची. हे सर्व बघून निवेदिताला हायसे वाटायचे. एके दिवशी सासूबाई म्हणाल्या, ''तुला जर माहेरी आराम करायला जायचे असेल तर तू जाऊ शकतेस.'' निवेदिताला फार आनंद झाला. निवेदिता माहेरी जायला आतुर झाली होती. सारंगने निवेदिताची पूर्ण तयारी करून दिली. तीन महिन्यांकरिता बाळाला निवेदिताला लागणारे साहित्य व्यवस्थित पॅक करून दिले तसेच सासूबाईंनी निवेदिताच्या आई-बाबांकरिता काही जिन्नस पण सोबत दिले. सासूबाई म्हणाल्या, ''बाळाला काही त्रास झाला किंवा काही अडचण आली तर आम्हाला कळव. आम्ही लगेच येऊ.'' सारंग, निवेदिता, गौरी व देवांशला सोडायला सोबत निघाला. निवेदिताला व मुलांना निरोप देण्याकरिता घरातील सर्व मंडळी दारात जमली होती. सर्वच जण थोडे भावुक झाले होते. निवेदिताच्या आईकडे बाळाची मालिश, आंघोळ करण्याकरिता बाई यायची. ती सकाळीच येत असल्याने निवेदिताला सकाळी लवकर उठावे लागायचे. आई घरची कामे करत राहायची. बाबा सकाळी ड्युटीवर निघून जायचे. गौरीला खेळायला लहान मुले नसल्याने, गौरी सतत मम्मीच्या- निवेदिताच्या मागे असायची व चिडचिड करायची. गौरीकडे तिचे थोडे दुर्लक्षही व्हायचे. सासरी बरेच जण असल्याने गौरीकडे लक्ष देणे, बाळाला सांभाळणे तिला जड जात नव्हते. निवेदिताला माहेरी येऊन केवळ सव्वा महिना झाला होता; ती आता कंटाळली होती. तिने सासूबाईंना फोन केला की, घरी परत यायचे आहे. सासूबाई हसल्या आणि बोलल्या, ''इथे असली की माहेरची ओढ आणि माहेरी असली की सासरची ओढ. बरं, मी सारंगला रविवारी तुला घ्यायला पाठवते.''




सारंग कारने आईसोबत सासरी पोहोचला. सारंगच्या सासरच्यांनी छान आदर सत्कार केला, पाहुणचार केला. संध्याकाळी निवेदिता, गौरी, देवांशसह सर्व गावी यायला निघाले. दोन तासातच सारंग सर्वांसोबत घरी पोहोचला. बच्चे मंडळी एकमेकांना भेटून फार आनंदले होते. गौरी दीड- दोन महिन्यांनी घरी परतली होती, त्यामुळे तिचे आजीकडनं व मोठ्या मम्मीकडनं जास्तच लाड पुरवले जात होते. रिद्धू-सिद्धू शाळेतून आले की देवांश बाळाजवळ जास्त बसायचे. निवेदिता आपली काही कामे आटोपून घ्यायची व थोडा आरामही करायची. एक दिवस मध्यरात्री गौरी झोपेतून उठली व रडायला लागली. तिला पोटात खूप दुखायला लागले होते. रात्री १ वाजता कुठले क्लिनिक पण उघडे नव्हते. जाऊला गौरीच्या रडण्याचा आवाज आला. जाऊ प्रियांकाने सिद्धूकरिता डॉक्टरांनी शिफारीश केलेले औषध रॅनटॅक सिरप तिला प्यायला दिले. गौरीचे पोट दुखणे सुरूच होते. सासूबाईंच्या लक्षात आले की, गौरीला कृमीचा त्रास होत आहे. त्यांनी घरी असलेली आयुर्वेदिक कृमी प्रहार ही औषध पाण्यात विरघळून गौरीला प्यायला दिली तसेच पोटाला व बेंबीजवळ औषध लावून दिली. थोडी सोप व जीर पाण्यात भिजवून त्याचे पाणी गौरीला प्यायला दिले. (पान ६ वर)

# देश काल वर्तमान, सर्वही अवेवधान



संत
प्रकाश एदलाबादकर

आपण व्यवहाराच्या वाटेवरून जाणारी सामान्य प्रापंचिक माणसे आहोत. अनेक सुख-दुःखांचा; प्रामुख्याने जास्त करून दुःखांचाच अनुभव घेत आपण जगत असतो. समाजात वावरताना मनात अनेक शल्ये दाबून वावरावे लागते. आपल्या दुःखाचे प्रदर्शन सहसा कुणी जाहीरपणे करीत नसतो. त्या दुःखावर योग्य उपाय सांगून आपल्याला मदत करण्यापेक्षा लोक, आपल्या दुःखाचा बाजार मांडतील, अशीच भीती प्रत्येकाच्या मनात असते. सध्याचे वर्तमान तसेच आहे. कुणावर विश्वास ठेवा आणि कुणावर ठेवू नये, हे कळेनासेच झालेले आहे. प्तयाच्या खांद्यावर विश्वासाने मान टाकावी तोच, आपल्या मानेवर सुरी फिरवतो. श्रद्धेने प्तया पायांवर मस्तक टेकवावे, तेच पाय आपल्याला केव्हा लाथाडतील, याचे भरवसा राहिलेला नाही. समाजात वावरणारा प्रत्येक जण मुखवटा लावूनच वावरत असल्याचा अनुभव येतो.

आमची आजी म्हणायची, 'देणे आणि दुखणे नेहमी गावच्या चव्हाट्यावर मांडावे. कोण कसा उपाय सांगेल, सांगता येत नाही.' परंतु आजीचा काळ वेगळा होता. ती माणसे वेगळी होती. त्यांचे विचार, त्यांचे जग आजच्या सारखे स्वकेंद्रित नव्हते. मुख्य म्हणजे आपली देणी आणि दुखणी सांगायला गावाला चव्हाटा होता. आज तर इंग्रजाळलेल्या पालक-बालकांना 'चव्हाटा' या शब्दाचा इतिहास आणि अर्थच ठाऊक आहे की नाही, ही शंका येते. आपल्या घरातील टीव्हीचा डब्बा हाच आजचा चव्हाटा झाला आहे. त्या आभासी दुनियेचा माध्यमातून आपल्याला सुखाचा खरा मार्ग सापडेल, या भाबड्या आशेने आपण जगत आहोत. दुःखांचा आणि समस्यांचा निरास असा आभासी जगाकडून प्राप्त होत नसतो. महाभारताच्या शेवटी महर्षी व्यास म्हणाले होते...

'**ऊर्ध्वबाहुर्वीरोमेष्य नचकश्चित शृणोती माम। धर्मादर्थश्चकामश्च स किं न सेव्यते?।।**' अर्थ आणि काम या पुरुषार्थांची प्राप्ती हवी आहे ना? मग धर्माच्या मार्गाने चला. धर्माच्या मार्गाने समाज आज कितीसा जातोय? येथे धर्म याचा अर्थ पूजापाठ, सोवळे-ओवळे, कर्मकांड मुळीच नाही. माझा धर्म म्हणजे माझ्या वाट्याला आलेले ईश्वरदत्त कर्म, हा अर्थ आहे. महर्षी व्यासांनाही तोच अपेक्षित असावा. संपूर्ण समाज अधर्माच्या मार्गानेच जात आहे, असे मुळीच नाही. समाजातील काही व्यक्ती धर्माचा मार्ग अनुसरणारी आहेतच; रुक्ष वाळवंटात एखादे ओऍसिस असावे तसे. परंतु अन्यांचे काय? त्यांची दुःखे दूर कारण्यासाठी, व्यवहाराच्या धबडग्यात त्यांना मनः शांती मिळावी यासाठीच त्या-त्या वेळेच्या चिंतकांनी समाजाला मार्ग दाखवला. अध्यात्मासोबतच व्यवहारही सांगितला.

आध्यात्मिक उन्नयन तर हवेच; त्यासोबत व्यावहारिक आणि ऐहिक उन्नयनही गरजेचे आहे, हे सांगणारे संतही होऊन गेले. ऐहिकाकडे दुर्लक्ष करून आध्यात्मिक उन्नती साधता येणार नाही, असे गर्जून सांगणारे समर्थ रामदास होते.

'**आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ घटका।।**'

या समर्थ वचनाचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे. संतप्रवर ज्ञानदेव, कीर्तनप्रभू संत नामदेव, शांतिब्रह्म संत एकनाथ, समाजशील संत तुकोबाराय आणि ऐहिकतेचा पुरस्कार करणारे समर्थ रामदास या संतपंचकाने महाराष्ट्राच्या मातीचे आध्यात्मिक, वैचारिक आणि सांस्कृतिक भरणपोषण केले. त्यांच्या त्यांच्या काळात या प्रत्येक सत्पुरुषाची एक प्रभावळ निर्माण झाली. त्याही मंडळींनी आपापल्या परीने आपली करणी-वाणी-लेखणी यांचा उपयोग करून समाजमन घडविण्यात आयुष्य खर्ची घातले. या परंपरेचा वेध घेतला तर ही परंपरा उणी-अधिक नऊशे ते हजार वर्षांची आहे.

'**टाळी वाजवावी। गुढी उभारावी। वाट ते चालावी। पंढरीची।।**'

हे साधे आणि सोपे सूत्र आचरणात आणून या परंपरेने भक्तीचा मळा फुलविला. त्यायोगे त्यांनीही सामान्य माणासाच्या प्रापंचिक दुःखांचा निरास करण्याचा प्रयत्न केला.

अध्यात्माच्या क्षेत्रात या संत पंचकाचे स्थान अनन्यसाधारण आहे, यात शंकाच नाही. संस्कृतात कोंडलेले जीवनविषयक तत्त्वज्ञान सर्वसामान्य जनतेसाठी मायभाषेतून निरूपित करून ज्ञानदेवांनी संपूर्ण समाजाला आध्यात्मिक आधार दिला. त्यांना दिलासा दिला. नामदेव आणि नाथांनी या परंपरेला वर्धिष्णू केले. अठरापगड जातींचा समाज एका ध्वजाखाली आणला.

'चिंता करितो विश्वाची' असे म्हणणारे समर्थही याहून वेगळे नाहीत. परंतु, त्यांनी केलेल्या १२ वर्षांच्या तीर्थाटनानंतर मात्र त्याच्या वैचारिकतेने वेगळे वळण घेतले. 'बुद्धी दे रघुनायका' म्हणणाऱ्या समर्थांचे वेगळेपण उठून दिसते ते, त्यांचा रोकड्या ऐहिकतेने! तत्त्वज्ञानपर विचार सांगणे आणि परमार्थाचाच उपदेश करणे इतकेच समर्थांचे वैशिष्ट्य नाही. त्यांच्या विचारांना आणि उपदेशाला आणखी एक वेगळे अंग आहे. स्वतंत्र आणि निरपेक्ष बुद्धीचे स्फुरण हा समर्थांचा विशेष आहे. आपल्या अनुभवांप्रमाणे आपल्या विचारात परिवर्तन घडवून आणणे हा त्याच्या दुसरा विशेष आहे. समर्थांच्या वैचारिक विश्वात झालेला बदल केवळ परमार्थाच्या अंगानेच नव्हे, तर ऐहिकाच्या अंगानेही झाला आहे. कारण त्यांना १२ वर्षांच्या तीर्थाटनातून आलेले अनुभव. समर्थांनी प्रापंचिकांचे दुःख ऐहिक पातळीवरून समजावून घेतले आणि त्यातून सुटका करण्याचा मार्गसुद्धा ऐहिक पातळीवरूनच विशद केला. पारमार्थिक मार्ग आणि ऐहिक मार्ग यांच्या विचारांची गल्लत समर्थांनी कधीच केलेली आढळत नाही. अत्यंत रोखठोक विचार मांडून त्यांनी प्रयत्नवादावर भर दिला. आज जे आपण एकारलेपणाने, एकटेच आपले दुःख कुरवाळत बसतो आणि आभासी जगाकडून सुखाची अपेक्षा करीत असतो, त्या पृष्ठभूमीवर समर्थवचने समजून घेतली पाहिजेत. ईश्वरनिष्ठेसोबतच समर्थांनी बुद्धी आणि तर्क यांची साथ सतत बाळगली.

**'मुख्य ते हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण ।**
**तिसरे ते सावधपण । सर्व विषयी ।।**
**सावधपण सोडू नये । व्यापकपण सांडू नये ।**
**कदा सुख मानू नये । निसुगपणाचे ।।'**
**असे सांगणारे समर्थ, हे देखील सांगतात की,**
**'परंपरा तोडू नये । उपाधी मोडू देऊ नये ।**
**ज्ञानमार्ग सोडू नये । कदाकाळीं ।**
**कर्ममार्ग सांडू नये । वैराग्य मोडू देऊ नये ।**
**साधन भजन खडूं नये । कदाकाळीं ।**
**देश काल वर्तमान । सर्वही अवेवधान ।**
**कोणते विधिविधान । सावधान सावधान ।।'**

असे समर्थ म्हणतात याचेही मुळापासून आकलन झाले पाहिजे. एकूणच समाजाला स्वतःच्या सुरक्षेविषयी सावध राहण्याविषयी यात मोलाचा उपदेश आहे. सांप्रतच्या काळात तरी समर्थांचे हे उद्गार तंतोतंत लागू पडतात. असा सावधगिरीचा इशारा देणारे समर्थ बहुधा पहिले सत्पुरुष असावेत. परमार्थाप्रमाणेच ऐहिकाच्या संबंधानेही समर्थ हे बुद्धिवादाने विचार करणारे होते. या जगातील धकाधकीच्या आयुष्यात जाणत्या नागरिकांनी कसे वागावे आणि कशाकशाची तयारी ठेवावी, हे समर्थ उमजून होते.

'सद्गुणांच्या एकांतिक आचरणाची शक्यता तपासून पाहता दुष्ट लोकांनी भरलेल्या या जगातील व्यवहार कठीण आहे' असे उद्गार प्रत्यक्ष लोकमान्यांनी काढलेले आहेत. सध्याच्या काळात तरी या वास्तवाचे भान राखणे गरजेचे आहे. समर्थांनी याचेच भान दिले. आपल्या संस्कृतीवर परकीयांची आक्रमणे आज सातत्याने होत आहेत. असे का होते, याचे कारण समर्थवचनांचा मूलाग्राही मागोवा घेतल्याशिवाय येत नाही. म्हणूनच महर्षी व्यास असोत वा समर्थ रामदास असोत, दोघांनीही धर्ममार्ग सोडू नये असे जे सांगितलेले आहे, ही आजची आवश्यकता आहे. असा उपदेश करणारे समर्थ आणि महर्षी व्यास वेगळे आहेत, असे कोण म्हणेल? मुळात आज चूक होते आहे ती, व्यासांनी सांगितलेल्या धर्ममार्गावरून न चालण्याची आणि समर्थांनी सांगितलेले सावधपण न बाळगल्याची! आपल्या सर्व दुःखाचे मूळ यातच दडलेले आहे. (पान ६ वर)

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

# वृक्षायुर्वेद अर्थात भारतीयांचे प्राचीन कृषी विज्ञान



'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' हा माउलींचा अभंग आणि शिवाजी महाराजांचे वृक्ष संवर्धनासंबंधीचे आज्ञापत्र या दोन गोष्टी सर्वांना नक्की माहिती असतात. मात्र मानवी आयुर्वेद, हस्त्यायुर्वेद याचप्रमाणे वृक्षाविषयीसुद्धा आपल्या विचारवंतांनी इतके सखोल आणि विस्तृत चिंतन केले आहे की, ते वाचून आश्चर्य वाटते. प्रत्यक्ष 'वृक्षायुर्वेद' नावाचा एकही ग्रंथ अथवा संहिता आजपर्यंत उपलब्ध झालेली नसली, तरी त्यासंबंधी अनेक उल्लेख आपल्या प्राचीन ग्रंथात आढळतात. सर्वात प्राचीन उल्लेख म्हणजे कौटिल्याचे अर्थशास्त्र; त्यानंतर ज्योतिषातील बृहत्संहिता व आयुर्वेदातील शारंगधर पद्धती. वृक्षायुर्वेदावर अनेक ग्रंथ निर्माण झाले आहेत. या सर्वांत जे वनस्पतिशास्त्र, कृषितंत्र यासंबंधीचे ज्ञान सांगितले आहे, त्या सर्वांचा आधार म्हणजे आज उपलब्ध नसलेला वृक्षायुर्वेद.

१) ऋग्वेद आणि अथर्ववेदातील औषधी सूक्तांत वनस्पतींचे आरोग्य रक्षणाचे गुण ओळखून त्यांची स्तुती केली आहे.

**'प्रस्तृणती स्तम्बिनीरेकशुङ्गा:प्रतन्वती:औषधी:आवदामि । अंशुमती:काण्डिनी:या विशाखा ह्व यामि ते वीरुधी वैश्वदेवी:उग्रा पुरुषजीवनी:।'**

म्हणजे झुपकेदार आणि सर्वत्र पसरणाऱ्या, एक देठाच्या, असंख्य शाखांनी विस्तारलेल्या, देवांना प्रिय आणि मनुष्याला उपयुक्त अशा औषधी वेलवनस्पतींना मी आवाहन करतो. या आणि अशा अर्थाच्या अनेक ऋचा व सूक्ते वेदात जागोजागी आढळतात. त्यात आयुर्वेदाचे अंग म्हणून औषधी वनस्पतींचे वर्णन केले आहे. आपल्याला सोमवल्ली तेवढी माहिती असते. पण अशा अनेक आश्चर्यकारक वनस्पतींची वर्णने आहेत.

१) उपनिषदादी वाङ्मयातून वनस्पतींचे शास्त्रीय वर्णन करताना तर त्यांची मानवी देहाशी तुलना केलेली दिसते.

**'यथावृक्षो वनस्पिति: तथैव पुरुषो मृषा ।**
**तस्य लोमानि पर्णानि त्वगस्य उत्पाटिका बहि: ।**
**त्वच एवास्य रुधिरं प्रस्यन्दि त्वच उत्पट: ।**
**तस्मात् तदा तृण्णात् प्रैति वृक्षादिवाहतात् ।।'**

मनुष्याचे केस तशी वृक्षाची पाने, जखम झाल्यावर रक्त वाहावे तसे शाखा तोडल्यास वृक्षाच्या सालीतून चिक वाहतो, मनुष्याचे मांस तशी वृक्षाची कोवळी अंतर्साल, मनुष्याची हाडे अस्थी तसे लाकूड इ. महाभारतात भृगु आणि भरद्वाज महर्षींच्या विज्ञाननिष्ठ चर्चेने मानवी शरीराशी तुलना करताना हेच सांगितले. त्या संवादातील एक श्लोक असा :

**'उष्मतो ग्लानपर्णानां त्वक्फलं पुष्पमेवच ।**
**म्लायते चैव शीतेन स्पर्शस्तेनात्र विद्यते ।**
**वाय्वग्न्य शनिनिष्पेषै: फलपुष्पं विशीर्यते ।**
**श्रोत्रेण गृह्यते शब्द: तस्मात् शृण्वन्ति पादपा: ।।**
**वल्ली वेष्टयते वृक्षं सर्वतश्वैव गच्छति ।**
**न ह्यदृष्टेश्च मार्गोऽस्ति तस्मात्पश्यति पादपा: ।।'**

सारांश म्हणजे वनस्पतींना जीव असतो, त्या शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पंचविषयांचे ग्रहण पंचज्ञानेद्रियांतून करतात.

२) **'ग्रहणात् सुखदुख:स्य छिन्नस्य च विरोहणात्।**
**जीवं पश्यामि वृक्षाणामचैतन्यं न विद्यते ।'**

वनस्पती निर्जीव नाहीत, त्यांना भावभावना असतात, मानवाप्रमाणेच त्या हर्ष, मर्ष भय, उद्वेग यांना प्रतिसाद देतात हे भृगु महर्षींनी वैज्ञानिक पद्धतींनी तर वाल्मीकि किंवा कालिदास प्रभृतींसारख्या संस्कृत कवींच्या अद्भुत, रसिक आणि चिकित्सक बुद्धीने त्यांच्या विशाल साहित्यात जागोजागी लिहिले. रामायण आणि शाकुंतलातील रसाळ वर्णनांचा मुळातून आस्वाद घेण्यासाठी तरी सर्वांनी संस्कृत शिकावे असे वाटते.

**'लतासनाथ इवायं केसरवृक्ष: प्रतिभाति ।'**

शकुंतला सासरी निघते तेव्हा तिने प्रेमाने वाढवलेल्या झाडांचे 'पान पान गाळूनी दु:ख दाविती तरु' हे वर्णन किंवा रघुवंशातील-'**यदनेन तरुर्न पातित:क्षपिता तद्विटपाश्रिता लता।**' तरुणींच्या लत्ताप्रहाराने अशोक फुलतो तर मुखातील चुळेने बकुळी बहरते, अशी वर्णने आहेत.

**४) नीती आणि व्यवहार :** याविषयी सांगताना महाभारतात अनेक ठिकाणी वृक्षांचे संदर्भ आढळतात. वेलींनी बलशाली वृक्षाचा आधार घ्यावा, तसे कौरवांनी पांडवांच्या आधाराने राहावे (कृष्ण-संजय संवाद), देवदार वृक्षांचे उंच आणि घनदाट वन म्हणजे जणू मेघांनाच पकडणारे जाळे (भीमाचे स्वगत), बांबू किंवा केळीला फळ आले की त्यांचे आयुष्य संपते. (द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगी दुर्योधनाला आणि एकदा जयद्रथाला उद्देशून), बुंध्याशी असलेले मुंग्याचे वारुळ बलाढ्य वृक्षाचाही नाश करते, त्याप्रमाणे पांडवांना जवळ ठेवण्यात आपल्याला धोका आहे. (दुर्योधन-धृतराष्ट संवाद)

**५) न्यूटनचा गतीविषयक नियम किंवा कर्मसिद्धांत:** बाह्य प्रेरणा काम करत नाही तोपर्यंत वस्तू स्वस्थितीतच राहते किंवा प्रेरणेप्रमाणेच काम करते. कर्मसिद्धांत सांगताना युधिष्ठिर भीमाला वृक्षाचे उदाहरण देताना म्हणतो-

**'अचोद्यमानानि यथा पुष्पाणि च फलानि च ।**
**स्वकालं नानिवर्तन्ते तथा कर्म पुराकृतम् ।'**

पूर्वकर्मानुसारच आणि ठरावीक वेळेलाच शुभ-अशुभ फळ मिळते, तसे वृक्षांनाही त्यांच्या पोषणाप्रमाणे आणि ठरावीक वेळेसच पाने-फुले-फळे येतात. अनुकूल वातावरण, पाणी, खत इत्यादी बाह्य प्रेरणेमुळे वनस्पती बहरतात आणि यांच्या अभावी कोमेजतात-नाश पावतात. या अनुषंगाने संपूर्ण कृषिशास्त्रच उभे राहिले. कौटिलीय अर्थशास्त्रातील **निवडक उदाहरणे : 'प्रापयेत्कदलीपत्रै: सर्षपेण घृतेनच । सर्वर्तुपुष्पफलदा: भवन्त्येते चिकित्सिता:।'**

वृक्षांना केळीचे पान, मोहरी व तूप या मिश्रणाचे खत घातले तर ते सहाही ऋतूत फुले-फळे देतात. सीताध्यक्षाने म्हणजे कृषी अधिकाऱ्याने जमिनीची योग्य निगा राखावी, वेळेवर पोषक खते द्यावीत. चांगल्या वाढीसाठी झाडांभोवतीचे तण जाळून नष्ट करावे, गुरांची हाडे व शेण घालावे. बियाणे दवाचे पाण्यात ७ रात्री भिजवून, डाळी वगैरे ५ रात्री, कठीण बिया शेणात भिजवून मग पेराव्यात.

कलमे तयार करताना कापलेल्या जागी मध, तूप, डुकराची चरबी, शेण यांचे लेपन करावे, कंद लावताना फक्त तूप व मधाचे मिश्रण वापरावे. कोवळ्या अंकुरांना उग्र वासाच्या मासळीच्या खताचा रस घालावा. पाण्याच्या उपलब्धतेनुसार पिकांचे नियोजन, आधी काय पेरून मग त्या जमिनीत नंतर कोणती पिके घ्यावीत, कमी खर्चात अधिक उत्पन्नासाठी सर्वात उत्कृष्ट म्हणजे 'शाल्यादि ज्येष्ठम्' अर्थात तांदळाची लागवड, त्या खालोखाल भाजीपाला आणि ऊस वगैरे कनिष्ठ. पाण्याला फेस असेल तेथे वेली वाढवाव्यात, भरपूर पाण्याची सोय असल्यास ऊस अथवा द्राक्षे, पाण्यातील बांधांवर सुवासिक आणि औषधी वनस्पती, वाळा आणि ओलसर जागेत जनावरांसाठी हिरवे गवत वाढवावे. सर्प व विषारी कीटकांच्या प्रतिबंधासाठी सरकी आणि सापाच्या कातीची धुरी द्यावी, हे सर्व विस्ताराने सांगितले आहे.

**बृहत्संहिता :** यातील एका संबंध अध्यायाचे नावच मुळी 'वृक्षायुर्वेद' असे आहे. कोणत्या वनस्पतींची लागवड कोणत्या नक्षत्रावर करावी, मुळांच्या चांगल्या वाढीसाठी जमीन मृदू हवी. त्यासाठी आधी तीळ पेरावेत व त्यांना फुले आली की, ती कुस्करून मातीत मिसळावीत. दोन झाडात किती अंतर ठेवावे. ऊन, पाऊस आणि थंडी यांच्या तीव्रतेपासून झाडांना होणारे आजार, त्यांची लक्षणे व त्यावरील शल्य, लेप आणि सुगंधोपचार, टवटवीत फुले आणि रसरशीत फळे येण्यासाठी कुळीथ, मूग, उडीद, तीळ इत्यादींचे दुधात शिजवलेल्या काढ्यांचे सिंचन, पाळीव प्राण्यांची विष्ठा, पाणी आणि मांसरसापासून खते कशी तयार करावीत, गारांचे पाणी मातीत मिसळून फळबिया पेरल्या तर अल्पावधीत त्यांना रसरशीत आणि जास्त प्रमाणात फळे येतात. यावरून गारांच्या पाण्याचा उपयोग स्त्रियांच्या प्रदरव्याधीवर करतात, या आयुर्वेदीय संदर्भाचे मला स्मरण झाले. (पान ६ वर)

वेध
डॉ. मधुकर आपटे

# भारताला हितकारक अणुगर्भ ऊर्जा निर्मिती पद्धत

ऊर्जा म्हणजे कार्य करण्याची क्षमता. स्वतंत्र भारताला विकास साधण्यासाठी मोठ्या प्रमाणात ऊर्जेची गरज आहे. ती प्राप्त करण्यासाठी प्रामुख्याने कोळसा आणि खनिज तेलाचा मोठ्या प्रमाणात आपण वापर करीत आलो आहोत. परंतु इंधनाचे साठे मर्यादित असून ते संपल्यास मोठे संकट निर्माण होण्याचे लक्षात येऊन आपले सुज्ञ नेते, विचारवंत वैज्ञानिक आणि तंत्रज्ञांनी इतर अपारंपरिक ऊर्जा साठ्यांच्या उपलब्धतेचा विचार सुरू केला. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, सागरी ऊर्जा इत्यादी ऊर्जांचा विचार सुरू झाला. भारतात सौर ऊर्जा विपुल प्रमाणात उपलब्ध असल्याने त्या ऊर्जेचा वापर आपण करू लागलो आहोत.

सौर प्रकाश व्हॉल्टीय पद्धत जास्त सुलभ असल्याने साधारण २०-२५ वर्षांपासून या पद्धतीने भारताची जवळजवळ १७ टक्के ऊर्जेची गरज सध्या भागविली जात आहे. आपल्या राष्ट्राला प्राप्त होणारी सौर ऊर्जेची मात्रा इतकी विपुल आहे की, भारताची संपूर्ण ऊर्जेची गरज याच पद्धतीने भागविणे शक्य आहे. त्यासाठी मोठ्या संख्येने सौर विद्युत घट वापरावे लागतील. या विद्युत घटांसाठी अर्धवाहक पदार्थ वापरावे लागतात.

सिलिकॉन हा अर्धवाहक पदार्थ त्यासाठी योग्य आहे. भारतात सिलिकॉन या अर्धवाहकाचे साठे विपुल प्रमाणात आहेत. परंतु विद्युत घटांसाठी आवश्यक असणारे शुद्ध स्वरूपातील सिलिकॉन मिळविणे बरेच खर्चीक असल्याने मोठ्या प्रमाणात त्याचा वापर करून वीज निर्माण करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. याशिवाय या मार्गाने वीज निर्माण करणे फक्त सूर्यप्रकाशाच्या काळातच होत असल्याने दिवसा निर्माण होणारी वीज रात्रीसाठी विजेऱ्यांमध्ये साठवून ठेवावी लागते. परिणामी वीज निर्मितीचा हा मार्ग बराच खर्चीक ठरतो. म्हणूनच ऊर्जा निर्मितीचा एखादा वेगळा मार्ग शोधणे आवश्यक वाटू लागले आणि अणुगर्भ ऊर्जा निर्मितीच्या मार्गाकडे लक्ष देण्याचा विचार पुढे आला. विचारांती आपल्याला हितकारक अशा एका वेगळ्या अणुगर्भ ऊर्जा पद्धतीचा आता सविस्तरपणे विचार करूया. अणुगर्भ ऊर्जा हा पर्याय समोर आल्याबरोबर जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी येथील संहार आठवून 'नको ती अणुगर्भ ऊर्जा' असा एक सूर पुढे आला. परंतु लगेच ही ऊर्जा पूर्णपणे असंहारक पद्धतीने कशी मिळविता



येते हे एन्रिको फर्मी या वैज्ञानिकाने २ डिसेंबर १९४२ रोजी प्रत्यक्षपणे दाखवून दिल्याचे विचारात घेऊन त्या पद्धतीने आपण अणुगर्भ ऊर्जा भारतात निर्माण करण्याचे ठरले. या पद्धतीने ऊर्जा निर्माण करणाऱ्या संयंत्राला अणुभट्टी असे म्हणतात.

अशी ही पहिली अणुभट्टी मुंबईजवळ तारापूर येथे उभारून ४ ऑगस्ट १९५६ रोजी भारतात नियंत्रित स्वरूपात अणुगर्भ ऊर्जा निर्माण करण्यात यश मिळविले.

'अप्सरा' हे या अणुभट्टीचे नाव. त्यानंतर एका मागून दुसरी, तिसरी, चौथी अशा आजपर्यंत एकूण २५ मोठ्या अणुभट्ट्या भारतात उभारल्या गेल्या आहेत. प्रत्येक अणुभट्टीतून निर्माण होणारी ऊर्जा वापरून मोठ्या मात्रेत वीज निर्माण केली जाते. आतापर्यंत या मार्गाने ४७.९ अब्ज युनिट विजेची निर्मिती करण्यात आली आहे. संपूर्ण भारताची तीन टक्के वीज या अणुभट्ट्यांच्या मार्गाने निर्माण झाली असल्याचे समजते. या अणुभट्ट्यांमध्ये युरेनियम हे इंधन वापरले जाते. मात्र आपल्या देशात युरेनियम पुरेशा मात्रेत मिळत नसल्याने हे अणू इंधन आपल्याला आयात करावे लागते. परिणामी या अणुभट्ट्या चालविण्यासाठी आपण परावलंबी आहोत. हे शल्य सतत टोचत असल्याने त्यावर मार्ग शोधण्याचे प्रयत्नांना गती आली आणि युरेनियमच्या ऐवजी थोरियम वापरून अणुगर्भ ऊर्जा मिळविता येते, हे लक्षात आले.

शिवाय थोरियमचे विपुल साठे भारतात असल्याने त्याचा वापर कसा करता येईल, या प्रश्नावर भारतीय वैज्ञानिकांनी संशोधन सुरू केले. जवळजवळ २५ वर्षांच्या या प्रदीर्घ संशोधनात त्यांना यश आले आहे. थोरियमचा वापर करून अणुगर्भ ऊर्जा कशी मिळविता येते? याचा आता विचार करूया...

अणुगर्भ ऊर्जा प्राप्त करण्यासाठी काही ठरावीक पदार्थांच्या अणुगर्भाचे विखंडन केले जाते. ज्या पदार्थाच्या अणुगर्भाचे विखंडन करून अणुगर्भ ऊर्जा मिळविता येते अशा पदार्थांना 'भन्जनक्षम पदार्थ' असे म्हणतात. थोरियम हा काही भन्जनक्षम पदार्थ नसल्याने त्याचे प्रत्यक्ष विखंडन करून अणुगर्भ ऊर्जा मिळविता येत नाही. परंतु थोरियमचा वापर करून योग्य असा भन्जनक्षम पदार्थ निर्माण करून ऊर्जा मिळविणे शक्य असल्याने थोरियमला अणुगर्भ ऊर्जा प्राप्त करू शकणारा 'सुपीक पदार्थ' असे संबोधिले जाते. थोरियम २३२ अणुभारांकाचा समस्थानी, जो भारतात नैसर्गिक खनिज स्वरूपात उपलब्ध आहे, यावर अणुभट्टीत न्यूट्रॉनचा मारा केल्यास त्याचे रूपांतर प्रथम थोरियम २३३ मध्ये होते. या थोरियम २३३ चे रूपांतर प्रोक्तोनियम २३३ मध्ये होऊन त्याचे रूपांतर युरेनिअम २३३ या समस्थानीत होते.

युरेनियम २३३ भन्जनक्षम असल्याने त्याची विखंडन साखळी प्रक्रिया सुरू होऊन मोठ्या मात्रेत ऊर्जा निर्माण होते. या ऊर्जेने विद्युत जनित्र चालवून मोठ्या मात्रेत वीज निर्माण करण्यात येते. या अणुभट्टीत थोरियम २३२ या सुपीक पदार्थाचा इंधन म्हणून वापर करून युरेनियम २३३ हा भन्जनक्षम पदार्थ मोठ्या मात्रेत निर्माण होत असल्याने ही अणुभट्टी अखंडपणे ऊर्जा निर्माणक्षम आहे. म्हणूनच या अणुभट्टीला 'प्रजनक अणुभट्टी' या नावाने संबोधिले जाते.

भारतात अशी एक थोरियम प्रजनक अणुभट्टी तामिळनाडू राज्यात कलपक्कम येथे उभारणे २०२० साली सुरू केले आहे. सप्टेंबर २०२६ साली ही अणुभट्टी कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. त्यातून प्रथम ५०० मेगावॅट ऊर्जा निर्माण होण्याचा अंदाज केला जातो. अशाच थोरियम अणुभट्ट्या दक्षिण भारतात इतर अनेक ठिकाणी उभारून प्रचंड मोठी ऊर्जा निर्माण होणार असल्याने आपली ऊर्जेची पूर्ण गरज या मार्गाने भागणार आहे. भारतातील थोरियमचा साठा एवढा मोठा आहे की, आपल्या वाढत्या ऊर्जा गरजेचा विचार करूनदेखील हा साठा आपल्याला २५० वर्षे पुरेल, असे विधान आपले भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी केले आहे.

थोरियमच्या प्रजनक अणुभट्ट्यांमधून ऊर्जा निर्मिती केल्यानंतर शिल्लक उरणारा निरुपयोगी पदार्थ (कचरा) प्रचलित युरेनियम अणुभट्टीच्या तुलनेत फारच अल्प मात्रेत निर्माण होतो. त्यामुळे त्याची विल्हेवाट लावणे अगदी नगण्य मात्रेचे असते. या अणुभट्ट्यांमध्ये निर्माण करण्यात येणारे प्राथमिक भन्जनक्षम पदार्थ युरेनियम २३३ हा आहे, तर प्रचलित युरेनियम अणुभट्ट्यांमधून तत्सम पदार्थ प्लुटोनियम हा आहे. या दोन पदार्थांच्या विध्वंसक मात्रांचा विचार केल्यास, प्लुटोनियमचा वापर केलेली अणवस्त्र जास्त विध्वंसक ठरतात. म्हणून थोरियमचा वापर करून अणुभट्ट्या उभारणेच अण्वस्त्र बंदीच्या कार्यक्रमास उपयुक्त ठरते.

थोरियमचा वितळण बिंदू बराच मोठा असल्याने भट्टीत काही अपघात झाल्यास बरीच मोठी सुरक्षितता प्राप्त होण्यास मदतनीस ठरते. असा विविध अंगांनी विचार केल्यास भारतात थोरियम अणुभट्ट्या उभारून आपली ऊर्जेची भूक पूर्णपणे शमविणे हा योग्य मार्ग ठरतो. भारतीय भूमातेने सढळ हाताने दिलेल्या या 'थोरियम'चा वापर करून हे कार्य साधूया...

# ग्रहसंकेत

**(रविवार,२३ नोव्हेंबर ते शनिवार,२९ नोव्हेंबर २०२५)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✲ **रविवार, २३ नोव्हेंबर-** रामगिरी महाराज पुण्यतिथी मिठबाव, श्री गुरु भंडारा भोसवर पाटण, श्री सत्यसाईबाबा जन्मदिन, भोजलिंगदेव यात्रा जांभुळणी (ता. माण) ✲ **सोमवार, २४ नोव्हेंबर-** विनायक चतुर्थी, गुरु तेगबहादूर शहीद दिन, श्री सिध्दनाथ यात्रा मारुल- हवेली (ता.पाटण), वीर विघ्नेश जन्मोत्सव रत्नागिरी, श्रीदेवी शर्वाणी दही काला (अवसारी), कौल प्रसाद (गोवा) ✲ **मंगळवार, २५ नोव्हेंबर-** नागपूजन, नागदिवे, सातेरी कालोत्सव म्हापसा, श्री महावीर दिक्षोत्सव जैन ✲ **बुधवार, २६ नोव्हेंबर-** चंपाषष्ठी, स्कंद षष्ठी, मार्तंड भैरवोत्थापन, खंडोबा उत्सव-निमगाव (म.) ता. माळशिरस, रेवडी (ता. कोरेगाव), बेहरे चिंचोली (ता. सांगोला), यल्लमा यात्रा खटाव, संविधान दिन ✲ **गुरुवार, २७ नोव्हेंबर-** दत्त नवरात्रारंभ, संत रोहिदास पुण्यतिथी, भालचंद्र महाराज पुण्यतिथी कणकवली, शिवप्रताप दिन प्रतापगड उत्सव ✲ **शुक्रवार, २८ नोव्हेंबर-** दुर्गाष्टमी, महात्मा फुले पुण्यदिन, श्री महाराणी ताराराणी पुण्यतिथी करवीर, श्री महालक्ष्मी यात्रा ✲ **शनिवार, २९ नोव्हेंबर-** कल्पादि, सिध्दतीर्थलिंग यात्रा मुधोळ.

**मुहूर्तः-** ✲ **साखरपुडा-** २३ नोव्हेंबर (१९ पर्यंत), २५, २६, २७ नोव्हेंबर ✲ **डोहाळ जेवण-** २३ नोव्हेंबर (१९ पर्यंत), २६, नोव्हेंबर ✲ **बारसे-** २५, २७ नोव्हेंबर ✲ **जावळ-** २६, २७ नोव्हेंबर ✲ **गृहप्रवेश-** २३, २६, २७ नोव्हेंबर.

### मेष :- स्थावर, वाहन सौख्य

मंगळवारी सप्तमात बुध- शुक्राची युती होत आहे. कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. बुधवारचा शुक्र- गुरु त्रिकोण योग आर्थिक काम यशस्वी करणार आहे. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. रवि- मंगळ अष्टमात राहणार असल्याने प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. उष्णतेपासून त्रास होईल. योजलेली कामे मनासारखी होतील. अडचणी सुटतील. शुभ ता. २३, २७

### वृषभ:- नव्या विचारांना चालना

षष्ठात होणारी बुध- शुक्राची युती कलागुणांतून सन्मान मिळवून देणारी आहे. शुक्र- गुरु त्रिकोण योग ही आर्थिक बाबतीत लाभदायक आहे. नव्या विचारांना चालना देता येईल. अपेक्षित प्रगती होऊ लागल्याने समाधान वाढेल. नव्या संधी लाभतील. अडचणींवर मात कराल. नोकरीत वरिष्ठांशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. फार दगदग करून घेऊ नये. शुभ ता. २३, २५, २९

### मिथुन:- आर्थिक प्रगती

राशी स्वामी बुधाची पंचमात शुक्राशी होणारी युती उद्योग, व्यवसायात आर्थिक प्रगती करणारी आहे. धनस्थ गुरुचा शुक्राशी होणारा त्रिकोण योगही आपणास चांगलाच लाभदायक ठरेल. अडचणी, विवंचना कमी होणार आहेत. मनासारख्या घटना घडतील. यांत्रीक क्षेत्रात सुसंधी लाभतील. नव्या कामाला गती मिळेल. बँक, विमा क्षेत्रात प्रगती घडेल. शुभ ता. २३, २७

### कर्क:- मनासारखे घडेल

सुखस्थानी होणारी बुध- शुक्राची युती सौख्यदायी ठरेल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. राशीतील गुरु- शुक्राशी त्रिकोण योग करीत आहे. मानसिक स्वास्थ लाभेल. अडचणींवर मात कराल. अपेक्षित संधी लाभल्याने समाधान वाटेल. संतती संबंधात शुभ घटना घडतील. अनुकूलता वाढेल. चिंता करू नका, सर्व मनासारखे घडेल. शुभ ता. २५, २७

### सिंह:- मनासारख्या घटना

तृत्तीयात होणारी बुध- शुक्राची युती कलेत प्रगती करणारी आहे. भावंडाचे सौख्य लाभेल. शुक्र-गुरु त्रिकोण योग आर्थिक बाबतीत मनासारख्या घटना घडतील. धार्मिक कार्य होतील. प्रकृतीची काळजी घ्यावी. आठवा शनि प्रतिकूल आहे. फार दगदग करू नका. अपेक्षित घटना घडतील. अडचणींवर मात कराल. शुभ ता. २३, २७

### कन्या:- नव्या कामांना गती

धनस्थानी बुध- शुक्राची होणारी युती आर्थिकदृष्ट्या अनुकूल आहे. एखादा व्यवहार मनासारखा झाल्याने समाधान लाभेल. नव्या विचारांना चालना मिळेल. गुरु- शुक्र त्रिकोण योग प्रगतीच्या घटना घडविणार आहे. नव्या कामांना गती मिळेल. उत्साहवर्धक घटना घडतील. नोकरीत मनासारखे बदल घडतील. फार चिंता करू नका. शुभ ता. २६

### तुला:- स्पर्धांमध्ये यश

राशीतच मंगळवारी बुध- शुक्राची युती होत आहे. त्यामुळे सौख्यदायी घटना घडतील. हातून निसटलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत, लाभ घ्यावा. कर्मस्थ गुरुचा- शुक्राशी होणारा त्रिकोण योगही आर्थिकदृष्ट्या सुख समाधान देईल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नवीन गुंतवणूक करू शकाल. अडचणींवर मात कराल. फारशी चिंता करू नका. शुभ ता. २३, २९

### वृश्चिक:- नव्या विचारांना चालना

बुधवारचा शुक्र- गुरु त्रिकोण योग जुने येणे वसूल करून देणार आहे. राशीतील रवि मंगळामुळे उत्साह, धडाडी वाढेल. हाती घेतलेली कामे मनासारखी यशस्वी होतील. गृहनिर्माण, गुढविद्या अशा क्षेत्रात लक्षणीय यश मिळवू शकाल. नव्या विचारांना चालना देता येईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. सामंजस्याने रहावे. शुभ ता. २५, २७, २९

### धनु:- निर्णय विचाराने घ्यावेत

लाभस्थानी होणारी बुध- शुक्राची युती उद्योग व्यवसायात प्रगती करणारी आहे. शुक्र- गुरु त्रिकोण योग ही लाभदायक ठरणार आहे. नव्या संधी लाभणार आहेत. अडचणींवर मात होईल. महत्वाचे निर्णय पूर्ण विचारांती घ्यावेत. विद्या संपत्तीबाबत शुभ घटना घडतील. डोळ्यांच्या तक्रारींची दखल घ्यावी. प्रतिकूलतेतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २५, २७

### मकर:- नव्या कामांना गती

कर्मस्थानी होणारी बुध- शुक्राची युती कार्यक्षेत्रात प्रगती करणारी आहे. गृह सजावट, खाद्यपदार्थ वाहतूक अशा क्षेत्रात असणाऱ्यांना विशेष अनुकूल कालावधी राहील. नोकरीत अधिकार वाढतील. नव्या कामांना गती मिळेल. अपेक्षित संधी मिळत जातील. प्रगतीचा नवा टप्पा गाठू शकाल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. चिंता नको. शुभ ता. २७, २९

### कुंभ:- चांगल्या संधी लाभतील

भाग्यस्थानी होणारी बुध- शुक्राची युती भाग्योदयकारक घटना घडविणार आहे. उपजत कलागुणांना चांगल्या संधी लाभतील. चिकाटीने केलेले मार्गक्रमण आता शुभ फलदायी ठरेल. नव्या कामाला गती मिळेल. आर्थिक नियोजन योग्य प्रकारे करावे. अडचणींवर मात कराल. नव्या संधी लाभदायक ठरतील. प्रगतीचे मार्गक्रमण होईल. शुभ ता. २७, २६

### मीन:- अडचणींवर मात कराल

मंगळवारी अष्टमात बुध- शुक्राची युती होत आहे. आर्थिक कामे मनासारखी होतील. शुक्र- गुरु त्रिकोण योगही कार्यक्षेत्रात प्रगती करणार आहे. चिकाटीने रहावे. उत्तरोत्तर प्रगती होत जाईल. अडचणींवर मात कराल. हातून निसटलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. वेळीच योग्य तो निर्णय घ्यावा. सौख्य लाभेल. शुभ ता. २५, २७

!! शुभ भवतु !!

# रायरेश्वराच्या साक्षीने...

**दुर्ग जिज्ञासा**

प्राची पालकर



महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीच्या मनात शिवभक्ती आणि दुर्गप्रेम आहे. ज्याच्या मनात इतिहासाबद्दल आस्था आहे, छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या कार्याचा आदर आहे, त्यांना महाराष्ट्रातील किल्ल्यांविषयी जिज्ञासा आहे. 'दुर्ग जिज्ञासा' ही लेखमाला सुरू झाल्यापासून अनेक किल्लेप्रेमींच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने, हा अनुभव दर रविवारी येतो आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात सह्याद्रीतील काही किल्ल्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे; ज्यांच्या उल्लेखाशिवाय दुर्ग भटकंती पूर्णच होत नाही.

'रायरेश्वर' हे नाव उच्चारताच प्रत्येक मराठी माणसाच्या डोळ्यांपुढे १६ वर्षांचे राजबिंडे शिवबा, त्याचे सवंगडी मावळे आणि रायरेश्वर महादेवाचे देवालय हे दृश्य उभे राहते. शिवकालीन इतिहासाचे अनन्यसाधारण महत्त्व जाणणारी पिढी तर या प्रसंगाच्या उल्लेखाने भारावून जाते. परकीय मुघल सत्तेविरुद्ध चीड निर्माण झाल्यामुळे स्वकीयांच्या सुखासाठी जिवाचे रान करून स्वराज्य स्थापन करण्याची शपथ घेणारे शिवाजी महाराज होते म्हणून हिंदू धर्माचे रक्षण झाले. लोकांच्या मनात धर्माभिमानाची ज्योत प्रज्वलित करून सह्याद्रीतील या वाघाने परकीय सत्तेवर अशी झडप घातली की, मुघलांना पळती भुई थोडी झाली. शिवाजी महाराजांचा महाराष्ट्रातील दरारा दिल्लीतील तख्त हलविणारा होता आणि सगळे शत्रू एक होऊनदेखील तो दरारा मिटवू शकले नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या साथीला जिवाला जीव देणारे एकनिष्ठ मावळे होते.

महाराजांनी कधीही आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही, कधीही शब्द फिरवला नाही, कधीही शत्रूशी हातमिळवणी केली नाही. त्यांनी शत्रूला त्यांच्या गनिमीकाव्याने, बुद्धिचातुर्याने अनेकदा फसविले, पण ते कधीच शत्रूच्या कटात फसले नाही म्हणूनच आज शिवकालीन इतिहासाचा अभ्यास सर्वार्थाने उपयोगी सिद्ध होतो आहे.

सह्याद्रीच्या डोंगररांगेतील अनेक प्रेक्षणीय स्थळांमध्ये रायरेश्वराचे महत्त्व काही वेगळेच आहे. पुणे जिल्ह्यातील रायरेश्वरच्या पठारावर अत्यंत रमणीय आणि प्राचीन असे पांडवकालीन शिवमंदिर आहे. येथील शंकराची पिंड स्वयंभू असून या मंदिराचे शिवकालीन इतिहासात मानाचे स्थान आहे. पुण्याच्या दक्षिणेला भोर तालुक्यात सुमारे २५ कोसांवर रायरेश्वर वसलेले आहे. रायरेश्वर पठाराचा विस्तार मोठा असून येथील सर्वात उंच टेकडीवरून सभोवतालच्या परिसराचे विहंगम दृश्य दिसते. उत्तरेला तुंग, तिकोना, लोहगड, विसापूर तसेच प्रतापगड, केंजळगड, कमळगड, विचित्रगड आणि मकरंदगड दृष्टीस पडतात. भोरपासून अवघ्या ८ किलोमीटर अंतरावर असल्यामुळे पुण्यावरून एका दिवसात रायरेश्वर दर्शन शक्य होऊ शकते. अस्ताव्यस्त पसरलेली पठारे, उंच सुळके, खोल दऱ्या, घाटवाटा, घनदाट झाडी यामुळे हा परिसर तसा दुर्गमच आहे. अत्यंत रमणीय असलेले हे ठिकाण शिवाजी महाराजांच्या अत्यंत आवडीचे स्थान होते. पुण्याच्या लाल महालात राहत असताना ते नेहमी दादोजी कोंडदेव यांच्या समवेत या मंदिरात जात. सह्याद्रीच्या उंच व अवघड शिखरावर स्थित रायरेश्वर येथे शिवबांचे मन रमत असे.


सह्याद्रीच्या कुशीतील अशी पुरातन व शिखरांवरील मंदिरे शिवबांना खूप आवडत. सवंगड्यांसह अशा ठिकाणी घोडदौड करत जाणे हे त्यांचे नित्याचे काम होते. सह्याद्रीच्या अंगाखांद्यावर महाराजांचे संपूर्ण बालपण गेले. त्यामुळे त्यांना येथील दऱ्याखोऱ्या, गडकिल्ले संपूर्ण परिचयाचे होते. मावळच्या दऱ्याखोऱ्यातील मुले बाल शिवबाचे जिवाभावाचे सवंगडी होते. त्यांच्यासोबत सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांची खडान्खडा माहिती शिवबांनी करून घेतली होती. रायरेश्वराच्या पुजेची व्यवस्था दादाजी नरसप्रभू गुप्ते यांच्यासमवेत शिवबांनी लावून दिली. शिवा जंगम यास त्यांनी पूजेसाठी नेमले. १२ मावळात पंतांसोबत शिवबा फिरत आणि परिसराची संपूर्ण माहिती करून घेत, इतक्या लहान वयातील या सवयींमुळे आणि संस्कारांमुळे स्वराज्याचे स्वप्न शिवबांच्या मनात रुजत होते. पुढे याच रायरेश्वर मंदिरात आपल्या मित्रांसमवेत स्वतःच्या रक्ताचा अभिषेक करून शिवरायांनी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. रायरेश्वराच्या मंदिरात १६ व्या वर्षी घेतलेली शपथ हा सह्याद्रीचा सुपुत्र आजन्म जगला.

आग्र्याला दरबारात बादशहापुढे न झुकण्याची हिंमत याच शपथेने महाराजांना दिली. रोहिड्यावरून रायरेश्वरला जाण्याचे अनेक मार्ग आहेत. पहिला मार्ग कान्होजी जेध्यांची समाधी असलेल्या कारी गावातून जातो. समाधीचे दर्शन घेऊन लोहदरा मार्गे पावणेदोन ते दोन तासात रायरेश्वर पठारावर पोहोचता येतं. दुसरा मार्ग वडतुंबी गावातून आहे. भोर ते टिटेघर मार्गावर वडतुंबी फाटा आहे. तेथून गावात जायचे आणि गावामागच्या शेतातून वाट काढत चालत निघायचे. रायरेश्वराच्या गणेशदरा मार्गाने दीड-दोन तासात आपण पठारावर पोहोचतो. पठारावरून डावीकडच्या कड्याला समांतर असलेल्या वाटेने तासाभरात रायरेश्वर मंदिरात पोहोचता येतं. चालताना पुरेसे पाणी सोबत ठेवावे. कारण वाटेत पाणी मिळणे कठीण आहे. ट्रेकिंग करताना पाण्याचे नियोजन करणे हाही एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. कधीही पूर्ण पाणी संपवू नये. शेवटपर्यंत पाणी पुरविणे ही कला ट्रेकिंग करताना आत्मसात होते. तिसरा मार्ग म्हणजे कोर्ले गावातून गायदरा मार्गे पठारावर जाणारा मार्ग; या मार्गाने साधारण अडीच तासात आपण मंदिरात पोहोचतो. रोहिड्यावरून रायरेश्वरला जाताना वरील तिन्ही मार्ग सोयीचे आहेत.

पुण्यावरून नुसते रायरेश्वर बघून परत यायचे असल्यास पुणे- भोर- निगुडघर हाही मार्ग सोयीचा आहे. पुणे-कोल्हापूर रस्त्यावर भोर फाटा आहे. तेथून ३५ कि.मी.वर कोर्ले गाव आहे. येथे पोहोचून रायरेश्वर मोहीम सुरू करता येते. पावसाळ्यातील वातावरण तर अतिशय आल्हाददायक असते. धुक्याची चादर ओढून रांगडा सह्याद्री आपल्याला सारखा साद घालीत असतो. आता घाटातील रस्ता चांगला झाला असून तुम्ही चारचाकीने गडाच्या अगदी जवळ जाऊ शकता. तेथून अर्धा-पाऊण तासात गड चढून मंदिरात पोहोचता येतं. गडावर जायला सुमारे २५० पायऱ्या चढाव्या लागतात आणि काही लोखंडी पायऱ्या पार कराव्या लागतात. साधारण सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये गेलात तर या पठारावर निसर्गफुलांनी मनसोक्त फुलून सौंदर्याची लयलूट केली असते.

रायरीतूनसुद्धा रायरेश्वर पाहणे सोयीचे आहे. नीरा नदी ओलांडून रायरीवाडीत पोहोचायचं आणि सांबरदरा मार्गाने रायरेश्वर पठार गाठायचं. भोरवरून बसने दाबकेघरला जाऊन चालत धानवलीला जावे. येथून वाघदरा मार्गे पठारावर जाणे सोयीचे आहे. तुम्ही वाईला गेलात तर रायरेश्वरच्या पायथ्याशी असलेल्या जांभळी गावातून रायरेश्वर आणि केंजळगड अशी दोन ठिकाणे एकत्र बघू शकता. अशा अनेक मार्गाने रायरेश्वर पाहणे शक्य आहे. त्यामुळे तुमच्या सोयीचा मार्ग निवडावा. गडावर पोहोचला की एक पाझर तलाव दृष्टीस पडतो. येथून थोड्या अंतरावर पांडवकालीन पाण्याची टाकी आहे, ज्यामध्ये गोमुखातून पाणी पडत असते. महादेवाच्या मंदिराखाली जो पाण्याचा उगम आहे तेथून हे पाणी येते आणि हेच पाणी स्थानिक लोकं पिण्यासाठी वापरतात.

रायरेश्वराचे मंदिर पूर्वाभिमुखी असून कौलारू आहे. मंदिरात रायरेश्वराची पिंडी आहे. मंदिराचा जीर्णोद्धार केल्यासंबंधीचा शिलालेख डाव्या खांबावर आहे. खालच्या डोंगरधारेवर श्वानदरा मार्गे उतरलात की समोर जांभळी गाव दिसतं. रायरेश्वर दर्शन पुण्यावरून एका दिवसात करणे शक्य असले, तरी ट्रेकिंगची आवड असणाऱ्यांना आजूबाजूच्या किल्ल्यांना भेट द्यायची इच्छा होतेच. मात्र, आपल्याला वेळ किती आहे हे पाहून कार्यक्रम ठरवावा. हा परिसर इतका नयनरम्य आहे की, परतीची वाट जरा जडच जाते. वेळेअभावी अनेकदा आजूबाजूचे गड पाहायचे राहून जातात. रोहिडा आणि रायरेश्वर मात्र शनिवार-रविवार या दोन दिवसात पाहून येता येतं. रोहिडा पाहून झाला असेल तर रायरेश्वर व केंजळगड एकत्र पाहता येतात. सह्याद्रीत गडकिल्ल्यांची कमी नाही. आपल्यालाच वेळ कमी पडतो. हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेची शपथ घेतल्या गेलेल्या या पवित्र मंदिरात प्रत्येकाने दर्शन घ्यायला हवे. शिवरायांच्या सहवासाने पावन झालेले हे दुर्ग आणि मंदिरे आपली प्रेरणास्थळे आहेत.



पान ४ वरून

## कुटूंबवत्सल

गौरीचे पोट दुखणे आता कमी झाले होते. आता तिला बरे वाटत होते. प्रियांका व सासूबाई पहाटे ५ वाजेपर्यंत गौरीजवळ बसल्या होत्या. सकाळी निवेदिता जरा उशिराच झोपून उठली. तेवढ्यात सासूबाई आल्या व त्यांनी गौरीची चौकशी केली. जाऊ निवेदिताकरिता चहा घेऊन आली. तिला थोडे अवघडल्यासारखे झाले. प्रियांका स्मित हास्य करीत व काही हरकत नाही असे खुणेनेच म्हणाली. चहा घेताना निवेदिता विचार करीत होती की, काल रात्री या दोघीही माझ्यासोबत जागरण करीत होत्या, तरीही आज सकाळीच उठून, सकाळची सर्व कामे आटोपून मलाच आयता चहा आणून दिला. खरेच मी भाग्यवान आहे. रिद्धू आणि सिद्धू विचारायला लागले, "काकू, गौरी आता ठीक आहे ना, तिचे पोट दुखणे थांबले ना आता." हे ऐकून निवेदिताच्या डोळ्यात अश्रू तरळले. ती विचार करायला लागली की, ही छोटी मुले पण किती आस्थेने चौकशी करतायेत.

निवेदिता म्हणाली, "हो. आता तिला बरं आहे. ती झोपली आहे. उठली की खेळा तिच्यासोबत." एवढ्यात सारंग आले. निवेदिता त्यांना म्हणाली, "बसा, मी तुमच्याकरिता चहा घेऊन येते." निवेदिता सारंग करिता चहा आणायला स्वयंपाकघरात गेली. तिथे प्रियांका होती. तिने निवेदिताला काय हवं म्हणून विचारले. निवेदिताने सांगताच, प्रियांका निवेदिताला म्हणाली, "काल रात्री तुझी झोप झाली नाही, त्यामुळे तू थकली असशील. जा हॉलमध्ये बस सारंगजवळ. मी करते सारंग भाऊजींचे चहा-पाणी." सारंगने हळूच निवेदिताजवळ विषय काढला, "निवेदिता, आपला बाळ आता चार महिन्यांचा होत आलाय, तू म्हणाली होतीस त्याप्रमाणे मी येथून, एक किलोमीटर अंतरावर, एक वन बीएचके फ्लॅट बघितलाय. खूप छान लोकेशन आहे. मी ऑफिसमधून आल्यावर आपण जाऊया बघायला." पण आता निवेदिता म्हणाली, "नको, मला आता वेगळे राहायचे नाही. मला कळून चुकले की, कुटुंबात राहिल्यामुळे किती आधार असतो. किती फायदा असतो. मला आता इथेच रहायचे आहे, माझ्या कुटुंबवत्सल प्रिय लोकांबरोबर तुझ्यासह..."

## पहलगामला प्रत्युत्तर

पहलगामच्या मनोरम घाटींत
केला हिंदूंवरच वार
धर्म विचारून केला
भारताच्या अस्मितेवर प्रहार
दहशतवाद्यांना काही धर्म
नाही हे म्हणणं आता निराधार
कारण काश्मीर घाटींत
नेहमी झालाय हिंदूंचाच संहार
का नेहमी हिंदूंनाच द्यावी
लागते अग्निपरीक्षा ?
कोण घेणार त्यांची बाजू
अन् देणार त्यांना सुरक्षा?

का झालेली नाहीं आजवर
या नराधमांना शिक्षा?
जाब विचारतो प्रत्येक नागरिक -
कोण करणार देशवासींयांची रक्षा?
झाला भ्याड हल्ला आणि
संपूर्ण नागरिक एकवटले
हवी आता आरपारची लढाई
सर्व भारतीयांना राग उसळले
कोणताही देश असो आता
बंद करा पेपरावरील खटले
करा हल्ला, वापरा सैन्य,

धडा शिकवा त्यांना जे देश आहे
भटकले सरसावले वीर सैनिक,
वापरली सेना, केला पाकिस्तानवर
वार अचूक मध्यरात्री पाहून युद्धाची
दिवाळी, शत्रूचा लक्षात आली
केलेली चूक सदृढ नेतृत्वावर आहे
देशवासीयांना आत्मविश्वास खूप
हीच शौर्यगाथा आता करणार
भारताला आगेकूच होय!
हीच शौर्यगाथा आता करणार
भारताला आगेकूच ।।

विजय हरदास

पान ५ वरून

## देश काल वर्तमान...


या सर्व पृष्ठभूमीवर आपला व्यवहार म्हणजेच जवळच्या आणि दूरच्या व्यक्तींशी आलेला संबंध कसा असतो, हे आपणही तपासून बघायला हवे. हे सर्व संबंध स्पष्टपणे सांगायचे तर, स्वार्थाशी निगडित असतात. हा स्वार्थ दोहो बाजूंनी असतो आणि जोपर्यंत अशा व्यावहारिक संबंधांना स्वार्थ लगडून असतो, तोपर्यंत त्यात आपलेपणाचा लवलेश नसतोच नसतो; उलट सरसोपस्कार हे कृत्रिम असतात. आपल्या मनातील विषादाचे, दुःखाचे, शल्याचे हे मूळ आहे. स्वार्थापोटी वाढत गेलेले माझे समज आणि माझ्या स्वार्थाला पोषक असलेले माझ्याविषयीचे इतरांचे समज अशा मिश्रणाने माझे अहंकारी व्यक्तित्व तयार होते. तेच सर्व दुःखाचे कारक असते. म्हणूनच आध्यात्मिक उन्नतीसोबत व्यावहारिक-ऐहिक उन्नती आवश्यक मानली जाते. अध्यात्मामुळे आलेली अशी व्यावहारिक उन्नती व्यक्तीच्याच नव्हे, तर समाजाच्या नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक उन्नयनाचे श्रेष्ठ साधन ठरते. असे झाले तर आणि तरच व्यक्ती, समष्टी आणि राष्ट्र यांच्या जीवनातील दुःखांचा भार कमी होईल. न झाला तर निदान सुसह्य तरी होईल.

पान ५ वरून

## वृक्षायुर्वेद अर्थात भारतीयांचे..

पेरणीपूर्वी मासळी आणि मांस यांच्या रसाचे सिंचन फुलबियांवर केल्यास मांडवावरील वेली फुलांनी भरगच्च बहरून येतात, हे वाचले अन् मला 'पुढे असावा बागबगिचा- वेलमंडपी जाईजुईचा' हे भावगीत आठवले. शारंगधरांचे २३७ श्लोकांचे उपवनविनोद हे प्रकरण. याची 'अथ वृक्षायुर्वेदः' अशी सुरुवात दर्शविते की, लेखकाने वृक्षायुर्वेद हा ग्रंथ नक्की वाचलेला आहे.

उद्यानांचे महत्त्व, रचना, वृक्ष-वनस्पतींची उत्पत्ती, जोपासना, त्यांच्या व्याधींचे निदान व चिकित्सा, वनस्पतींचे व्याख्येसहित वर्गीकरण, मातीचे प्रकार, वैशिष्ट्ये व गुणदोष सांगितले आहेत. यातील विचित्रीकरण प्रकरणातील काही वर्णने आश्चर्यकारक आहेत.



उदा. जोमदार वाढीसाठी हरीण, डुक्कर, मासे, बोकड, गेंडा यांचे मांस, मेद, मज्जा यांच्या मिश्रणापासून तयार केलेले कुणप नावाचे औषध मुळांवर घातले तर आगीत जळालेल्या काष्ठालाही पालवी फुटते. अजिबात वास नसेल त्या फुलांना सुवास आणण्याचे शास्त्रसिद्ध प्रयोग, बियांना तत्काळ अंकुर आणण्याच्या पद्धती, केळीच्या झाडांवर आम्रफळे आणणे, बिनबियांची फळे निर्माण करण्याचे शास्त्र इ. बौद्धांच्या दधिवाहन जातकातही अशी काही विचित्रकरणाची उदाहरणे आढळतात. वृक्षांच्या जाती बदलता येत नसल्या तरी स्वरूप निश्चितच बदलता येते. उदा. काट्याशिवाय गुलाब तयार करणे, वर्षभर फळे-फुले आणणे, त्यांचे आकार, प्रकार, रंग, चवी बदलणे. आज यातील अनेक गोष्टी शक्य होताना आपण बघतो; पण शारंगधरांच्या विचित्रकरण प्रकरणातील आश्चर्यकारक माहिती काल्पनिक आहे की त्याने म्हटल्याप्रमाणे शास्त्राधारित आहे, हे तपासायला हवे.

माझ्या संग्रहातील अनेक ग्रंथांचा हा अतिशय त्रोटक व धावता आढावा येथे दिला आहे. मूळ श्लोक, वर्णने असंख्य आहेत, पण ते देण्याचा मोह मला आवरावा लागला. संशोधकांना उपलब्ध नसलेल्या मूळ वृक्षायुर्वेद ग्रंथातील हे ज्ञान आपल्याकडील प्राचीन वाङ्मयात महान वटवृक्षाच्या पारंब्यांसारखे विविध ग्रंथात विखुरले आहे. त्या सर्वांचे संकलन व संशोधन करून वृक्षायुर्वेदाची नवीन मुळी तयार करायला हवी.

# विसंगती सदा टळो

सकारात्मकतेचे तत्वज्ञान २९४




सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

बोले तैसा चाले हे वचन बरेचदा पाळले जात नाही. आयएसओ मध्ये आम्ही शिकवतो डू व्हॉट यू से, अँड से व्हॉट यू डू!! पण बरेचदा आपल्या कथनी आणि करणी मध्ये अंतर असते. ही विसंगती कां असते?

जेव्हा दोन विरोधाभासी ग्रह/समजूती मानसिक पातळीवर कार्यरत असतात तेव्हा अस्वस्थता अनुभवायला येते. असे प्रभावी मानसशास्त्रीय कंगोरे व्यक्तिगत तसेच व्यावसायिक पातळीवर विकासाला कारणीभूत ठरतात. आपल्याला जे बोलायचे असते ते आपल्या नीतीमूल्यांशी आणि नैपुण्याशी/ प्रभुत्वाशी सुसंगत असावे. आपल्या कृती, आस्था आणि वर्तन जर आपण साधत असलेल्या संवादाशी मिळते-जुळते नसतील तर?

उदा. बाह्यतः एखादी व्यक्ती वर्क- लाईफ समन्वयाविषयी बोलत असेल आणि व्यक्तिगत आयुष्यात मात्र अतिताणामुळे कामाच्या दडपणाशी झगडत असेल तर? हे अंतर्गत युद्ध अस्वस्थतेला आमंत्रण देऊ शकते पण एका टप्प्यावर कर्तृत्वाला/ ओळखीला आव्हान देऊ शकते. ही संमिश्रता गोंधळात टाकणारी असू शकते. ही प्रक्रिया नेहमीच आपले वर्तन तरी जुळवून घेण्यास भाग पाडते किंवा आपली प्रतिमा बदलण्यास भाग पाडते. स्वतःशी प्रामाणिक राहून आपले प्रतिबिंब नितळ असावे यासाठी प्रयत्न करण्यास भाग पाडते.

अशा विसंगती कधी कधी सक्षम प्रेरणा बनून स्व-विकासाचा मार्ग शोधण्यास मदत करू शकते. नीतिमूल्यांशी तडजोड न करता स्व-प्रतिमा जपणे जमले तर त्यासारखे अन्य काही नसते. जे आपण अंमलात आणत नाही त्याची वकिली करण्यात काय अर्थ? आपल्या विश्वासार्हतेला कोंडीत पकडण्यात काय हशील? आपले बोलणे भळाळत्या जखमेतून उदभवलेले नसावे तर ते भरून आलेल्या घावाच्या शांततेतून असावे.

विसंगती हा सूचक इशारा असतो, स्वतःवर अधिक लक्ष देण्याची गरज अधोरेखित करणारा आणि म्हणून त्याकडे उपद्रव म्हणून बघण्याची प्रवृत्ती मागे टाकावी. त्याद्वारे स्वतःच्या आस्थांना आव्हान द्यावे, आपले संवाद अधिक अर्थपूर्ण कसे होतील यांवर काम करावे आणि त्यांतून आपले प्रतिबिंब खोलवर, विश्वासार्ह आणि स्वीकारार्ह व्हावे.

संज्ञानात्मक विसंगती याचा अर्थ जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या मनात एकाच वेळी दोन विरोधाभासी विचार, समजुती किंवा वर्तन येतात, तेव्हा त्यांना जी अस्वस्थता किंवा ताण जाणवतो, त्याला संज्ञानात्मक विसंगती म्हणतात. ही एक मानसिक अवस्था आहे जिथे व्यक्तीला आपल्याच विचारांमध्ये किंवा कृतींमध्ये विरोधाभास जाणवतो.

**अस्वस्थता:** या विरोधाभासामुळे मनात एक प्रकारची अस्वस्थता येते. निराकरण: या अस्वस्थतेतून बाहेर पडण्यासाठी व्यक्ती एकतर आपले विचार किंवा कृती बदलू शकते.

**उदाहरणे:**

**धूम्रपान करणारे:** एखाद्या व्यक्तीला माहित आहे की धूम्रपान आरोग्यासाठी हानिकारक आहे, पण तरीही ती धूम्रपान करते. या विरोधाभासामुळे तिला अस्वस्थ वाटू शकते.

**वकील:** एका प्रामाणिक वकिलाला जेव्हा एका दोषी व्यक्तीचा निर्दोष म्हणून बचाव करावा लागतो, तेव्हा त्याला संज्ञानात्मक विसंगतीचा अनुभव येऊ शकतो, कारण त्याची कृती (खोटे विधान करणे) त्याच्या ओळखीशी (प्रामाणिक माणूस) जुळत नाही.

### आकलन विसंगती म्हणजे काय?

आकलन विसंगती ही एक अप्रिय भावना आहे जी एकाच वेळी दोन परस्परविरोधी श्रद्धा, दृष्टिकोन किंवा वर्तन धारण केल्याने उद्भवते. संज्ञानात्मक विसंगतीचा अभ्यास हा मानसशास्त्रातील संशोधनाचे लाडके क्षेत्र आहे.

### आकलन विसंगती समजून घेणे

परस्परविरोधी श्रद्धा एकाच वेळी धारण केल्या जाऊ शकतात, बहुतेकदा व्यक्तीला ते कळत नाही. वैयक्तिक आणि सामाजिक बदलांवर परिणाम करण्यासाठी मानसशास्त्रातील अभ्यासाचा एक प्रमुख विषय म्हणजे श्रद्धा किंवा वर्तन बदलून संज्ञानात्मक विसंगती सोडवण्याची प्रक्रिया. लोक त्यांच्या विद्यमान श्रद्धा बदलून, नवीन श्रद्धा जोडून किंवा श्रद्धांचे महत्त्व कमी करून संज्ञानात्मक विसंगती सोडवू शकतात.

उदाहरणार्थ, मानवनिर्मित हवामान बदलाच्या धोक्यावर विश्वास ठेवणारी, परंतु खाजगी विमानातून जगभर प्रवास करणारी पर्यावरणवादी, जेव्हा त्यांच्याकडून निर्माण होणाऱ्या अप्रमाणित उच्च कार्बन उत्सर्जनाकडे लक्ष वेधले जाते तेव्हा तिला संज्ञानात्मक विसंगतीचा अनुभव येऊ शकतो. ती हवामान बदलावरील तिचा विश्वास बदलून, ती इतर लोकांपेक्षा काही प्रकारे अधिक महत्त्वाची आहे आणि यामुळे तिच्या मोठ्या कार्बन फूटप्रिंटचे समर्थन होते असा एक नवीन विश्वास जोडून किंवा हवामान बदलाचा धोका तिच्यासाठी तितका महत्त्वाचा नाही असे ठरवून ही संज्ञानात्मक विसंगती दूर करू शकते.

जेव्हा लोक धूम्रपान करतात (वर्तन) आणि त्यांना माहित असते की धूम्रपानामुळे कर्करोग होतो (ज्ञान), तेव्हा ते संज्ञानात्मक विसंगतीच्या स्थितीत असतात. जेव्हा आपण काय मानतो आणि कसे वागतो यात संघर्ष होतो तेव्हा संज्ञानात्मक विसंगती उद्भवते. उदाहरणार्थ, जर तुम्ही निरोगी जीवनशैलीला महत्त्व देता पण सिगारेट ओढता, तर तुम्हाला आतून अस्वस्थ वाटते, कारण तुमचे वर्तन आणि तुमच्या आस्था यांच्यात ताळमेळ नसतो. हा अंतर्गत संघर्ष तणाव निर्माण करतो, ज्यामुळे तुम्हाला तुमचे वर्तन बदलावे लागते, तुमच्या आस्था समायोजित कराव्या लागतात किंवा बरे वाटण्यासाठी फरकाचे समर्थन करण्याचा मार्ग शोधावा लागतो.

### सिद्धांत-

संज्ञानात्मक विसंगतीचा अभ्यास प्रथम लिओन फेस्टिंगर यांनी एका सहभागी पंथाच्या निरीक्षणादरम्यान केला होता ज्यांचा असा विश्वास होता की पृथ्वी एका मोठ्या प्रलयानंतर नष्ट होईल.

### दृष्टिकोनात बदल कसा होतो-

फेस्टिंगरचा संज्ञानात्मक विसंगती सिद्धांत म्हणतो की आपल्याला आपले दृष्टिकोन आणि कृती जुळाव्यात आणि अंतर्यामी आराम वाटावा, सुखद वाटावे असे वाटते. याला संज्ञानात्मक सुसंगतता म्हणतात.

जेव्हा आपले दृष्टिकोन आणि कृती जुळत नाहीत (ज्याला विसंगती म्हणतात), तेव्हा आपल्याला अस्वस्थ वाटते आणि काहीतरी बदलून ते दुरुस्त करण्याचा प्रयत्न करतो. या सिद्धांतात कोठेही असा दावा नाही की हे उपाय नेहमीच काम करतात, फक्त लोक त्यांची अस्वस्थता कमी करण्याचा प्रयत्न करतात. संशोधकांनी या कल्पनेचा बराच अभ्यास केला आहे आणि लोकांना त्यांच्या दृष्टिकोनात बदल कसा होतो यावर परिणाम करणाऱ्या वेगवेगळ्या गोष्टी त्यांना आढळल्या आहेत. माझ्या स्वतःच्या आयुष्यात संज्ञानात्मक विसंगती येत असेल तर मी ते कसे ओळखू शकतो?

तुमच्या श्रद्धा किंवा मूल्यांशी विसंगत असे काही केल्यानंतर तुम्हाला अस्वस्थता, ताणतणाव किंवा चिंता जाणवते तेव्हा तुम्ही तुमच्या जीवनात संज्ञानात्मक विसंगती ओळखू शकता. उदाहरणार्थ, जर तुम्ही अशा पद्धतीने वागलात जे तुम्हाला योग्य वाटते त्याच्याशी जुळत नाही, तर तुम्हाला अपराधीपणाची किंवा भावनिक अस्वस्थतेची भावना छळू शकते.

हा अंतर्गत ताण कमी करण्यासाठी तुम्ही तुमच्या कृतींचे समर्थन किंवा तर्कसंगतीकरण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे तुम्हाला आढळेल. दुसऱ्यांदा निर्णय घेणे, एखादी परिस्थिती शक्य असेल तर टाळणे किंवा तुमच्या निवडी किंवा आस्थांबद्दल मानसिकदृष्ट्या संघर्ष वाटणे या लक्षणांचा समावेश आहे. या भावना लक्षात घेणे हे संज्ञानात्मक विसंगती समजून घेण्याच्या आणि हाताळण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल असते. काही वास्तवातील घटनांचा अभ्यास करून हि प्रक्रिया समजून घेऊ या.

### उत्साह - रुचे व्यसन विरुद्ध पुनर्प्राप्ती

रु ही एक किशोरवयीन मुलगी आहे जी ड्रग्जच्या व्यसनाशी झुंजत आहे आणि त्याचबरोबर स्वच्छ राहून निरोगी जीवन जगू इच्छिते. तिचे वर्तन (औषधांचा वापर) तिच्या विश्वासाशी आणि बरे होण्याच्या इच्छेशी विसंगत असल्याने तिला तीव्र संज्ञानात्मक विसंगतीचा अनुभव येतो. या अंतर्गत संघर्षामुळे अपराधीपणा, लाज आणि चिंता निर्माण होते. ही विसंगती कमी करण्यासाठी आणि तिच्या भावनिक वेदना व्यवस्थापित करण्यासाठी, रु अनेकदा तिच्या ड्रग्जच्या वापराचे समर्थन करते आणि स्वतःला सांगते की यामुळे तिला आघात सहन करण्यास मदत होते किंवा ती केव्हाही सोडू शकते. ही कारणे मानसिक अस्वस्थतेपासून तात्पुरती आराम देतात परंतु शेवटी व्यसनाचे चक्र कायम ठेवतात. तिचा संघर्ष स्पष्टपणे दाखवतो की संज्ञानात्मक विसंगती कशी हानिकारक सवयी टिकवून ठेवू शकते.

### ब्रेकिंग बॅड - वॉल्टर व्हाइटः कुटुंब विरुद्ध गुन्हे

वॉल्टर एक सौम्य स्वभावाचा रसायनशास्त्र शिक्षक म्हणून सुरुवात करतो जो कुटुंब आणि सचोटीला महत्त्व देतो परंतु कर्करोगाचे निदान झाल्यानंतर त्याच्या कुटुंबाचे आर्थिक भविष्य सुरक्षित करण्यासाठी तो मेथाम्फेटामाइनचे उत्पादन सुरू करतो.

त्याला एक चांगली व्यक्ती म्हणून असलेली स्वतःची प्रतिमा आणि त्याच्या बेकायदेशीर, हानिकारक कृतींमध्ये विसंगती आहे. वॉल्टर या मार्गावर चालत असताना, तो त्याच्या कृतींना त्याच्या कुटुंबाच्या कल्याणासाठी आवश्यक त्याग म्हणून तर्कसंगत ठरवून अंतर्गत संघर्षाचा सामना करतो. तो स्वतःला पटवून देतो की कायदा मोडणे आणि हानी पोहोचवण्याचा धोका पत्करणे हे न्याय्य आहे कारण ते त्याच्या प्रियजनांची आर्थिक सुरक्षितता सुरक्षित करते, ज्यामुळे त्याच्या हानिकारक वर्तना असूनही त्याला नैतिक हेतूची भावना राखता येते.

### द ऑफिस - मायकेल स्कॉटचे नेतृत्व विसंगती

मायकेल स्कॉट वारंवार व्यक्त करतो की त्याला त्याच्या कर्मचाऱ्यांची खूप काळजी आहे आणि तो एक उत्तम बॉस बनू इच्छितो.

तथापि, त्याच्या कृती अनेकदा या आत्म-धारणेच्या विरोधात असतात - तो असंवेदनशील, अयोग्य किंवा स्वकेंद्रित असू शकतो, ज्यामुळे कधीकधी कामाच्या ठिकाणी त्याच्या नातेसंबंधांना हानी पोहोचते.

तो स्वतःला कसे पाहतो आणि प्रत्यक्षात कसे वागतो यातील ही विसंगती संज्ञानात्मक विसंगती निर्माण करते. हा अस्वस्थ संघर्ष कमी करण्यासाठी, मायकेल अनेकदा त्याच्या चुका तर्कसंगत ठरवतो, त्याच्या चुका मान्य करण्याऐवजी बाह्य घटकांना किंवा गैरसमजांना दोष देतो. तो स्वतःला सांगू शकतो की त्याचे अपारंपरिक वर्तन ही काळजी दाखवण्याचा त्याचा अनोखा मार्ग आहे, ज्यामुळे त्याच्या समस्याप्रधान कृती असूनही त्याला सकारात्मक स्व-प्रतिमा राखण्यास मदत होते.

### सक्तीचे अनुपालन वर्तन

जेव्हा एखाद्या व्यक्तीवर त्यांच्या खऱ्या श्रद्धा किंवा भावनांविरुद्ध जाणारे काहीतरी करण्यासाठी दबाव आणला जातो तेव्हा सक्तीचे अनुपालन वर्तन घडते. यामुळे त्यांच्यात संघर्ष निर्माण होतो कारण त्यांच्या कृती त्यांच्या विचारांशी जुळत नाहीत.

### हे कसे कार्य करते:

वर्तन आधीच झालेले असल्याने आणि ते बदलता येत नसल्याने, व्यक्ती अनेकदा वर्तनाबद्दलचा त्यांचा दृष्टिकोन बदलून विसंगती कमी करते. ते स्वतःला पटवून देऊ शकतात की त्यांनी जे केले ते इतके वाईट नव्हते किंवा ते खरोखरच त्याशी पूर्णपणे सहमत होते.

**क्लासिक स्टडी -** फेस्टिंगर आणि कार्लस्मिथ (१९५९):

या प्रयोगात, सहभागींनी कंटाळवाण्या कामांची मालिका पूर्ण केली (उदा. बोर्डवर खुंटे फिरवणे) आणि नंतर त्यांना वाट पाहणाऱ्या सहभागीला सांगण्यास सांगितले गेले की कामे मनोरंजक आहेत. काहींना खोटे बोलण्यासाठी १, तर काहींना २० देण्यात आले. ज्या सहभागींनी १ दिले त्यांच्याकडे खोटे बोलण्यासाठी पुरेसे बाह्य समर्थन नव्हते, म्हणून त्यांना तीव्र विसंगतीचा अनुभव आला. ती कमी करण्यासाठी, त्यांनी त्यांचे दृष्टिकोन बदलले आणि कार्य अधिक आनंददायी म्हणून रेट केले.

सहभागींनी २० दिले तर त्यांना पुरेसे बाह्य औचित्य (पैसे) मिळाले, त्यामुळे त्यांना कमी विसंगती जाणवली आणि त्यांनी कामाबद्दलचा त्यांचा मूळ नकारात्मक दृष्टिकोन कायम ठेवला. या अभ्यासातून असे दिसून आले की अपुरे बक्षिसे कशा प्रकारे विसंगती वाढवतात आणि वृत्ती बदलण्यास प्रेरित करतात.

### २. प्रयत्नांचे औचित्य

जेव्हा लोक निराशाजनक किंवा अप्रिय गोष्टीत बराच वेळ, शक्ती किंवा प्रयत्न खर्च करतात तेव्हा प्रयत्नांचे समर्थन होते. त्यांचे प्रयत्न वाया गेल्याची अस्वस्थता टाळण्यासाठी, ते स्वतःला खात्री पटवून देतात की निकाल फायदेशीर होता.

### ते का घडते:

जर आपण एखाद्या गोष्टीवर खूप प्रयत्न केले आणि नंतर त्याचे नकारात्मक मूल्यांकन केले तर त्यामुळे विसंगती निर्माण होते. हे कमी करण्यासाठी, आपण आपल्या धारणा पुन्हा आकार देतो, सकारात्मक पैलूंवर भर देतो किंवा अनुभवात नवीन मूल्य शोधतो.

### ३. निर्णय घेणे

दोन किंवा अधिक आकर्षक पर्यायांमधून निर्णय घेतल्याने विसंगती निर्माण होते कारण प्रत्येक निवडीचे सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही पैलू असतात.

### विसंगती का येते:

निवड केल्यानंतर, लोकांना इतर पर्यायांपासून मिळालेल्या फायद्यांबद्दल अस्वस्थ वाटते. ही अस्वस्थता कमी करण्यासाठी, ते त्यांच्या निवडीच्या सकारात्मक बाबींवर लक्ष केंद्रित करतात आणि नकारात्मक बाबींना कमी लेखतात, ज्यामुळे त्यांना त्यांच्या निर्णयावर आत्मविश्वास आणि समाधान वाटण्यास मदत होते.

या प्रक्रियेला पर्यायांचा प्रसार असे म्हणतात.

### अतिरिक्त कारणे-

परस्परविरोधी श्रद्धा: एकाच वेळी विरुद्ध श्रद्धा बाळगल्याने (उदा. प्रामाणिकपणावर विश्वास ठेवणे पण खोटे बोलणे) तणाव निर्माण होतो.

मूल्यांशी संघर्ष करणारे वर्तन: वैयक्तिक नैतिकता किंवा मूल्यांविरुद्ध वागल्याने विसंगती आणि अपराधीपणाची भावना निर्माण होऊ शकते. खोलवर असलेल्या विश्वासांना आव्हान देणाऱ्या तथ्यांचा सामना केल्याने विसंगती निर्माण होऊ शकते, ज्यामुळे नकार किंवा वृत्ती बदलू शकते.

### विसंगती कशी कमी करावी?

दृष्टिकोन किंवा वर्तन बदलणे कठीण असू शकते. कधीकधी, लोक विसंगतीला धरून राहतात किंवा टाळाटाळ, नकार किंवा इतर संरक्षण यंत्रणेत गुंततात ज्यामुळे तर्कहीन किंवा विसंगत वर्तन होऊ शकते.

### १. वर्तन बदल

जेव्हा विसंगतीमध्ये एखाद्या श्रद्धेशी संघर्ष करणारे वर्तन समाविष्ट असते, तेव्हा ते कमी करण्याचा सर्वात थेट मार्ग म्हणजे वर्तन बदलणे किंवा काढून टाकणे. उदाहरणार्थ, धूम्रपान हानिकारक आहे असे मानणारा धूम्रपान करणारा संघर्ष सोडवण्यासाठी धूम्रपान सोडू शकतो.

तथापि, हे खूप आव्हानात्मक असू शकते कारण सुशिक्षित वर्तन किंवा सवयी सोडणे कठीण असते. वर्तन बदलण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी लोकांना मानसिक रणनीती वापरणे सोपे जाते.

### २. तर्कसंगतीकरण

तर्कशुद्धीकरणामध्ये परस्परविरोधी वर्तन किंवा श्रद्धा स्वीकार्य वाटण्यासाठी स्पष्टीकरणे किंवा सबबी तयार करणे समाविष्ट आहे.

वर्तन बदलण्याऐवजी, व्यक्ती परिस्थितीबद्दल विचार करण्याची पद्धत बदलते. उदाहरणार्थ, धूम्रपान करणारा म्हणू शकतो, मी फक्त कधीकधी धूम्रपान करतो, किंवा त्यामुळे मला आराम मिळतो, ज्यामुळे धूम्रपान सोडल्याशिवाय संघर्ष कमी होतो.

### ३. नवीन माहितीद्वारे समर्थन

लोक अनेकदा नवीन माहिती शोधतात किंवा त्यावर भर देतात जी परस्परविरोधी श्रद्धेपेक्षा जास्त असते. उदाहरणार्थ, धूम्रपान करणारा व्यक्ती अशा अभ्यासांवर लक्ष केंद्रित करू शकतो जे सूचित करतात की धूम्रपानामुळे फुफ्फुसांचा कर्करोग होतो हे संशोधनात निश्चितपणे सिद्ध झालेले नाही, अशा प्रकारे मूळ श्रद्धेच्या ताकदीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून विसंगती कमी करते.

### ४. वृत्ती समायोजन

विसंगती कमी करण्याचा आणखी एक प्रभावी मार्ग म्हणजे वर्तनाशी चांगल्या प्रकारे जुळवून घेण्यासाठी स्वतःच्या वृत्ती किंवा श्रद्धा समायोजित करणे. यामध्ये पर्यायांचा प्रसार करणे समाविष्ट आहे, जिथे एखादी व्यक्ती त्यांच्या निवडलेल्या वर्तनाचे आकर्षण वाढवते आणि नाकारलेल्या पर्यायांचे किंवा परस्परविरोधी विश्वासांचे आकर्षण कमी करते. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती स्वतःला असे पटवून देऊ शकते की दीर्घकालीन आरोग्य परिणामांची चिंता करण्यापेक्षा आजसाठी जगणे आणि धूम्रपान सारख्या आनंदांचा आनंद घेणे अधिक महत्त्वाचे आहे. यामुळे धूम्रपान माझ्या आरोग्यासाठी हानिकारक आहे यासारख्या विसंगत ज्ञानाचे महत्त्व कमी होते.

---

**दिल्लीमधील बॉम्बस्फोटानंतर झालेल्या तपासातून दहशतवादाचे नवे रूप पुढे आले. पूर्वी गरीब, पीडित लोक दहशतवादाकडे वळायचे. आता डॉक्टरांसारखे उच्चशिक्षित लोक दहशतवादाकडे वळत आहेत, ही चिंताजनक बाब समोर आल्याने 'डॉक्टर तुम्हीसुद्धा...!' असे म्हणावे लागत आहे.**

# डॉक्टर तुम्हीसुद्धा...!



समाजभान
अनिल आठल्ये

आणखी एका दहशतवादी हल्ल्यानंतर देशापुढे काही नवे प्रश्न उभे राहिले आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये आपल्याला एकेकाळी अनुभवायला मिळणाऱ्या बॉम्बस्फोटांची सवय राहिलेली नाही. असे काही प्रकार अधूनमधून घडत असतात, असे म्हणायचीही सोय नाही.

अलिकडच्या काळात भारताने आपली तटबंदी आणि एकूणच गुप्तवार्ता विभाग अधिक सक्षम केला आहे. असे असताना एवढा मोठा, शक्तिशाली बॉम्बस्फोट होणे, त्याची पृष्ठभूमी अधिक धक्कादायक असणे, ही एक मोठी बाब ठरली आहे. खरे सांगायचे तर या निमित्ताने दहशतवादाचे नवे रूप पुढे आले. किमान ताजा तपास आणि त्यातून पुढे येणारी तथ्ये त्याकडे अंगुलिनिर्देश करीत आहेत. आजपर्यंत गरीब, पीडित, नाडलेले लोक अतिरेकी कृत्यांमध्ये जास्त प्रमाणात आढळायचे. आता मात्र डॉक्टरांसारखे उच्चशिक्षित लोक दहशतवादाकडे वळत आहेत, ही चिंताजनक बाब समोर आल्याने 'डॉक्टर तुम्हीसुद्धा...!' असे म्हणावे लागत आहे. त्यातही गुजरातमध्ये अटक केलेले दहशतवादी जैविक हत्यारांच्या निर्मितीच्या प्रयत्नात होते. हा गंभीर धोका असून सर्वांनी या नव्या रूपाचा अधिक गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

नवी दिल्लीमध्ये ११ नोव्हेंबर रोजी झालेल्या बॉम्बस्फोटाआधी भारतात घडलेल्या अनेक दहशतवादी घटनांचा आढावा घेतल्यास पूर्वीच्या दहशतवादी घटनांपेक्षा दिल्लीतील बॉम्बस्फोटाची घटना फारच वेगळी आणि चिंता करायला लावणारी आहे. सर्वसाधारणपणे दहशतवादी कृत्यांमध्ये सहभागी असणाऱ्या अर्धशिक्षित किंवा अशिक्षित लोकांना दहशतवादासाठी प्रवृत्त करण्यामागे मुल्ला-मौलवींचा हात असायचा. पैशासाठी ते लोक दहशतवादाकडे सहज वळायचे; यावेळी दहशतवादी कृत्यांमध्ये सहभागी झालेले लोक पाहता दहशतवादाचा नवा पैलू समोर आला आहे. खडतर परिश्रम करून वैद्यकीय व्यवसायातील पदवी, द्विपदवी मिळविणारे लोक दहशतवादात सामील होत आहेत. उच्चशिक्षित डॉक्टरांची एखादी टोळीच दहशतवादात सामील असण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. सुदैवाने भारतीय गुप्तचर संस्थांच्या योग्य कारवायांमुळे ३०० किलो स्फोटके आणि हत्यारे आधीच जप्त करण्यात आल्यामुळे घातपाताचा मोठा कट उघड करण्यात आला आहे.

एरवी आपण गुप्तहेर संस्थांच्या अपयशावर खापर फोडून मोकळे होत असतो; यावेळी मात्र तशी परिस्थिती नव्हती. गुप्तचर संस्थेच्या अपयशाची आवई न उठवता त्यांनी उघडकीस आणलेला मोठा कट हे गुप्तहेर संस्थांचे मोठे यश आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. नवी दिल्लीमध्ये झालेला बॉम्बस्फोट हा घाईघाईत किंवा चुकूना घडलेला अपघात आहे, असे मानण्यास वाव आहेनवी दिल्लीमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाच्या अगोदर गुजरातमध्ये तीन दहशतवाद्यांना अटक करण्यात आली. त्यांच्या चौकशीतून पुढे आलेली माहिती चिंता वाटायला लावणारी आहे. तिथे अटक केलेल्या दहशतवाद्यांपैकी एकाने जैविक हत्यार तयार करण्याचा प्रयत्न चालवला होता. त्यात त्याला यश आले असते, तर हजारो लोकांचा बळी गेला असता; परंतु सुदैवाने त्याला अटक झाल्यामुळे पुढील अनर्थ टळला. काही वर्षांपूर्वी अमेरिकेमध्ये अशाच प्रकारे तिथल्या एमआयटी या प्रसिद्ध विद्यापीठात शास्त्रज्ञ असलेल्या डॉक्टर अफिया सिद्दिकी नावाच्या पाकिस्तानी शास्त्रज्ञ महिलेला असेच जैविक हत्यार तयार करण्याचा प्रयत्न करताना पकडले गेले होते. अमेरिकेने तिच्यावर खटला भरला. न्यायालयात सुनावणी झाली. तिला ९० वर्षांची शिक्षा झाली. त्यानंतर पाकिस्तानने वारंवार अफिया सिद्दिकी हिला सोडविण्याचा प्रयत्न केला; परंतु अमेरिकेने पाकिस्तानला भीक घातली नाही. सिद्दिकी अजूनही अमेरिकेच्या तुरुंगात खितपत पडली आहे. अमेरिकेची याबाबतची भूमिका किती कठोर आहे, हे यावरून लक्षात घ्यायला हवे. प्रकरण एवढ्यावरच संपले नाही. अफिया सिद्दिकी हिच्या प्रकरणानंतर अमेरिकेने अशा प्रकारच्या जैविक संशोधनात सामील होणाऱ्या व्यक्तींवर कठोर निर्बंध घातले. आज स्थिती अशी आहे की, या संवेदनशील क्षेत्रात कुणाही मुसलमान व्यक्तीला प्रवेश दिला जात नाही. भारतातही जैविक शस्त्रे निर्माण केली तर फार मोठा धोका आहे. यामुळे अमेरिकेप्रमाणेच भारतालाही कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. सर्वसाधारणतः दहशतवादी कृत्यांमध्ये सहभागी होणारे लोक काही ना काही व्यक्तिगत कारणामुळे किंवा आर्थिक प्रलोभनासाठी सामील झालेले असतात. मुंबईवरील २६/११ च्या हल्ल्यातील आरोपी अजमल कसाब हा अत्यंत गरीब परिस्थितीतून आला होता. केवळ पैशासाठी तो दहशतवादाकडे वळला; परंतु डॉक्टर अफिया किंवा आता नवी दिल्ली बॉम्बस्फोटाच्या कटाशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंधित असलेल्या डॉक्टरांची परिस्थिती पाहिली, तर या दहशतवाद्यांसाठी धार्मिक आणि इतर प्रेरणा महत्त्वाच्या आहेत, हे लक्षात येते. अशा प्रकारे दहशतवादी कृत्य करून या मंडळींनी डॉक्टरांसारख्या मानवतावादी पेशाच्या इभ्रतीला धक्का लावला आहे. या काही मूठभर व्यक्तींच्या कारवायांमुळे संपूर्ण मुस्लिम समाजाबद्दल एक प्रकारचा संशय निर्माण झाला असून याबाबत आता मुस्लिम विचारवंतांनी विचार करणे आवश्यक आहे. दरवेळेप्रमाणे भारतातील दहशतवादी कृत्याचे खापर पाकिस्तानवर फोडले जाते; परंतु आता दहशतवादी कृत्यामध्ये भारतातील नागरिक स्वतःहून सामील असण्याची शक्यता आहे. त्यांना पाकिस्तानकडून पाठबळ मिळाले असेलही; परंतु त्यांचा मुख्य उद्देश आपण ज्या देशात राहतो, त्या देशाविरुद्ध किंवा इतर धर्मीयांविरोधात दहशतवादी कारवाया करणे हा होता. त्यांना असे का वाटले असेल, याचे उत्तर शोधावे लागेल. नवी दिल्लीत बॉम्बस्फोट झाला, त्याच्या दुसऱ्याच दिवशी पाकिस्तानची



राजधानी इस्लामाबादमध्येही बॉम्बस्फोट झाला आणि त्यात १०-१२ लोक ठार झाले. त्या स्फोटाची जबाबदारी पाकिस्तानमधील 'तेहरिक-ए-तालिबान' या दहशतवादी संघटनेने घेतली. पाकिस्तानमध्ये पश्तून लोक तिथल्या सरकारविरोधात लढत आहेत. त्याचीच परिणीती दहशतवादी हल्ल्यात होत आहे. काही वर्षांपूर्वी भारतातील संसदेवर 'जैश-ए-मोहम्मद'ने हल्ला केला.

भारतीय संसदेवर हल्ला करण्यामागे 'जैश-ए -मोहम्मद' या संघटनेचा भारत आणि पाकिस्तानमध्ये अणुयुद्ध घडवून आणणे, हा उद्देश होता. नवी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ ११ तारखेला झालेल्या आणि पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटामधील साम्य शोधले, तर भारत-पाकिस्तानदरम्यान अणुयुद्ध घडविण्याची काही दहशतवादी संघटनांची योजना असण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारत आणि पाकिस्तान ही दोनही राष्ट्रे अण्वस्त्रसंपन्न असून या दोन राष्ट्रांमध्ये अणुयुद्ध झाल्यास पाकिस्तान जगाच्या भूमीवरून नष्ट होईल; त्याच वेळी

भारताचेही मोठे नुकसान होईल, हे वास्तव आपल्याला विसरता येणार नाही. यामुळे अशा धोक्यांपासून दूर राहण्याची आवश्यकता असून त्यासाठी भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशात समन्वय ठेवण्याची गरज आहे; त्यासाठी पहिले पाऊल पाकिस्तानलाच उचलावे लागेल. त्या देशाने वाढत असलेल्या दहशतवादी संघटनांवर अंकुश ठेवण्याची गरज आहे. तसे न केल्यास दहशतवादाचा भस्मासुर पाकिस्तानला नष्ट केल्याशिवाय राहणार नाही. ही जाणीव पाकिस्तानला आहे का, हा खरा प्रश्न आहे.

# मखमली हातमोज्यातील 'लोखंडी मुठ'



गुजरातच्या राजकीय आणि प्रशासकीय मुखपृष्ठावरवर वेगाने वर येणारे नाव म्हणजे हर्ष संघवी. केवळ ४० वर्षांच्या वयात राज्याचे उपमुख्यमंत्रीपद भूषवणारे संघवी हे आधुनिक, तरुण आणि कार्यक्षम प्रशासनाचे प्रतीक बनले आहेत. कदाचित इतक्या तरुण वयात इतक्या उंचीवर गेलेले, देशातील फार कमी नेत्यांमध्ये हर्ष संघवी यांचा समावेश होतो.

सत्ताकारण
प्रसन्न आठवले
भ्र. ९०४९३५३८०९

गुजरातच्या राजकीय आणि प्रशासकीय मुखपृष्ठावरवर वेगाने वर येणारे नाव म्हणजे हर्ष संघवी. केवळ ४० वर्षांच्या वयात राज्याचे उपमुख्यमंत्रीपद भूषवणारे संघवी हे आधुनिक, तरुण आणि कार्यक्षम प्रशासनाचे प्रतीक बनले आहेत. कदाचित इतक्या तरुण वयात इतक्या उंचीवर गेलेले, देशातील फार कमी नेत्यांमध्ये हर्ष संघवी यांचा समावेश होतो.

**शिस्तीचा आणि संवेदनशीलतेचा संगम**

२०२१ ते २०२५ या काळात हर्ष संघवी यांनी गुजरातचे गृहराज्यमंत्री (स्वतंत्र कारभार) म्हणून कार्य केले. या काळात त्यांनी कठोर निर्णयक्षमतेसोबतच, लोकांशी संवेदनशील संवाद राखला. त्यांचे प्रशासनिक धोरण कडक हात, पण जनसंपर्क जिव्हाळ्याचा असेच म्हणता येईल.

**आंतरिक सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था सुधारणा**

गुजरातची आंतरिक सुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी संघवी यांनी अनेक पातळ्यांवर सुधारणा केल्या. पोलिस दलाचे प्रशिक्षण, तंत्रज्ञानाधारित देखरेख व्यवस्था आणि नागरिकमैत्री तक्रार निवारण केंद्रांची उभारणी हे त्यांच्या कार्यकाळातील ठळक टप्पे ठरले.

- दरवर्षी सुमारे २,५०० जनअर्जांची तातडीने दखल घेणारे हे तंत्र त्यांनी विकसित केले.
- सायबर फसवणूक, अवैध मद्यव्यवसाय आणि महिलांवरील गुन्हे यांसारख्या विषयांवर त्यांनी शून्य-सहिष्णुता धोरण अवलंबले.
- इथे गेल्यावर्षीच्या गणपती मधे अहमदाबाद येथे शांतिप्रिय समुदायाने केलेल्या दगडफेकीच्या घटनेची आठवण येते. साधारण संध्याकाळी ८ नंतर घडलेल्या या घटनेनंतर साधारण रात्री १० १०३० च्या आसपास राज्याचे गृहमंत्री असलेल्या संघवी यांनी पत्रकारांसमोर आणि कॅमेरासमोर आश्वासन दिलं की ज्यांनी हे केलं ते उद्याच्या सूर्योदयाच्या आधी, ताब्यात असतील. त्यानंतर दुसऱ्या सकाळी सूर्योदयाआधी, सर्वच्या सर्व २० ते २५ जणांना गुजरात पोलिसांनी ताब्यात घेऊन, त्यांच्याच हातापायाची येथेच्छ मालिश करून, नंतर लंगडत जाणाऱ्या सर्वांना कोर्टात घेऊन जातानाचं दृश्य सर्व जगाने पाहिलं.

**'बेट द्वारका' मोहीम आणि प्रशासनिक धैर्य**

राज्यव्यापी अतिक्रमणविरोधी मोहिमेची हर्ष संघवी यांनी स्वतः देखरेख केली. विशेषतः 'बेट द्वारका' येथील ३३५ बेकायदा व्यावसायिक आणि धार्मिक बांधकामे हटवून तब्बल १ लाख चौरस मीटर सार्वजनिक जागा, मोकळी करण्यात आली. या मोहिमेने सांस्कृतिक जतन घडवून आणलं आणि त्यासोबत कायदा-सुव्यवस्था यांचा सुंदर समन्वय साधला.

**'मोरबी पूल दुर्घटना' - संकटातील नेतृत्वाची कसोटी.**

२०२३ मधील मोरबी पूल दुर्घटनेनंतर संघवी यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पोहोचून, बचावकार्याचे समन्वयन केले. त्यांच्या तत्परतेमुळे आणि जबाबदारी निश्चित करण्याच्या कठोर भूमिकेमुळे, लोकांचा प्रशासनावर विश्वास वाढला. या घटनेनंतर पायाभूत सुरक्षा मानके अधिक कडक करण्यात आली. संघवी यांच्यातील कसोटीच्या काळातील नेतृत्वगुण प्रखरपणे उजळून निघाले. कारण ज्यापद्धतीने त्यांनी बचावकार्य हाताळलं, त्यामुळे वरिष्ठ नेतृत्वाला त्यांच्यावर अधिक विश्वास निर्माण झाला.

**तरुणाई, क्रीडा आणि सामाजिक बांधिलकी**

गृहराज्य कारभारासोबतच संघवी यांनी तरुण आणि नागरिक सहभाग कार्यक्रमांवर विशेष भर दिला.

क्रीडा आणि रोजगार हे गुन्हे प्रतिबंधाचे साधन म्हणून त्यांनी मांडले. गुजरातला २०३० राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे यजमानपद मिळवून देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला, तसेच राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजनही केले.




**शासनशैली - "Iron Fist in Velvet Glove' अर्थात 'मखमली हातमोज्यातील लोखंडी मुठी'.**

त्यांच्या कामकाजाचा सारांश एका वाक्यात सांगायचा तर - Iron Fist in Velvet Glove, म्हणजेच कठोर निर्णयक्षमतेसोबत, मृदू जनसंपर्क. गुजरातमध्ये गृहमंत्रालयाचा स्वतंत्र कारभार मुख्यमंत्र्यांशिवाय प्रथमच, मुख्यमंत्री नसलेल्या, संघवींना २०२१ मधे, मात्र ३६ व्या वर्षीच देण्यात आला. हे त्यांच्या प्रशासनिक क्षमतेचे, गुणांचे, कौशल्याचे मानांकन तर होतेच. पण हा आतापर्यंतच्या परंपरेपासून एक वेगळा आणि क्रांतिकारी निर्णय घेतला होता.

त्यात मोदीजी आणि अमितभाई यांचा दृष्टिकोन आणि भविष्यकालीन योजना दिसून येते. अर्थातच संघवी यांनी २०२१ म्हणजेच पदभार स्वीकारल्यापासून आपल्या कार्याने, कुशलतेने, कठोर भूमिकेमुळे, कायद्याचा कठोर अंमलबजावणीमुळे आपल्या केंद्रीय वरिष्ठांची मर्जी राखलीच. पण आपल्याबद्दल भविष्यकालीन आशावाद निर्माण केला. त्याचीच परिणती, ऑक्टोबर २०२५ मध्ये घडलेल्या अमुलाग्र मंत्रिमंडळ फेरफारात, संघवी यांना उपमुख्यमंत्री म्हणून बढती देऊन, कालच १७ ऑक्टोबर ला त्यांचा शपथविधी पार पडला.

**सामाजिक सेवेतून राजकारणात प्रवास**

८ जानेवारी १९८५ रोजी जन्मलेले हर्ष संघवी यांनी औपचारिक शिक्षण आठवीपर्यंतच घेतले आहे, परंतु सामाजिक सेवेची आवड लहानपणापासूनच जोपासली. ते तापी, व्यारा आणि आदिवासी भागात, वैद्यकीय सेवा उपक्रमांत सहभागी झाले. २०१२ मध्ये मजुरा मतदारसंघातून केवळ २७ वर्षांच्या वयात आमदार झाले आणि नंतर २०१७ व २०२२ मध्येही मोठ्या फरकाने विजयी झाले.

**राजकीय विश्वास आणि राष्ट्रीय पातळीवरील दृष्टी**

२०२१ पासून त्यांनी गृह, क्रीडा, उद्योग, सीमासुरक्षा, नागरी संरक्षण अशा अनेक खात्यांचा स्वतंत्र कारभार सांभाळला. ज्या प्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात केला होता, त्याची झलक संघवींच्या कार्यशैलीत दिसते. कारण ही सर्व खाती मोदीजींनी आपल्या कार्यकाळात राज्यात समर्थपणे सांभाळली होती.


तीच खाती एक राज्यमंत्री म्हणून संघवी यांना स्वतंत्रपणे देण्यात आली होती. त्या मोदींचीच झलक संघवींच्या कामात आहे, असा जाणकारांचा दावा आहे. पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचा त्यांच्यावर असलेला विश्वास आणि दक्षिण गुजरातमधील संघटनात्मक बळ या घटकांमुळेच ऑक्टोबर २०२५ मध्ये त्यांना गुजरातचे उपमुख्यमंत्री बनविण्यात आले.

**नव्या पिढीचे नेतृत्व**

गुजरातच्या भाजप नेतृत्वात ही नेमणूक एक पिढीगत बदलाचे प्रतीक ठरली आहे. संघवींच्या नेतृत्वात शिस्त, संघटन कौशल्य आणि तंत्रज्ञानाभिमुख शासनाचा नवा अध्याय सुरू झाला आहे. म्हणजेच मोदी आणि शहा यांनी अगदी सहजपणे राज्याचं नेतृत्व दुसऱ्या पिढीकडून तिसऱ्या आणि सर्वात ताज्या ४० वर्षाच्या संघवी यांच्याकडे सोपवण्याची तयारी सुरू केली आहे.

कदाचित पुढच्या दशकात संघवी यांची राज्यात जडणघडण करवून, मग त्यांना पुढे केंद्रात आणण्यात येईल, असा एकूण प्लॅन दिसतो. तरीही काही लोक मोदींना आपल्या समोर स्पर्धा नको आहे, अशी बोंब करत असतात. म्हणूनच त्यांची राज्यातील बढती, राज्यासाठी आणि देशासाठी एका नवीन नेतृत्वाचा उदय म्हणून पाहण्यात येत आहे. २७ व्या वर्षी आमदार आणि आता ४० व्याच वर्षी उपमुख्यमंत्री, ही नक्कीच साधी बाब नाही. त्यात त्यांच्या प्रामाणिकता, तत्परता आणि लोकांशी जिव्हाळ्याचा संवाद या तीन गुणांबरोबर, उच्च राजकीय क्षमता आणि नेतृत्व कौशल्य सुद्धा दिसते. येणारा दोन ते तीन दशकांचा काळ हर्ष संघवी यांच्या नेतृत्वाचा पुढील तीन दशकांचा उज्वल काळ असेल, हे नक्की. देशाला भविष्यात एका परिपूर्ण नेत्याची गरज संघवी पूर्ण करतात का, हे संघवी यांची, काल सुरू झालेली, नवीन इनिंग ठरवेल.

# थातूरमातूर उपायांमुळे वाढली समस्या



**राज्यात जुन्नर, नाशिक, नगर तसेच इतर काही जिल्ह्यांमध्ये गेल्या २५ वर्षांपासून सातत्याने वाढ होत असलेल्या बिबट्यांच्या समस्येवरील उपाययोजनांमधील थातूरमातूरपणा आणि गांभीर्याच्या अभावामुळे सामान्यांचे जगणे संकटग्रस्त झाले आहे. हे बिबटे मुळात शेतीतलेच असल्याने समस्येची जटिलता वाढली आहे. म्हणूनच वन विभागाने या गंभीर प्रश्नावर उपाययोजना करताना ते मानवकेंद्रित राहतील, अशी काळजी घेणे आवश्यक आहे.**

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

राज्यात विशेषत: शेतीच्या क्षेत्रात गेल्या २५ वर्षांपासून वन्यजीव- मानव संघर्ष सुरू आहे. अनेक जिल्ह्यांमधील बागायती तसेच उसाचे क्षेत्र असलेल्या जिल्ह्यात ही समस्या गंभीर बनली असून सातत्याने वाढत आहे. नुकतेच जुन्नर विभागात बिबट्याच्या हल्ल्यात सलग चार बळी गेल्याने जनक्षोभ उसळला. त्यानंतर खडबडून जागे झालेल्या वन विभागाच्या शूटर्सनी एका संशयित नरभक्षक बिबट्याला ठार केले. तसे पाहिले तर, फक्त बिबट्यांच्या हल्ल्यांमध्ये गेल्या पाच वर्षांमध्ये राज्यात आतापर्यंत सुमारे १२० जणांचा बळी गेला आहे. फक्त जुन्नर वन विभागात २०२० ते २०२५ दरम्यान बिबट्यांच्या हल्ल्यात सुमारे २४ जणांचा मृत्यू झाला आहे.

राज्यात याच काळात ही संख्या १०० हून अधिक आहे. यावरून या समस्येच्या तीव्रतेत वाढच होत असल्याचे स्पष्ट होते. अनेक उपाययोजना करूनही हे प्रमाण कमी न होण्याचा अर्थ सरकारला आपल्या उपाययोजनांमध्ये क्रांतिकारी बदल करावे लागणार, हे स्पष्ट आहे. या समस्येवर उपाय म्हणून सरकारने आता जुन्नर विभागातील बिबट्यांची नसबंदी करण्याचे ठरवले आहे. हा उपाय म्हणजे 'जखम पायाला अन् औषध शेंडीला' असा प्रकार आहे. वन्यजीव व्यवस्थापनात जगात अद्याप कुठेही न घडलेला असा हा प्रकार आहे. बिबट्याच्या हल्ल्यात लहान मुलांचा सलग बळी गेल्याने अलिकडे जुन्नर परिसराबरोरच राज्यभर खळबळ उडाली. अर्थातच, या समस्येचे खापर वन विभागावर फोडले जात आहे.

खरे तर, लहान मूल बिबट्याच्या हल्ल्यात बळी पडते, तेव्हा कुटुंबावर मोठा मानसिक आणि भावनिक आघात होतो. वन विभागाने अशा ठिकाणी तातडीने भेट देऊन कुटुंबाच्या सांत्वनाबरोबरच आर्थिक भरपाई देण्याचे धोरण आखले. भरपाईची ही रक्कमही आता २५ लाख रुपये आहे. पण, त्यामुळे त्या कुटुंबाची हानी कशी भरून येणार, या प्रश्नाचे उत्तर वन विभागाकडे नाही. तत्काळ उपाययोजनेचा भाग म्हणून अशा घटना घडलेल्या भागात पिंजरा लावून तेथील बिबटे पकडून दूर सोडण्याचेही वन विभागाचे धोरण आहे. पण, बिबट्यांची संख्या जास्त असते. एक बिबट्या उचलला की त्याची जागा दुसरा बिबट्या घेत असतो. शिवाय दुसरीकडे सोडलेल्या बिबट्याने नवीन भागात गेल्यावर भांबावून जाऊन तेथे त्रास दिल्याची काही उदाहरणे आहेत. त्यामुळे असे करणे म्हणजे फक्त समस्येचे स्थलांतर असल्याचा काही वन्य जीव अभ्यासकांचा आक्षेप असल्याने हा उपाय थांबविण्यात आला. कारण पकडलेला बिबट्या सोडायचा नाही, म्हटल्यावर पोषणाचा खर्च कोणी करायचा, हाही प्रश्न निर्माण झाला. उपाय मानवकेंद्रित हवेत शेती क्षेत्रातील बिबट्यांच्या समस्येवर उपाययोजना करताना त्या 'मानवकेंद्रित' नसल्याचा हा पुरावा आहे. कारण पकडल्या गेलेल्या बिबट्याच्या पुनर्वसनाचा प्रश्न विचारात घेतला गेला.

मुळात बिबट्यांची तीव्र समस्या असलेल्या जुन्नर, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील भाग प्रादेशिक वन विभागाच्या अंतर्गत येतात. येथे चालणाऱ्या कामांशी बिबट्याच्या व्यवस्थापनाचा काहीही संबंध नाही. त्यामुळे बिबट्यांच्या समस्येवर उपाययोजना करताना प्रशिक्षित मनुष्यबळ आणि साधनांचा प्रचंड तुटवडा आहे. तात्पुरता उपाय म्हणून बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावायचा म्हटला, तरी त्यात बिबट्याला आमिष म्हणून कुत्रा किंवा शेळी ठेवली जायची. त्यावेळी पर्यावरण चळवळीतील कार्यकर्त्या आणि माजी केंद्रीय मंत्री मनेका गांधी यांनी पिंजऱ्यात आमिष म्हणून ठेवलेल्या प्राण्यावर हा एक प्रकारे अन्याय असल्याचा आक्षेप घेतला. त्यामुळे पुन्हा पिंजऱ्यात आमिषासाठी स्वतंत्र कप्पा तयार करावा लागला. शिवाय एकदा पिंजऱ्यात अडकल्यानंतर बिबट्या व तो प्राणी यांच्यात भक्कम भिंतवजा पडदाही तयार करावा लागला. अर्थातच, अशा अडथळ्यांमुळे या समस्येचे कधीच पूर्ण निराकरण झाले नाही. उलट, उपाययोजनांच्या अंमलबजावणीमध्ये आलेल्या शिथिलतेमुळे या समस्येची तीव्रता पुन्हा वाढली. त्यातूनच आता या भागातील बिबट्यांच्या नसबंदीचा नवीन उपाय काहींनी शोधला आहे.

अर्थात नसबंदीमुळे काही बिबट्यांच्या पुढील पिढीच्या निर्मितीला पायबंद बसेल, पण हेच बिबटे पुन्हा त्याच भागात सोडल्यावर समस्या निर्माण करणार नाहीत, याची खात्री कोण देणार? शिवाय सर्व बिबट्यांची सरसकट नसबंदी शक्य होईल का, याबाबतही शंका उपस्थित होत आहेत. काही प्रश्न अनुत्तरित ठरावीक भागातच बिबट्यांची संख्या का वाढते, याचा अभ्यास झाला आहे. त्यानुसार उसामुळे मिळणारे लपण, जवळच असलेल्या गावातील भटकी कुत्री, पाळीव डुकरे, मांजरे यांच्या रूपाने सहज उपलब्ध होणारे खाद्य आणि पाणी यामुळे बिबटे अशा भागांमध्ये स्थिरावून वेगाने वाढत असल्याचे स्पष्ट झाले. जंगलांमधील अन्न कमी झाल्याने हे बिबटे जवळच्या जंगलांमधून बाहेर आल्याचा सिद्धांत चुकीचा आहे.

शेतीच्या भागातील बिबटे तसे मूळचे तेथीलच आहेत. फक्त उसाचे क्षेत्र वाढल्यानंतर त्यांची संख्या झपाट्याने वाढल्याचे या संदर्भातील अभ्यासात स्पष्ट झाले आहे. त्यातच बिबट्या हा तसा संधिसाधू आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी जुळवून घेणारा प्राणी आहे. वेळप्रसंगी तो अगदी सरडा किंवा बेडूकही खाऊन जगू शकतो. जंगलात बिबट्याच्या पिलांना अनेक नैसर्गिक शत्रू असतात, त्यामुळे त्यांची संख्या मर्यादित राहते. शेती क्षेत्रात बिबट्यांच्या पिलांना नैसर्गिक शत्रू नसणे, हे त्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ होण्यामागील एक महत्त्वाचे कारण आहे. जुन्नर विभागातील बिबट्यांची संख्या बेसुमार वाढल्याने त्यातील काही बिबट्यांनी जुन्नर तालुक्याला लागून असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेरसारख्या दुष्काळी तालुक्यात स्थलांतर केले आहे. या भागात ते स्थिरावले आहेत. त्यामुळे भविष्यात या भागातही बिबट्यांची तीव्र समस्या निर्माण झाल्यास आश्चर्य वाटू नये. दुसरा प्रश्न म्हणजे, लपण, भटक्या कुत्र्यांच्या रूपाने सहज उपलब्ध होणारे भक्ष्य ही स्थिती देशभरातल्या बागायती शेतीच्या क्षेत्रात आहे. मग, महाराष्ट्राच्या काही भागातच बिबट्यांची संख्या का वाढत आहे, या प्रश्नाचा वस्तुनिष्ठ अभ्यास झालेला नाही. समस्येच्या कारणांच्या सर्व पैलूंची माहिती असल्याशिवाय उपाययोजनांना काहीही अर्थ नाही.

निवारा केंद्रांचे अर्थकारण पिंजऱ्यातील शेळी किंवा कुत्र्यावरील भावनिक अत्याचारांचा विचार करणाऱ्या स्वयंसेवी संस्था ज्यांच्या घरातील एकुलतं एक मूल बिबट्याच्या हल्ल्यात बळी जाते, त्यांच्याबाबत एकही अक्षर उच्चारताना दिसत नाहीत. प्राण्यांच्या हक्कांबद्दल उच्चरवाने बोलणाऱ्या काही स्वयंसेवी संस्थांचे आर्थिक हितसंबंध आता उघड झाले आहेत. वन विभागाने बिबट्यांसाठी माणिकडोह येथे बिबट्या निवारण केंद्र उभे केले. येथे ८० बिबटे आहेत. त्याच्या उभारणीसाठीचा सर्व खर्च वन विभागाने केला. त्यानंतर हे केंद्र दिल्लीच्या 'वाईल्ड लाईफ एस-ओएस' या स्वयंसेवी संस्थेला चालविण्यास देण्यात आले. त्यासाठी संबंधित संस्थेने वन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना हाताशी धरले. या केंद्राला भेट देण्यासाठी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनाही परवानगी घ्यावी लागते. यावरून या संस्थांची कार्यपद्धती स्पष्ट होते. आताही शिरूरजवळ सुमारे २०० बिबट्यांसाठी निवारा केंद्र उभारणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केले आहे. उभारणीनंतर ते चालविण्यासाठी पुन्हा स्वयंसेवी संस्थेस दिले जाईल. म्हणजे केंद्र उभारणार सरकार आणि ते चालवणार स्वयंसेवी संस्था, असा खेळ आहे. कारण या केंद्राच्या नावाने या संस्थाना मोठ्या प्रमाणात परदेशांतून निधी उपलब्ध होत असतो. त्यामुळे अशी केंद्रे उभारताना ती बिबट्यांच्या सोयीसाठी आहेत की स्वयंसेवी संस्थांचे हितसंबंध जोपासण्यासाठी, हा प्रश्न यातून निर्माण झाला आहे. उपाययोजनांमध्ये कठोरपणा हवा बिबट्याही वन्य जीव अधिनियम सूची क्रमांक १ मधील प्राणी आहे. ही सूची देशातील सर्वाधिक संकटग्रस्त प्राण्यांची आहे. त्यामुळे उपाययोजना करताना वन विभागाला अनेक मर्यादा येतात.

वास्तविक पाहता, आपल्या देशापेक्षा आफ्रिकेत विपूल वन्यजीवन आहे. तेथेही एखाद्या वन्यजिवांची संख्या बेसुमार वाढून समस्या निर्माण होते. त्यावेळी सर्वतोपरी विचार करून अत्यंत कठोरपणे उपाययोजना केल्या जातात. आफ्रिकेतील झिम्बाब्वेसारख्या देशातील जंगलांमध्ये हत्तींचीसंख्या बेसुमार वाढली, तेव्हा संख्या कमी करण्यासाठी त्यांना ठार करण्यात आले. दक्षिण आफ्रिकेतही असा उपाय करण्याबाबत विचार सुरू आहे. आपल्याकडील वन्यजीव कायदा अतिशय कडक आहे. (तरीही चोरट्या शिकारीचे प्रमाण जगात अधिक आहे.) त्यामुळे काही उपाययोजना करताना या कायद्याचा मोठा अडथळा निर्माण होतो. बिबट्याच्या भीतीने त्यांचा संचार असलेल्या भागात रात्री अक्षरश: संचारबंदीचे वातावरण आहे. रात्री तर सोडाच, दिवसाही शेतीची कामे करायला शेतकरी घाबरत आहेत. त्यामुळे शेतीच्या उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती आहे. मुळात शेतीच्या क्षेत्रातील बिबट्यांचे अस्तित्व शेतकऱ्यांच्या दृष्टीने संकट मानले गेले पाहिजे. त्या दृष्टीनेच सर्व उपाययोजना करताना वन विभागाने कोणाचाही विचार न करता कठोर होणे आवश्यक आहे. यात वेळप्रसंगी बिबट्यांना शेती क्षेत्रातून पूर्णपणे बाहेर काढण्याचा विचार होणे आवश्यक आहे. अर्थात तेही वारंवार करावे लागणार आहे. कारण बिबट्याच्या हल्ल्यात पाळीव प्राणी ठार झाला, तर नुकसानभरपाई देऊन क्षोभ कमी करता येईल; सध्याच्या मर्यादित कुटुंबाच्या काळात बिबट्याच्या हल्ल्यात मानवी बळी गेल्यास हे नुकसान कधीही न भरून येणारे असते, हे लक्षात घेतले पाहिजे.

(लेखक वन्यजीव अभ्यासक आहेत.)

